पुणे, सोमवार, १९ मे २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 170 • वर्ष ४ थे, अंक १७० • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



विद्यार्थ्यांचा आयटीआय प्रवेशाकडे कल P3



पंजाबने राजस्थानला १० धावांनी हरवले १२

## At a Glance

### इस्रायलच्या हल्ल्यात १०३ जण ठार

**गाझा पट्टी :** इस्रायली सैन्याने रात्रभरात संपूर्ण गाझा पट्ट्यामध्ये केलेल्या हल्ल्यात किमान १०३ जण ठार झाले आहेत. अशी माहिती रुग्णालय आणि वैद्यकीय सूत्रांनी दिली. इस्रायलने नव्याने वाढवलेल्या हल्ल्यामुळे गाझाच्या उत्तर भागातील मुख्य रुग्णालय बंद करावे लागले आहे. दक्षिणेकडील खान युनिस शहरामध्ये आणि शहराच्या आजूबाजूच्या परिसरात इस्रायलने केलेल्या हवाई » पान ७ वर

### शहर आणि उपनगरात मध्यम सरी

**पुणे :** शहरात आणि उपनगरांमध्ये आज दिवसभरात



ढगाळ वातावरण राहिले आणि काही भागांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी पडल्या. शिवाजीनगरमध्ये सर्वाधिक १४ मिमी पावसाची नोंद झाली, तर चिंचवड, हडपसर, वडगावशेरी यांसारख्या भागांतही समाधानकारक पर्जन्यवृष्टी झाली.

# भारताचे सडेतोड प्रत्युत्तर

## लष्कराने शेअर केला ऑपरेशन सिंदूरचा आणखी एक व्हिडिओ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**नवी दिल्ली :** पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने ज्या प्रकारे ताकद दाखवून पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले, त्यामुळे पाकिस्तानचेही मनोबल खचले होते. त्याचवेळी पाकिस्तानने भारतावर हल्ला करण्यास सुरुवात केली तेव्हा भारतीय लष्कराने असे सडेतोड प्रत्युत्तर दिले की, ते शस्त्रसंधीची विनवणी करताना दिसले. भारतीय लष्कराने रविवारी ऑपरेशन सिंदूरचा आणखी एक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये लष्कराकडून दहशतवाद्यांना आव्हान देण्यात आले असून पिढ्यानपिढ्या लक्षात राहतील असा धडा शिकवण्यात आल्याचे म्हटले आहे.

भारतीय लष्कराच्या पश्चिम कमांडच्या व्हिडिओमध्ये म्हटले आहे की, हा न्याय होता, सूड नव्हता. पिढ्यानपिढ्या लक्षात राहतील असे धडे ते शिकवतील. रात्री नऊच्या सुमारास शत्रूने ज्या चौकीवरून हल्ला केला त्या चौकीला लष्कराने बेचिराख केले. ऑपरेशन सिंदूर हा पाकिस्तानसाठी एक असा धडा आहे, जो त्याने कित्येक दशकांपासून शिकलेला नाही. दहशतवाद्यांचे लॉंचिंग पॅड आणि पाकिस्तानी लष्कराची चौकी लष्कर कशा प्रकारे उद्ध्वस्त करत आहे, हे या व्हिडिओत दिसत आहे.

'ऑपरेशन सिंदूर'मुळे राजकीय आणि राजनैतिक दृष्ट्या भारताची मानसिकता बदलली असून संपूर्ण जग त्याचे साक्षीदार आहे, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी शनिवारी केले. तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांना पाकिस्तानला खूश करायचे असल्याने सिंधू जल करार घाईगडबडीत करण्यात आला होता, असेही जम्मू-काश्मीरमधील उधमपूरचे लोकसभा सदस्य सिंह यांनी सांगितले.

### भारताच्या धोरणात बदल

- कॉन्स्टिट्यूशनल क्लबमध्ये विजय के सजावल यांनी लिहिलेल्या 'काश्मीर क्रॉनिकल्स' या पुस्तकाचे प्रकाशन केल्यानंतर कार्मिक राज्यमंत्री सिंह म्हणाले की, हा करार दोन्ही देशांना न्याय देण्यात अपयशी ठरला आहे. २०१९ च्या पुलवामा हल्ल्यानंतर सर्जिकल स्ट्राईकनंतर भारताने आपल्या संरक्षण धोरणात बदल सुरू केले असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरक्षा दलांना परिस्थितीनुसार आणि व्यावसायिक ज्ञान आणि विवेकाच्या आधारे काम करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे.
- ते म्हणाले की, हे २०१४ » पान ७ वर

## बैलजोडीचा मान देण्याची परंपरा खंडित




## संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे १८ जूनला प्रस्थान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याचा कार्यक्रम देहू संस्थानकडून जाहीर करण्यात आला आहे. १८ जूनला जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची पालखी ही देहूतून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. त्याआधी देहू संस्थानने एक महत्त्वाचा निर्णय घेतला असून संत तुकाराम महाराजांच्या आषाढी वारीचा पालखी रथ ओढण्यासाठी देहू संस्थान नव्या बैलजोड्या खरेदी करणार आहे. त्यामुळे पालखी सोहळ्यासाठी बैलजोडीचा मान देण्याची वर्षानुवर्षे चालत आलेली परंपरा खंडित झाली आहे.

जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचा ३४० वा पालखी सोहळा अवघ्या एक महिन्यावर येऊन ठेपला आहे. त्यासाठी देहू संस्थानच्या तयारीला वेग आला आहे. यावर्षी देहू संस्थांनकडून एक ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. दरवर्षी तुकोबांच्या पादुका पंढरपूरला जाण्यासाठी पालखी रथात विराजमान » पान ७ वर

# ज्योती मल्होत्रा पाकमध्येच होती

## धक्कादायक खुलासा समोर : पाककडून हेरगिरीसाठी विशेष मोहिम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यापूर्वी यू-ट्युबर ज्योती मल्होत्रा ही पाकिस्तानात होती, असा धक्कादायक खुलासा आता झाला आहे. हरियाणातील हिसार येथील रहिवासी ज्योती मल्होत्रा हिला पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. हिसारचे पोलीस अधीक्षक शशांक कुमार सावन यांनी रविवारी या प्रकरणी नवीन माहिती दिली.

ते म्हणाले की, पीआयओ काही सोशल मीडिया इन्फ्लुएंसरची भरती करण्याचा प्रयत्न करत आहेत. आम्हाला केंद्रीय यंत्रणांकडून माहिती मिळाली होती आणि आम्ही हिसारयेथील रहिवासी ज्योती मल्होत्राला अटक केली होती. ती पीआयओच्या संपर्कात होती. त्या अनेकवेळा पाकिस्तानआणि एकदा चीनला गेल्या आहेत. आम्ही त्याला पाच दिवसांची पोलिस » पान ७ वर

### ज्योतीने कशा प्रकारचा व्हिडिओ बनवला?

- ज्योती मल्होत्राचे 'ट्रॅव्हल विथ जो' नावाचे युट्यूब चॅनेल असून त्याचे ३.७७ लाख सबस्क्रायबर्स आहेत. तिच्या युट्यूब चॅनेल अकाऊंटवर तिच्या पाकिस्तान दौऱ्याशी संबंधित काही व्हिडिओ जसे 'इंडियन गर्ल इन पाकिस्तान', 'इंडियन गर्ल अ‍ॅट कटास राज टेंपल', 'इंडियन गर्ल राईड्स लक्झरी बस इन पाकिस्तान' असे पोस्ट केले आहेत. तिने आतापर्यंत एकूण ४८७ व्हिडिओ बनवले आहेत. तिने आपल्या यूट्यूब चॅनेलवर स्वतःची ओळख 'भटक्या लिओ गर्ल', 'वांडरर हरियाणवी प्लस पंजाबी' आणि 'ओल्ड थॉट्स मॉडर्न गर्ल' अशी करून दिली आहे.

### अशा प्रकारे पकडली गेली

- ज्योतीला न्यू अग्रसेन एक्सटेंशन येथून अटक करण्यात आली. तिच्याविरोधात ऑफिशियल सिक्रेट ॲक्ट आणि



इंडियन ज्युडिशियल कोडच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायालयाने त्याला पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. दिल्लीतील पाकिस्तानी उच्चायुक्तालयात काम करणाऱ्या एका पाकिस्तानी कर्मचाऱ्याच्या ती संपर्कात होती. हेरगिरीत सहभागी असल्याच्या आरोपावरून भारताने १३ मे रोजी पाकिस्तानी अधिकाऱ्याची हकालपट्टी केली होती. सिव्हिल लाइन्स पोलिस ठाण्यात १६ मे रोजी दाखल एफआयआरनुसार, २०२३ मध्ये ज्योती पाकिस्तान उच्चायुक्तालयातील एहसान-उर-रहीम ऊर्फ दानिशच्या संपर्कात आली होती, जिथे ती शेजारच्या देशात जाण्यासाठी व्हिसा घेण्यासाठी गेली होती. दोनवेळा पाकिस्तानला गेलेल्या ज्योतीची भेट दानिशचा ओळखीचा अली अहवान याच्याशी झाली होती, ज्याने तिची राहण्याची व्यवस्था केली होती.

## मराठा संघटनांची सोमवारी बंदची हाक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बीड :** परळी तालुक्यातील लिंबोटा गावातील तरुण शिवराज दिवटे याला सप्ताहात झालेल्या किरकोळ वादावरून १९ ते २० तरुणांनी काठी,बेल्ट आणि रॉडने मारहाण केली. या प्रकरणामध्ये मराठा संघटना आक्रमक झाल्या असून त्यांनी सोमवार दि. १९ मे रोजी परळी आणि बीड बंदची हाक दिली आहे.

शिवराजला मारहाण करणाऱ्या सात जणांना अटक करण्यात आली आहे. मात्र, आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करा आणि मारहाणीमध्ये सहभागी असलेल्या इतरांना अटक करा यासाठी लिंबोटा गावातील ग्रामस्थ आक्रमक झाले. त्यांनी बीड-परळी मार्गावर ठिय्या आंदोलन केले. जोपर्यंत मागण्या मान्य मान्य होणार नाहीत तोपर्यंत मागे हटणार नसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

मनोज जरांगे हे बीडच्या दौऱ्यावर असून, ते देखील रुग्णालयात जाऊन शिवराज दिवटेची » पान ७ वर

# सरन्यायाधीशांची नाराजी

## अधिकाऱ्यांची अनुपस्थिती खटकली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** भारताचे सरन्यायाधीश भूषण तथा बी. आर. गवई हे रविवारी मुंबईत आले. सरन्यायाधीश झाल्यानंतर ते प्रथमच मुंबईत आले. तथापि, या दौऱ्यात त्यांनी अधिकाऱ्यांच्या वर्तनावरून नाराजी व्यक्त केली आहे.

"महाराष्ट्रातील वरिष्ठ अधिकारी प्रोटोकॉलचे पालन करत नाहीत, याबद्दल मी निराश झालो आहे. जर भारताचा सरन्यायाधीश प्रथमच महाराष्ट्रात येत असेल, तर राज्याचे मुख्य सचिव, पोलिस महासंचालक आणि मुंबईचे पोलिस आयुक्त हे उपस्थित असणे अपेक्षित आहे. त्यांची अनुपस्थिती विचार करायला लावते."अशा शब्दांत त्यांनी नाराजी व्यक्त केली.

गवई रविवारी मुंबईत आले होते. महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिलने त्यांच्या सन्मानार्थ कार्यक्रमाचे आयोजन केले होते. मात्र त्यांना स्वागत करण्यासाठी राज्याचे मुख्य सचिव, डीजीपी किंवा मुंबईचे पोलीस आयुक्त हजर नव्हते. या प्रोटोकॉलचा भंग झाल्याने गवई यांनी आपल्या भाषणात नाराजी व्यक्त केली.

गवई यांनी म्हटले आहे की, न्यायपालिका, विधिमंडळ आणि कार्यपालिका हे लोकशाहीचे तीन प्रमुख स्तंभ आहेत. या सर्वांनी एकमेकांचा सन्मान करणे आवश्यक आहे. सभेला मराठीत संबोधित करताना गवई यांनी त्यांना मिळालेल्या प्रेम आणि स्नेहाबद्दल मनापासून आभार व्यक्त केले. याआधी त्यांनी चैत्यभूमीवर जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाला भेट दिली.

भाषणाच्या दरम्यान गवई उपस्थित जनसमुदायाकडून मिळालेल्या प्रेमामुळे भावनाविवश झाले. त्यांनी म्हटले, मी सर्वांचा खूप आभारी आहे. मला जो प्रेम आणि सन्मान मिळाला आहे, त्याने मी भारावून गेलो आहे. गेले ४० वर्षे मला हा स्नेह मिळत आहे. आजचा कार्यक्रम माझ्यासाठी अविस्मरणीय आहे. माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी शब्द अपुरे पडत आहेत. १४ मे रोजी मी भारताच्या सरन्यायाधीशपदाची शपथ घेतली, तेव्हा महाराष्ट्राने माझ्यावर अपार प्रेम केलं. संपूर्ण राज्यातून लोकांनी तो सोहळा » पान ७ वर

## बांगलादेशाची आर्थिक कोंडी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारताने शनिवारपासून बांगलादेशमधून येणाऱ्या काही वस्तूंवरील आयातीसाठी बंदर निर्बंध लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये रेडीमेड कपडे आणि प्रोसेस्ड फूड आयटम्स (प्रक्रियायुक्त खाद्यपदार्थ) यांचा समावेश आहे. वाणिज्य मंत्रालयाच्या अधिपत्याखालील परकीय व्यापार महासंचालनालयाने यासंदर्भात अधिसूचना जारी केली होती. या अधिसूचनेनुसार, बांगलादेशहून भारतात येणाऱ्या रेडीमेड कपडे, प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ यांसारख्या काही वस्तूंवर बंदर निर्बंध लावण्यात आले आहेत, असे मंत्रालयाने म्हटले आहे.

दरम्यान लागू केलेले हे निर्बंध तत्काळ प्रभावाने अंमलात आणण्यात आले आहेत. बांगलादेशातून येणाऱ्या सर्व प्रकारच्या » पान ७ वर

## 'तिरंगा यात्रा'

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पुणे :** जम्मू-काश्मीरमधील पहेलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या निष्पाप हिंदू नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आणि भारतीय लष्कराच्या पराक्रमाला सलाम करण्यासाठी रविवारी पुण्यात 'तिरंगा यात्रा'चे आयोजन करण्यात आले. छत्रपती धर्मवीर संभाजी महाराज स्मारक येथून ज्ञानेश्वर पादुका चौकात समारोप सभा झाली.

## अलमट्टी धरणाच्या उंचीला विरोध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** गेल्या २००५, २०१९ आणि २०२१ साली कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्याला महापुराचा फटका बसला. याला सर्वात मोठं कारण हे कर्नाटक राज्यातील अलमट्टी धरण असल्याच समोर आलं. अलमट्टी धरणात कृष्णा नदीचं पाणी अडवल्यानं कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील नदीकाठच्या गावांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं होतं. असं असताना देखील कर्नाटक सरकारनं अलमट्टी धरणाची उंची आणखी ५२४ मीटर वाढवण्याचा घाट घातला आहे. कर्नाटक सरकारच्या या भूमिकेविरोधात सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेत्यांनी आंदोलन पुकारलं आहे. रविवारी कोल्हापुरातील अंकली पुलाजवळ उदगाव येथे चक्काजाम आंदोलन करण्यात आलं. यावेळी, अलमट्टी धरणाबाबत महाराष्ट्र सरकारनं ठोस भूमिका » पान ७ वर

# शरद पवारांचा अजित पवारांना फोन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शरद पवारांनी थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांना फोन केल्याची माहिती समोर आली आहे. पुणे जिल्ह्यात नव्या उभारण्यात येत असलेल्या पुरंदर विमानतळाच्या बाबतीत शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या संदर्भाने शरद पवारांनी अजित पवारांना फोन करुन चर्चा केली. पुरंदर विमानतळ आणि येथील शेतकऱ्यांचा विरोध याबाबत दोन्ही नेत्यांमध्ये संवाद झाला. पुण्याचे जिल्हाधिकारी याबाबतीत लक्ष घालत असल्याची माहिती अजित पवार यांनी शरद पवारांना दिली.

दरम्यान, पुण्यात शरद पवार यांना भेटण्यासाठी आज पुरंदर येथील शेतकरी त्यांच्या बंगल्यावर दाखल झाले होते. शेतकऱ्यांनी त्यांची अडचण सांगितल्यानंतर शरद पवारांनी थेट पुण्याचे पालकमंत्री व उपमुख्यमंत्री म्हणून अजित पवारांना केला फोन करुन शेतकऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात चर्चा केली.

अजित पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आपलाच असल्याचे सांगत शरद पवारांपासून वेगळं होऊन महायुतीसोबत जाणे पसंत केले. महायुतीसोबत सत्तेत सहभागी झाल्यानंतर विधानसभा निवडणुकीत अजित पवारांच्या राष्ट्रवादीला मोठं यश मिळालं. तर, शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या उमेदवारांचा मोठा पराभव झाला. शरद पवारांचे केवळ १० आमदार निवडून आले आहेत. त्यामुळे, राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांकडून दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यासंदर्भात चर्चा केली जात » पान ७ वर

# सुप्रिया सुळे पुन्हा संसदरत्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** यंदा संसदरत्न पुरस्कारांसाठी महाराष्ट्राने बाजी मारली आहे. संसदेमध्ये



उल्लेखनीय, सातत्यपूर्ण व उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खासदारांना दरवर्षी 'प्राइम पॉइंट फाउंडेशन' या संस्थेमार्फत हा पुरस्कार दिला जातो. यंदाच्या संसदरत्न पुरस्कारांसाठी सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे यांच्यासह ७ खासदारांनी या यादीत स्थान पटकावले आहे.

भर्तृहरि महताब, सुप्रिया सुळे, एन. के. प्रेमचंद्रन आणि श्रीरंग बारणे हे चार खासदार सोळावी आणि सतरावी लोकसभेत सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करणारे खासदार ठरले आहेत. या पुरस्कारांची निवड राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांच्या अध्यक्षतेखालील » पान ७ वर

### महाराष्ट्रातील खासदार

- सुप्रिया सुळे (राष्ट्रवादी काँग्रेस – शरद पवार गट)
- श्रीरंग बारणे (शिवसेना – शिंदे गट),
- अरविंद सावंत (शिवसेना – उद्धव ठाकरे गट)
- नरेश म्हस्के (शिवसेना – शिंदे गट)
- स्मिता वाघ (भाजप)
- मेधा कुलकर्णी (भाजप)
- वर्षा गायकवाड (कॉंग्रेस)

# वाऱ्याच्या वेगात मान्सून होणार देशात दाखल

### मान्सून

**केरळात वाऱ्याच्या वेगाने दाखल होणारा मान्सून यंदा महाराष्ट्रातही लवकर दाखल होणार आहे. केरळमध्ये अंदाजे २७ मे रोजी मान्सून (चार दिवस कमी-अधिक) दाखल होईल, अशी सरासरी तारीख अपेक्षित धरली तरी राज्यात मान्सून कोणत्या क्षणी दाखल होईल, अशी तारीख देता येत नाही. त्यास अनेक कारणे असले तरी यंदा राज्यात मान्सून भरभरून कोसळणार असल्याचे संकेत आहेत.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** यंदाच्या चार महिन्यांत प्रत्येक महिन्याला, प्रत्येक आठवड्याला पाऊस चांगला असेल, असे गृहीत धरणे योग्य नाही. कारण, विस्तृत पूर्वानुमान गृहीत धरले असले तरी शेतकऱ्यांनी कृषी विभागाशी समन्वय ठेवून शेतीच्या कामाचे नियोजन करणे अपेक्षित आहे. रेड, ऑरेंज अलर्टवर शेतकऱ्यांनी लक्ष ठेवणे गरजेचे आहे. तीन ते चार तासांच्या पावसावरही शेतक-यांनी लक्ष ठेवून स्वतःची आणि पशुधनाची काळजी घेणे गरजेचे आहे. कृषी विभाग आणि हवामान विभाग यांची जोड कायमच शेतकऱ्यांसोबत असून आता हवामान विभागाने ब्लॉकस्तरीय अंदाज आणि पंचायत स्तरावर सल्ले देण्यास सुरुवात केली आहे.



मौसम ॲप, मेघदूत ॲप आणि दामिनी ॲपसारखे अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरतानाच शेतक-यांनी थोडासा माहिती तंत्रज्ञानाची जोड घेण्याची गरज आहे. जेणेकरून पावसाचा खंड आणि पावसाचे वितरण शेतकऱ्यांना मोबाइलवर शक्य आहे. हवामान विभागाचा मानस प्रत्येक गोष्ट शेतक-यांपर्यंत पोहोचविणे हा आहेच. मात्र संपूर्ण चार महिने पाऊस कसा असेल? हे सांगता येत नाही. कारण, पावसाचे टप्पे असतात. जून महिना हा संक्रमणाचा काळ असतो. जुलै आणि ऑगस्ट हे दोन महिने महत्त्वाचे असतात. त्यामुळे शेतक-यांनी हवामान विभागाशी संपर्क राहून शेतीचे नियोजन केले पाहिजे.

यंदा पाऊस चांगला आहे ही चांगली बाब आहे. तसे पूर्वानुमान आहेच. मात्र, ते शेतकऱ्यांपर्यंत कधी कधी पोहोचत नाही, ही वस्तुस्थिती असली तरी शेतकऱ्यांनी स्वयंघोषित हवामान तज्ज्ञांवर अवलंबून राहण्यापेक्षा आयटीची जोड घेत शेतीचे नियोजन करणे गरजेचे आहे. दरम्यान, आता मान्सून मॉड्यूलनुसार, यंदा मान्सून जून महिन्याच्या अखेरपर्यंत राज्य व्यापले, असा अंदाज आहे. शिवाय यंदाच्या मान्सून अल निनो नाही. ला निना आता न्यूट्रल झाला आहे. या सगळ्या गोष्टी तटस्थ असल्या तरी ग्लोबल मॉड्यूल असे दर्शवित आहेत की पावसाचे चार महिने चांगले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. #रा




## यूपीएससी पूर्वपरीक्षा २४ मे पासून; वेळापत्रक जाहीर

**पुणे :** केंद्रीय लोकसेवा आयोगाने (यूपीएससी) पुढच्या वर्षात होणाऱ्या स्पर्धा परीक्षांचे वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार नागरी सेवा परीक्षेतील पूर्वपरीक्षा २४ मे रोजी, तर मुख्य परीक्षा २१ ऑगस्ट रोजी होणार आहे. याबाबतची सर्व माहिती यूपीएससी संकेतस्थळावर उपलब्ध आहे. 'यूपीएससी'तर्फे केंद्रीय स्तरावरील पदभरतीसाठी विविध परीक्षा आयोजित करण्यात येतात. त्यात नागरी सेवा, अभियांत्रिकी सेवा, एनडीए भरती, वनसेवा अशा परीक्षांचा समावेश आहे. देशभरातील लाखो उमेदवार या परीक्षा देतात. वार्षिक वेळापत्रक जाहीर करण्यात आल्यामुळे वेळापत्रकानुसार उमेदवारांना परीक्षांची तयारी करणे शक्य होणार आहे. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) आणि कम्बाइन्ड डिफेन्स स्टाफ (सीडीएस) यांच्या प्रथम परीक्षेची अधिसूचना १० डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध होऊन लेखी परीक्षा १२ एप्रिल २०२६ रोजी घेतली जाणार आहे. द्वितीय परीक्षेची अधिसूचना २० मे २०२६ रोजी प्रसिद्ध करून १३ सप्टेंबर २०२६ रोजी परीक्षा घेतली जाणार आहे.



## गाडीला कट लागल्याने केला हवेत गोळीबार

**पुणे :** पुण्यामध्ये मध्यरात्री हवेत गोळीबार करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. गाडीला कट लागल्याच्या रागातून दोघांमध्ये वाद झाला. या वादानंतर आरोपीने हवेत गोळीबार करत दहशत पसरवण्याचा प्रयत्न केला.

या गोळीबारामुळे घटनास्थळी भीतीचे वातावरण होते. या गोळीबारात सुदैवाने कोणी जखमी झाले नाही. याप्रकरणात पोलिसांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल करत त्यांना अटक केली. मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातल्या बिबवेवाडीमध्ये ही धक्कादायक घटना घडली आहे. गाडीला कट लागल्याच्या कारणावरून दोघांनी हवेत गोळीबार केला. मध्यरात्री गोळीबाराचा आवज ऐकून बिबवेवाडीमधील नागरिकांमध्ये खळबळ उडाली. मध्यरात्री २ वाजताच्या सुमारास हा प्रकार घडला. आरोपी आणि फिर्यादी दोघेही दुचाकीवरून जात होते. फिर्यादीच्या दुचाकीला आरोपीच्या दुचाकीचा धक्का लागला. याच रागातून या दोघांमध्ये वाद झाला आणि नंतर आरोपीने हवेत गोळीबार केला. गोळीबार करत आरोपींनी दहशत माजवण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने गोळीबारात कुणीही जखमी नाही. गोळीबारानंतर आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला.

## गावठी दारू जप्त; एक अटकेत

**पुणे :** अवैधरीत्या दारुची वाहतूक करणाऱ्यास लोणी काळभोर (ता. हवेली) पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडील ५३ हजार ५०० रुपये किमतीचा माल जप्त केला आहे. अमोल माणिक नेमाने (वय ३६, रा. लोणी काळभोर) व त्याचा साथीदार सोनू संपत पवार (वय २६ रा. नेहरू चौक, लोणी काळभोर), असे अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे- सोलापूर महामार्गावरील लोणी फाटा चौकाशेजारील सार्वजनिक रस्त्यावरून अवैध गावठी दारू भरलेले कॅन्ड दुचाकीवरून लोणी काळभोर गावाच्या दिशेने वाहून नेले जात असल्याची माहिती पोलिस हवालदार कोल्हे यांना मिळाली. त्याच्या आधारे लोणी काळभोर पोलिसांनी सापळा रचून अवैध गावठी दारू वाहून नेणाऱ्या आरोपींना ताब्यात घेतले. आरोपीकडील हातभट्टी गावठी दारू भरलेले १ कॅन्ड, त्यामध्ये एकूण ३५ लिटर दारू आणि दुचाकी जप्त केली. सदरची कामगिरी वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, पोलिस उप निरीक्षक सर्जेराव बोबडे, पोलिस हवालदार क्षिरसागर, कोल्हे, कटके यांनी केली.

## पालक गमावलेल्या बालकांची कार्यशाळा

**पुणे :** कोरोनाकाळात आई-वडील असे दोन्ही पालक गमावलेल्या पीएम केअर्स योजनेतील लाभार्थ्यांना आर्थिक बचतीच्या अनुषंगाने व शैक्षणिक आणि भविष्यातील संधीबाबत समुपदेशन व मार्गदर्शन करण्यासाठी कार्यशाळा झाली.

जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी कार्यालयाने या कार्यशाळेचे आयोजन केले होते. यावेळी जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी मनीषा बिरारीस, बालकल्याण समितीच्या मार्गदर्शक सुमित्रा आष्टीकर यांच्यासह पीएम केअर्स योजनेतील लाभार्थी मुले व त्यांचे सध्याचे पालक उपस्थित होते.

प्रत्येक बालकाला पीएम केअर्स योजनेतून १० लाख रुपये त्यांच्या खात्यावर ठेव म्हणून ठेवण्यात आले असून, वयाच्या २३ व्या वर्षी ते त्यांना काढता येणार आहेत. तसेच याची दरमहा पाच हजार ५०० इतकी व्याजाची रक्कम त्यांना देण्यात येत आहे. याशिवाय राज्य सरकारने स्वत:च्या योजनेतून पाच लाख रुपयांची ठेव त्यांच्या खात्यावर ठेवली आहे. त्यावरील व्याज दरमहा देण्यात येत आहे. महिला व बालविकास विभागामार्फत याचे नियंत्रण होत आहे. जिल्ह्यात कोरोनाकाळात दोन्ही पालक गमावलेली १८ वर्षांखालील ११० मुले असून, त्यापैकी ९० मुले या कार्यशाळेला उपस्थित होती.

## 'जनआक्रोश'...!




**पुणे** लोहगाव रहिवासी संघटना (DLRA) यांच्या वतीने आज विविध नागरी प्रश्नांसाठी "जन आक्रोश मूक धरणेआंदोलन" धानोरी जकात नाका येथे पार पडले. यामध्ये शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून गंभीर नागरी समस्या मांडल्या.

## विविध मागण्यांसाठी लोहगावकरांचा जनआक्रोश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लोहगाव रहिवासी संघटना (DLRA) यांच्या वतीने आज विविध नागरी प्रश्नांसाठी "जन आक्रोश मूक धरणेआंदोलन" धानोरी जकात नाका येथे पार पडले. यामध्ये शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून गंभीर नागरी समस्या मांडल्याः. यात अपुरा व अनियमित पाणीपुरवठा, वारंवार आणि अनियोजित वीजपुरवठा खंडित होणे, रस्त्यांची दुरवस्था व पादचारी मार्गाचा अभाव, पोलिस ठाण्याचा अभाव व सुरक्षिततेची कमतरता, नेहमी होणारी वाहतूक कोंडी व नियोजनाचा अभाव आदी समस्या मांडण्यात आल्या.

या आदोलनात नागरिकांनी कोणताही राजकीय झेंडा न वापरता, केवळ आपल्या हक्कासाठी शांततेने आणि संयमाने आदोलन केले. संघटनेचे अध्यक्ष गिरीश जयवाल यानी सांगितले की, "जर प्रशासनाने तात्काळ कारवाई करून समस्या सोडवल्या नाहीत, तर आम्हाला आणखी तीव्र आंदोलनात्मक पावले उचलावी लागतील. या वेळी माजी आमदार सुनील टिंगरे, सुनील खांदवे, बंडू खांदवे, राजेंद्र खांदवे, संतोष खांदवे, शशी टिंगरे, संतोष पाटोळे, धनराज मुंगळे, मनोज पांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# बेशिस्तांना 'मुजोरपणा' नडणार...!

### थेट निलंबन; व्हाया दंड : पीएमपी चालकांना निर्वाणीचा इशारा

गेल्या काही वर्षांच्या कालावधीत शहर आणि उपनगरातील वाहतूक कोंडीत चांगलीच वाढ झाली आहे, त्यामुळे अवघ्या एक किलोमीटरच्या अंतरासाठी वाहनचालकांना तासनतास वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागत असून परिणामी या कोंडीत आणखीनच भर पडत आहे. हे वास्तव असतानाच गेल्या काही वर्षांपासून 'पीएमपीएमएल' चालकांचा मुजोरपणा अधिकच वाढत चालला आहे; विशेष म्हणजे मनमानी पद्धतीने ड्रायव्हिंग करत निष्पाप वाहनचालकांना चिरडण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे. त्यासंदर्भात समज देऊनही त्यांच्याच अद्याप सुधारणा झालेली नाही, त्यामुळे त्यांना वठणीवर आणण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घेतला असून अशा चालकांचे थेट निलंबन करण्यात येणार आहे.

> स्वमालकीच्या व खासगी बस पुरवठादारांच्या बसवरील चालक-वाहक सेवक हे वाहतुकीच्या नियमांचे पालन करीत नसल्याबाबत प्रवासी नागरिक, सजग नागरिक मंच, पीएमपीएमएल प्रवासी मंच तसेच सामाजिक संस्था व लोकप्रतिनिधी यांच्याकडुन तक्रारी व सुचना प्राप्त होत असतात. चालक-वाहकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याच्या सक्त सूचना दिल्या आहेत. सूचनांचे पालन न केल्यास चालक-वाहक सेवकांवर दोन हजार रुपये इतकी दंडात्मक कारवाई अथवा निलंबनाची कारवाई करण्यात येणार आहेत.
>
> **- सतीश गव्हाणे,** मुख्य वाहतूक व्यवस्थापक पीएमपी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील अनेक भागांमध्ये पीएमपी बस चालकांकडून वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी प्रवाशांकडून येत होत्या. अनेकदा बस थांब्यावर बस न थांबवणे, अचानक वेगात बदल करणे, चुकीच्या दिशेने वळण घेणे, लेनचे उल्लंघन करणे यांसारख्या घटनांमुळे प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर पीएमपी प्रशासनाने आता कठोर भूमिका घेतली आहे.

पीएमपीने शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरळीत आणि प्रवाशांसाठी सुरक्षित करण्यासाठी कठोर पाऊल उचलले आहे. यापुढे जर पीएमपी बसचालकांनी वाहतूक नियमांचे वारंवार उल्लंघन केले, तर त्यांना थेट निलंबनाच्या कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. यासोबतच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रत्येक चालक आणि बसच्या वाहकाकडून तब्बल दोन हजार रुपयांचा दंड वसूल केला जाणार आहे. पीएमपी प्रशासनाने याबाबत अधिकृत पत्रक जारी केले असून, त्याची अंमलबजावणी तातडीने सुरू करण्यात आली आहे.

प्रशासनाने जारी केलेल्या पत्रकानुसार, आता कोणत्याही चालकाने वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यास त्याला पहिल्या वेळेस दोन हजार रुपयांचा दंड भरावा लागेल. वारंवार नियम मोडणाऱ्या चालकांवर मात्र, थेट निलंबनाची कारवाई केली जाईल, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

### चालक-वाहकांना दिल्यात या सक्त सूचना

- बस चालविताना चालकाने मोबाईलवर बोलू नये
- वाहतुकीच्या नियमांचे पालन करून बस चालविणे
- चालक-वाहक सेवकाने कोणत्याही प्रकारचे धूम्रपान करू नये.
- प्रवाशांना चढ-उतार करणे सुलभ होईल अशा रीतीने बस बस थांब्यालगत उभी करणे.
- लेनच्या शिस्तीचे पालन करणे
- भरधाव वेगाने बस चालवू नये
- झेब्रा क्रॉसिंगवर बस थांबविणे
- रूट बोर्ड न बदलणे

## अकरावी प्रवेश ऑनलाइन अर्ज प्रक्रिया आजपासून

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** दहावी निकालानंतर सर्वांचे लक्ष अकरावी प्रवेशाकडे लागले असून तिच्या ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेसाठी कनिष्ठ महाविद्यालयांची नोंदणी पूर्ण झाली आहे. पुणे जिल्ह्यात ६८५ कनिष्ठ महाविद्यालयांनी नोंदणी पूर्ण केली आहे. सोमवारपासून (ता. १९) विद्यार्थ्यांना अकरावीच्या प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु होणार आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक वुभागतर्फे फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेसाठीलाखो विद्यार्थी बसले होते. राज्याचा एकूण निकाल ९४ टक्के लागला. आयुष्यातील महत्वाच्या टप्प्यांपैकी एक असलेल्या दहावीच्या निकालानंतर आता अकरावीच्या प्रवेशाची लगबग सुरू झाली आहे. येत्या सोमवारपासून, म्हणजेच १९ मे पासून इयत्ता अकरावीसाठी ऑनलाइन प्रवेशाची प्रक्रिया सुरू होणार आहे. ऑनलाईन पोर्टलवर सध्या महाविद्यालयांची नोंदणी प्रक्रिया सुरू आहे. त्यानंतर आता अकरावी प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होणार आहे.

यंदा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीची अकरावीची प्रवेश प्रक्रिया संपूर्णपणे ऑनलाइन पद्धतीनेच होणार असल्याचा शासन निर्णय जाहीर झाला आहे. शिक्षण संचालनालयाने या प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर केले असून सोमवार, १९ मेपासून विद्यार्थ्यांना ऑनलाइन नोंदणी आणि महाविद्यालयांचा प्राधान्यक्रम भरता येईल, असे घोषित केले होते.

पुणे विभागात पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयांचा समावेश आहे. विभागात १ हजार ५३३ कनिष्ठ महाविद्यालयांपैकी १ हजार ५२६ कनिष्ठ महाविद्यालयांची नोंदणी झाली. यामध्ये पुणे जिल्ह्यात ६८५, अहिल्यानगर जिल्ह्यात ४५३ आणि सोलापूर जिल्ह्यात ३८८ कनिष्ठ महाविद्यालयांची नोंदणी पूर्ण झाली आहे

राज्यात जवळपास ११ हजार ७०० कनिष्ठ महाविद्यालये असून सुमारे १६ लाख ७६ हजार जागांसाठी केंद्रीय प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. राज्यात अकरावीच्या प्रवेशासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये ही ऑनलाइन प्रक्रिया राबवली जात आहे. यंदा संपूर्ण राज्यभरात ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेला सोमवारपासून सुरुवात होणार आहे. १९ ते २८ मेपर्यंत ही प्रक्रिया सुरू असेल.

## काँग्रेसचे दत्ता बहिरट राष्ट्रवादीच्या वाटेवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यात काँग्रेसला आणखी एक धक्का बसण्याची दाट शक्यता आहे. पुण्याचे काँग्रेसचे नेते दत्ता बहिरट यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवारांची पुण्यात भेट घेत त्यांनी चर्चा केली आहे. अजित पवारांच्या भेटीनंतर बहिरट राष्ट्रवादीत प्रवेश करणार असल्याचा चर्चा आता राजकीय वर्तुळात सुरु झाल्या आहेत.

दत्ता बहिरट हे पुण्याचे काँग्रेस पक्षाचे माजी नगरसेवक आहेत. बहिरट यांनी २०१९ आणि २०२४ साली काँग्रेसकडून शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवली होती. पण ते निवडून आले नाहीत. मात्र, दत्ता बहिरट यांचं शिवाजीनगर मतदार संघामध्ये मोठं वर्चस्व आहे. त्यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिल्यास स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर राजकीय तोटा होऊ शकतो.

या सर्व घडामोडींवर दत्ता बहिरट म्हणाले की, 'माझ्या नातेवाईकांच्या घरी अजितदादा आले होते. तेव्हा मला जेवण्याचं निमंत्रण होतं, तिथे मी गेलो होतो, तिथेच अजित दादांची भेट झाली. मात्र, पक्ष प्रवेशाबाबत अद्याप तरी काही निर्णय झालेला नाही.'

गेल्या काही दिवसांमध्ये पुण्यात काँग्रेसला मोठी गळती लागली आहे.



**पुणे** पुण्याचे काँग्रेसचे नेते दत्ता बहिरट यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवारांची पुण्यात भेट घेत त्यांनी चर्चा केली आहे. अजित पवारांच्या भेटीनंतर बहिरट राष्ट्रवादीत प्रवेश करणार असल्याचा चर्चा आता राजकीय वर्तुळात सुरु झाल्या आहेत.

# आघाडी काळात भ्रष्टाचार झाले हे राज्याचे दुर्दैव : माधव भंडारी




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सन २०१९ मध्ये विधानसभा निवडणूक नंतर निकाल आले आणि राज्यातील राजकारण बदलले गेले. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात युतीने एकत्रित त्या निवडणूक लढवल्या आणि निकालात आम्हाला १६१ जागा देखील मिळाल्या. त्यामुळे राज्यात सरकार युतीचे येणे आवश्यक होते. पण शिवसेनेने जनतेचा, भाजपचा विश्वासघात केला आणि उद्धव ठाकरे हे काँग्रेस ,राष्ट्रवादी काँग्रेस सोबत जाऊन आघाडी सोबत त्यांनी सरकार स्थापन केले. त्यांचा अडीच वर्षाचा कारभार हा दुर्दैवी होता.कोरोना काळात तत्कालीन राज्य सरकार अपयशी ठरले. यादरम्यान अनेक भ्रष्टाचार झाले हे राज्याचे दुर्देव आहे असे मत भाजप नेते आणि भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष माधव भंडारी यांनी व्यक्त केले आहे.

लेखक विनायक आंबेकर लिखित "किंगमेकर क्रॉनिकल_ वसुली व घोटाळ्याचे पर्व "पुस्तकाचे प्रकाशन भाजप नेते आणि भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष माधव भंडारी यांच्या हस्ते पार पडले. यावेळी भंडारी म्हणाले, किंगमेकर क्रॉनिकल हे पुस्तक आज प्रकाशित केले हे चांगले आहे. विनायक आंबेकर यांचे लेखन अभ्यासपूर्ण आहे. त्यांनी धर्मकन्या २०१४ साली लिहिले. २०१६ साली नोटबंदीवर देखील त्यांनी अभ्यासपूर्ण लेखन केले होते. मराठी मध्ये राजकीय विषया बाबत अभ्यासपूर्ण फारसे लिखाण येत नाही. राजकीय घटना कादंबरी स्वरूपात सर्वजण वाचतात. कादंबरीमध्ये थोडे विस्ताराने लिखाण करता येते. सर्व घटनामागील दडलेल्या गोष्टी, हितसंबंध, अंतस्थ हेतू उलगडून दाखवण्याचा प्रयत्न आंबेकर यांनी या पुस्तकातून केला आहे. आंबेकर यांनी हे लिखाण आज लिहिले नसून त्याची तयारी आधीच त्यांनी केली होती.

> विविध घटना बद्दल किंवा पंतप्रधान ते मुख्यमंत्री सर्वांबद्दल अर्वाच्च भाषेत बोलणारे असे का बोलतात ते जनतेने समजून घेणे आवश्यक आहे. असे करताना त्यांना जनतेपासून काय लपवयचंय हे जनतेला माहिती व्हावे या साठी हे पुस्तक लिहिले आहे. कोरोना काळ आणि महाविकास आघाडी काळातील घोटाळ्यांची साखळी या पुस्तकातून स्पष्ट केली आहे.
>
> **-विनायक आंबेकर;** ज्येष्ठ लेखक

## संकष्टी चतुर्थीला गोसेवा अन्नदान कार्य संपन्न...!



**पुणे :** संकष्टी चतुर्थीचे औचित्य साधत आपल्या पर्वती भागामध्ये सर्वात पहिली कार्यरत असणारी समस्त हिंदू बांधव सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्य संचलित गोकुळ धाम गोशाला, सारसबाग, पुणे येथे एकता मित्र मंडळाच्या वतीने गोसेवेला अन्नदान करण्यात आले.


दर चतुर्थीला अन्नदान सेवा कार्याचा एक भाग म्हणून यावेळी मंडळाचे उत्सव प्रमुख हिरेन गायकवाड यांच्या संकल्पनेतून व जयेश ढमाले, गणेश खाडे, आशुतोष अमराळे, संकेत मिरगे, केशव अमराळे, शुभम खाडे, साई भोसले, हेरंब ढमाले, श्लोक कोंडे, शुभम बाणखेले, अथर्व तिवाटणे, सुशांत सुभेदार, चैतन्य ढमाले, गौरव शिर्के, दुर्वांकुर ढमाले, आदित्य मिरगे, मानव बाणखेले व अध्यक्ष सुधीर ढमाले या सर्वांच्या माध्यमातून २०० किलो कडबा-कुट्टी गोसेवेत उपलब्ध करून देण्यात आली.



## प्राचार्य प्रा. डॉ. प्रदीप जाधव यांचा गौरव

**पुणे :** भारती विद्यापीठाच्या महिला अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. प्रदीप जाधव यांना आठव्या हायर एज्युकेशन इनोव्हेशन अँड टेक्नॉलॉजी (HEIT) शिखर परिषद आणि पुरस्कार २०२५ मध्ये 'प्रिन्सिपल ऑफ द इयर फॉर इन्स्टिट्यूशनल एक्सलन्स' या मानाच्या पुरस्काराने गौरवण्यात आले. प्लस नाईन वन मीडिया यांच्या पुढाकाराने, नॅशनल कौन्सिल फॉर व्होकेशनल एज्युकेशन अँड ट्रेनिंग (NCVET) आणि स्किल इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद आयोजित करण्यात आली.
ही परिषद देशातील उच्च शिक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील नाविन्य, नेतृत्व आणि गुणवत्ता यांचा गौरव करण्यासाठी ओळखली जाते. प्राचार्य प्रा. डॉ. प्रदीप जाधव यांना त्यांच्या संस्थात्मक नेतृत्व, शैक्षणिक गुणवत्तेसाठीची कार्यशीलता आणि दूरदृष्टीपूर्ण धोरणांसाठी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाने राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्टता साधली आहे.

## भरत नाट्य संशोधन मंदिराची निवडणूक बिनविरोध





**पुणे :** भरत नाट्य संशोधन मंदिराची वार्षिक निवडणूक बिनविरोध झाली असून अध्यक्षपदी पांडुरंग मुखडे यांची तर उपाध्यक्षपदी भाग्यश्री देसाई यांची निवड झाली आहे. सुमारे १३१ वर्षांची अखंडित परंपरा असलेल्या भरत नाट्य संशोधन मंदिराची निवडणूक बिनविरोध होण्याची सलग दुसरी वेळ आहे.

भरत नाट्य संशोधन मंदिराची सर्वसाधारण सभा आणि वार्षिक निवडणूक भरत नाट्य मंदिर येथे झाली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मोहन मुळ्ये यांनी काम पाहिले. सन२०२५- २६ या वर्षासाठी पदाधिकारी निवड झाली आहे. कार्यकारिणीत अध्यक्ष - पांडुरंग मुखडे, उपाध्यक्ष - भाग्यश्री देसाई, विश्वस्त - अनिवाश ओगले, कार्याध्यक्ष - अभय जबडे, कार्योपाध्यक्ष - चारुलता पाटणकर, कार्यवाह - संजय डोळे, सहकार्यवाह - राजेंद्र उत्तुरकर, खजिनदार - अविनाश बेलसरे, नियामक मंडळ सदस्य - शंतनू खुर्जेकर, श्याम भुर्के, भक्ती पागे, कार्यकारी मंडळ सदस्य - प्रचिती सुरू-कुलकर्णी, विश्वास पांगारकर, राजन कुलकर्णी, प्रियांका गोगटे, अंतर्गत आयव्यय - अपर्णा पेंडसे यांचा समावेश आहे.

## सेवा शुल्कात दुप्पट वाढ

**पुणे :** जात प्रमाणपत्रे, उत्पन्न दाखला आणि अधिवास प्रमाणपत्रे यासह विविध प्रमाणपत्रांच्या शुल्कात वाढ झाली आहे. दरम्यान, दुप्पट, तिप्पट केलेल्या नवीन शुल्का वाढीमुळे विद्यार्थी आणि सामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

वाढलेल्या शुल्कामुळे विद्यार्थ्यांवर आर्थिक भार वाढला आहे. सध्या दहावी व बारावी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी विविध दाखल्यांची गरज लागते. त्यामुळे महा-ई-सेवा केंद्रांवर विद्यार्थ्यांची गर्दी होत आहे. सेवा केंद्रद्वारे सेवा अधिक सुलभ झाली असली तरी वाढीव शुल्कामुळे नागरिकांना आधीचे शुल्क भरावे लागत आहे.

जातीचे प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र आणि अधिवास प्रमाणपत्रांसह विविध प्रमाणपत्रे प्रवेशासाठी आवश्यक असतात. दरम्यान, अनेक वेळेस सेवा केंद्र चालकांकडून अधिकचे पैसे घेतले जातात. दरम्यान, यासाठी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांसाठी अधिक पैसे खर्च करावे लागत आहेत.

# सहकारी बँकांनी ग्राहकाभिमुख व्हावे- अजित पवार

## रामराज्य बँकेच्या मुख्य कार्यालय आणि बिबवेवाडी शाखेच्या वास्तूच्या कोनशीलेचे उद्‌घाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जागतिक, राष्ट्रीय, जिल्हा तसेच आणि सहकारी संस्था असे बँकांचे जाळे निर्माण झाले असून बँकिंग क्षेत्रात स्पर्धेच्या युगातील आमुलाग्र बदल विचारात घेता सहकारी बँकांनी ग्राहकाभिमुख व लोकाभिमुख झाले पाहिजे, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.

बिबवेवाडी येथे रामराज्य सहकारी बँकेच्या मुख्य कार्यालय आणि बिबवेवाडी शाखेच्या वास्तूच्या कोनशीलेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, आमदार चेतन तुपे, राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, रामराज्य सहकारी बँकेचे संस्थापक अॅड. सुभाष मोहिते, विजय मोहिते, अध्यक्षा नंदा लोणकर, उपाध्यक्ष शिरीष मोहिते, संचालक मंडळ परिसरातील मान्यवर उपस्थित होते.

पवार म्हणाले, राज्यात सहकारी चळवळ वाढविण्यामध्ये धनंजय गाडगीळ, विठ्ठलराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता, माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, वसंतराव नाईक, विलासराव देशमुख, शरद पवार यांचे मोठ्या प्रमाणात योगदान आहे. सहकारी बँकेने आपल्या व्यवहारात मानवी चेहरा देण्याचे काम केले आहे, सहकारी क्षेत्रातील बँकेने अपेक्षित उद्दिष्टांपेक्षा अधिक नफा मिळविण्यास प्रोत्साहन देण्याचा राज्य शासनाचा विचार आहे.





सध्या प्रचलित असलेल्या सहकार कायद्यात काळानुरूप बदल करण्याची गरज आहे. सहकार क्षेत्राशी निगडित असलेल्या प्रत्येक घटकाला न्याय देण्याचे काम सहकार कायद्यातून झाले पाहिजे. त्यासाठी कायद्यात प्रत्येक क्षेत्राशी निगडित नवीन 'प्रकरणे' दाखल करावी लागणार आहेत. सहकार कायद्यातील आवश्यक बदलांसाठी समितीची स्थापना करण्याचा निर्णय राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यावर सकारात्मक विचार करुन निर्णय घेण्यात येईल.

**-अजित पवार, उपमुख्यमंत्री**

रामराज्य सहकारी बँक मागील २५ वर्षापासून सर्वसामान्य नागरिकांना पुढे आणून त्यांची पत निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. यामध्ये संचालक मंडळ, सभासद कर्जदारांचे फार मोठे योगदान आहे. सभासदांचे हित जपणे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. बँकेने ठेवी वाढविण्यासोबत खात्रीलायक कर्जदार मिळविण्याकरिता प्रयत्न करावे. नागरिकांना पारदर्शक पद्धतीने सुलभ सेवा देण्याचा प्रयत्न करावा. बँकिंग व्यवसायात विश्वासर्हता जपणे गरजेचे आहे. तरुणांना संधी देऊन त्यांना बँकीग प्रशिक्षण देण्याचे काम करावे. थकीत कर्जाकडे बारकाईने लक्ष द्यावे. दिवसेंदिवस सायबर गुन्ह्याच्या प्रमाणात वाढ होत असून सहकारी बँकांनी राज्य सहकारी बँकेसोबत संलग्न झाले पाहिजे, असेही पवार म्हणाले.

संस्थापक विजय मोहिते यांनी प्रास्ताविकात रामराज्य सहकारी बँकेच्या शहरासह ग्रामीण भागात एकूण ८ शाखा असून नागरिकांना बँकिंग सुविधा पारदर्शक पद्धतीने देण्यात येत आहे, असे म्हणाले.

श्रीमती लोणकर यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले तर अॅड. मोहिते यांनी बँकेच्या वाटचालीबद्दल माहिती दिली.

# विद्यार्थ्यांचा आयटीआय प्रवेशाकडे कल

## दोनच दिवसात तब्बल चार हजार ऑनलाईन अर्ज दाखल

गेल्या काही वर्षांच्या कालावधीत दहावी आणि बारावीचाही निकाल अपेक्षेपेक्षाही अधिक चांगला लागत आहे; त्यातूनच विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढली असून त्या तुलनेत प्रवेशाचा टक्का कमी होत आहे. त्यामुळे चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे, विशेष म्हणजे शिक्षण घेऊनही नोकरी मिळण्याची शाश्वती नसल्याने बेरोजगारीचा गहन प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातूनच विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांमध्येही नाराजीचा सूर उमटत आहे; त्यातून मार्ग काढण्यासाठी आता विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनीच पुढाकार घेण्यास सुरुवात केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून नोकरीची हमी असलेल्या 'आयटीआय' ला सर्वाधिक पसंती मिळत आहे.



सध्याची नोकरीची परिस्थिती खूपच भयानक आहे, विशेष म्हणजे शिक्षण घेऊनही नोकरी मिळेल याची शाश्वती नाही. त्यामुळे आयटीआयचे प्रशिक्षण घेणे ही आता काळाची गरज बनली आहे; ही बाब लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्या पालकांनीही त्यांना ज्या क्षेत्रात स्वारस्य आहे त्याचे प्रशिक्षण घेण्याची आवश्यकता आहे.

**-शिवप्रसाद जठार,** उप शहर प्रमुख, युवासेना



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रोजगाराची संधी म्हणून आयटीआयकडे पाहिले जाते. पारंपरिक शिक्षणामुळे सध्या वाढत असलेली बेरोजगारी व नोकरीच्या कमी असलेल्या संधी यामुळे अनेक विद्यार्थ्यांचा आयटीआय प्रवेशाकडे कल वाढत आहे. गतवर्षी इलेक्ट्रीशियनच्या अभ्यासक्रमांना राज्यातील विद्यार्थ्यांनी पसंती दिली होती.व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या माध्यमातून विविध आयटीआय ट्रेडच्या ऑनलाइन प्रवेश नोंदणीला सुरुवात झाली असून दोनच दिवसात ४ हजार विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. येत्या २६ मेपासून विद्यार्थ्यांना पसंतीक्रम भरता येणार आहे.

या पाठोपाठ 'फिटर' 'वेल्डर' मेकॅनिक डिझेल अभ्यासक्रमांनाही प्रवेश घेतला होता. गतवर्षी पहिल्या यादीत गुणवंत विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रीशियन, मेकॅनिक डिझेल, फिटर, वेल्डर, वायरमन आदी अभ्यासक्रमांना पसंती दर्शवली होती. याबरोबरच संगणक ऑपरेटर आणि प्रोग्रामिंग असिस्टंट, मशिनिस्ट डिझेल, मोटर मॅकेनिक, इलेक्ट्रॉनिक्स मशिनिस्ट आदी अभ्यासक्रमांना विद्यार्थी प्राधान्य देत असल्याचे चित्र होते.

यावर्षी प्रवेशासाठी ४१९ शासकीय आयटीआय मध्ये ९३ हजार व ५८८ अशासकीय आयटीआय ६१ हजार अशा एकूण १ लाख ५४ हजार जागांवर प्रवेश होणार आहेत. एक वर्ष कालावधीचे ४४ अभ्यासक्रम व दोन वर्ष कालावधीचे ३६ अभ्यासक्रम असून प्रवेश अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरता येणार आहेत.

https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर अर्ज भरता येणार आहे तसेच प्रवेशासंबंधीची सविस्तर माहिती, नियमावली आणि मार्गदर्शक पुस्तिका देखील तेथे उपलब्ध आहे. यानंतर प्रथम फेरीसाठी आपल्या पसंतीचे व्यवसाय व संस्था निवडण्यासाठी आवश्यक ते पर्याय सादर करता येणार आहे.

यासाठी 'ऑप्शन फॉर्म' भरण्यास २६ मे पासून सुरुवात होणार आहे. गेल्या दोन दिवसात ४ हजार २१९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. यापैकी २ हजार ९३२ जणांनी आपला अर्ज अंतिम केला आहे. तर यापैकी २ हजार ६३१ विद्यार्थ्यांनी प्रवेश शुल्क भरले आहे.

प्रवेश अर्ज भरल्यानंतर सर्वसाधारण गुणवत्ता जाहीर होईल यानंतर विद्यार्थ्यांना हरकती नोंदविण्यासाठी मुदत दिली जाणार असून त्यानंतर अंतिम गुणवत्ता यादी जाहीर होईल. पहिली गुणवत्ता यादी जाहीर होणार आहे. यंदा दहावीचा निकाल लवकर जाहीर झाल्यामुळे नोंदणीची प्रक्रिया सुरु केली असून पुढील वेळापत्रक नंतर जाहीर केले जाणार आहे.

## सायेशा गोयल आंतरराष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धेत झळकली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** भारत – सेंट मेरीज ज्युनिअर कॉलेज, पुणेची १७ वर्षांची विद्यार्थिनी सायेशा राजेश गोयल हिने १२ ते १६ मे दरम्यान लंडन, युनायटेड किंगडम येथे झालेल्या इंग्लिश स्पीकिंग युनियनने आयोजित केलेल्या इंटरनॅशनल पब्लिक स्पीकिंग कॉंटेस्ट (IPSC) मध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले.

ही स्पर्धा जगभरातील ४७ देशांतील सहभागींसाठी अत्यंत प्रतिष्ठित मानली जाते. आपल्या देशात स्पर्धा देणाऱ्या १ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांमधून प्रत्येक देशातील एक विजेता निवडून अंतिम फेरीसाठी पाठवला जातो.

सायेशाने स्पर्धेदरम्यान भारताच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडवत एक सर्जनशील सादरीकरण सादर केले. तिने कापड, भरतकाम आणि पारंपरिक विणकामांचा वापर करत भारताच्या विविधतेतील एकतेचे प्रतीक दाखवले. उपस्थित सर्वांनी तिच्या सादरीकरणाची स्तुती केली.

स्पर्धेदरम्यान सहभागी विद्यार्थ्यांना लंडन शहराची सफर घडवण्यात आली आणि तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून वक्तृत्वाचे प्रशिक्षण देण्यात आले. उपांत्य फेरीमध्ये उत्स्फूर्त भाषणे व महात्मा गांधींच्या "खरी एकता ही तीव्र परीक्षा सहन करूनही तुटत नाही" या विधानावर आधारित पूर्वतयारी केलेले भाषण घेण्यात आले. सायेशाने दोन्ही फेऱ्यांत उत्कृष्ट कामगिरी करत अंतिम सहा स्पर्धकांमध्ये स्थान मिळवले.१६ मे रोजी सायेशाने लंडनमधील प्रतिष्ठित रॉयल इन्स्टिट्यूशन येथे अंतिम फेरीत विल्यम शेक्सपियरच्या "We know what we are, but not what we may be" या विषयावर प्रभावी भाषण सादर केले. तिचे भाषण डिप्लोमॅट्स, राजदूत आणि उपस्थित प्रेक्षकांनी उत्स्फूर्तपणे गौरवले.

सायेशाच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे तिला उपविजेतेपद मिळाले, ज्यामुळे भारताचे नाव जागतिक स्तरावर उजळले. स्पर्धेनंतर भारताच्या उच्चायुक्त कार्यालयातील सौ. निधी चौधरी यांनी सायेशाची भेट घेऊन अभिनंदन केले.

# लष्कराच्या पराक्रमाला पुणेकरांचा सलाम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जम्मू-काश्मीरमधील पहेलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या निष्पाप हिंदू नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आणि भारतीय लष्कराच्या पराक्रमाला सलाम करण्यासाठी आज रविवार, १८ मे रोजी पुण्यात 'तिरंगा यात्रा'चे आयोजन करण्यात आले. छत्रपती धर्मवीर संभाजी महाराज स्मारक येथून ज्ञानेश्वर पादुका चौकात समारोप सभा झाली.


पावसाच्या सरींना न जुमानता, हातात तिरंगा घेऊन, 'वंदे मातरम्', 'भारत माता की जय', 'दहशतवाद मुर्दाबाद' अशा घोषणांनी पुणेकरांनी रस्ते गाजवले. लहानांपासून वृद्धांपर्यंत सर्व वयोगटांतील नागरिकांनी कुटुंबासह उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

घाटे म्हणाले की, "ही यात्रा केवळ एक विरोध नाही तर आपल्या देशासाठी बलिदान दिलेल्या शहीदांना श्रद्धांजली देण्याची सामूहिक भावना आहे. समाज म्हणून एकत्र येऊन आपले कर्तव्य बजावण्याचा हा प्रयत्न आहे."

या यात्रेत सहभागी होताना गनबोटे आणि जगदाळे कुटुंबांनी स्वतःच्या दुःखावर मात करत समाजासाठी एकत्र उभे राहण्याचा प्रेरणादायी आदर्श घालून दिला. त्यांच्या देशभक्तीने उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू उभे केले.

एअर मार्शल बापट यांच्या प्रतिकात्मक संदेशात नमूद करण्यात आले की, "आत्मनिर्भर भारताच्या संरक्षण प्रणालीत ब्रह्मोस, आकाश आणि आकाश तीर क्षेपणास्त्रांनी पाकिस्तानला स्पष्ट संदेश दिला आहे. देशाला हात लावणाऱ्यांना आता योग्य उत्तर मिळते."

या तिरंगा यात्रेत केंद्रीय हवाई वाहतूक राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ, भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष धीरज घाटे , राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी , समाज कल्याण राज्य मंत्री माधुरी मिसाळ ,महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, आमदार सिद्धार्थ शिरोळे,भीमराव तापकीर ,हेमंत रासने , सुनील कांबळे , योगेश टिळेकर ,माजी आमदार जगदीश मुळीक, श्रीनाथ भिमाले,संदीप खर्डेकर, सरचिटणीस पुनीत जोशी ,राघवेंद्र मानकर , सुभाष जंगले, राहुल भंडारे ,प्रमोद कोंढरे, वर्षा तापकिर,गणेश कळमकर रवींद्र साळेगावकर यांच्या सह विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आता दहशतवाद सहन केला जाणार नाही. शहीदांचे बलिदान व्यर्थ जाऊ देणार नाही. भारताची भूमी आणि अस्मिता सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिक सज्ज आहे. ज्या प्रकारे पाकिस्तानवर हल्ला करून सडेतोड उत्तर दिले त्याच प्रकारे या पुढील काळात दहशतवाद संपवला जाईल.

**-मुरलीधर मोहोळ,केंद्रिय नागरी उड्डाण राज्यमंत्री**



# 'पीएमपीएमएल' च्या दरवाढीमुळे सर्वसामान्यांवर 'भार'



दरवाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्याची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सांभाळणाऱ्या पीएमपीएमएल ने तिकीट दरात मोठी वाढ केली आहे. संचालक मंडळाने याबाबत ठराव करून बसचा किमान तिकीटदर ५ रुपये ऐवजी १० रुपये केला आहे. तसेच दैनंदिन पास ४० रुपये वरून वाढवून ७० रुपये केला आहे आणि मासिक पास मध्ये ९०० रुपयावरून तब्बल १५०० रुपये पर्यंत दरवाढ केली आहे. ही दरवाढ सामान्य पुणेकरांची कंबर मोडणारी आहे. असे सांगत आज रविवार रोजी सकाळी आम आदमी पार्टी तर्फे पुणे येथे स्वारगेट चौकामध्ये जोरदार आंदोलन करण्यात आले.

प्रशासनाने वार्षिक तूट कमी करण्यासाठी आणि दर कीफायतशीर सुटसुटीत करण्यासाठी ही दरवाढ केल्याचे सांगितले होते. परंतु या दरवाढीमुळे मुख्यत्वे सामान्य माणूस व रोजंदारीवरील कामगारांना याचा फटका बसून खाजगी दुचाकी वाहने घेण्याकडे त्याचा कल राहील. त्यातून अधिकाधिक वाहतूक कोंडी व प्रदूषण होईल. पुणे शहराचा जागतिक वाहतूक कोंडीत चौथा नंबर आहे, असे असताना याविषयी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था कार्यक्षम करणे व अधिकाधिक प्रवासी याचा वापर करतील यासाठी प्रयत्न करणे हे प्रशासनाचे धोरण असायला हवे. २०१४ पासून दैनिक प्रवाशांचा आकडा हा दहा ते अकरा लाखाच्या दरम्यानच रेंगाळला आहे.

तूट कमी करण्यासाठी उत्पन्नाचे इतर मार्ग अधिक कार्यक्षमतेने वापरायला हवेत. मेट्रो साठीची एंड माईल कनेक्टिव्हिटी म्हणजे शेवटच्या टप्प्यातील प्रवासाच्या सुविधा द्यायला हव्यात, त्या ऐवजी ती जबाबदारी टाळण्याकडे पीएमपीएमएल आणि मेट्रोचा ही कल आहे. प्रशासनाने भ्रष्टाचार व अकार्यक्षमता असणाऱ्या बाबी दूर करीत अधिक बसेस रस्त्यावर आणायला हव्यात. यातून पुणे शहरातील वाहतूक कोंडी कमी होऊ शकते.

### सर्वसामान्य जनतेला सर्वाधिक फटका

- सध्या लक्झेमबर्ग, माल्टा, फ्रान्स इटली, ब्राझील आदी देशांमध्ये सार्वजनिक प्रवास हा मोफत करण्याचे धोरण आहे. आपल्याकडे महानगरपालिका ही तूट भरून काढत असताना म्हणजेच अप्रत्यक्षरीत्या सामान्य जनता याचे पैसे मोजत असताना प्रवाशांवर याचा बोजा देण्याची गरज नाही.



## स्वाती महाळंक यांचा सन्मान

**पुणे :** श्री देवदेवेश्वर संस्थान सारसबाग, पर्वती व कोथरूड यांच्यातर्फे ज्येष्ठ पत्रकार, लेखिका आणि आकाशवाणी पुणे केंद्राच्या ज्येष्ठ वृत्त निवेदिका स्वाती महाळंक यांना सारसबाग गणपती मंदिरामध्ये गौरविण्यात आले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून 'आकाशवाणी पुणे केंद्राची कार्यप्रणाली आणि मराठी साहित्य प्रसारातील योगदान' या विषयात पीएच. डी. प्राप्त केल्याबद्दल महाळंक यांना गौरविण्यात आले. याप्रसंगी मंदिराचे मुख्य विश्वस्त रमेश भागवत, विश्वस्त जगन्नाथ लडकत, उपमहाव्यवस्थापक श्रीधर कुलकर्णी आदी उपस्थित होते.



## इसिस स्लीपर मॉड्यूलप्रकरणी दोनजणांना अटक

**पुणे :** राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) पुण्यातील इसिस स्लीपर मॉड्यूलप्रकरणी दोन फरार आरोपींना मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून अटक केली आहे. अब्दुल्ला फैयाज शेख ऊर्फ डायपरवाला आणि तलग खान अशी या दोघांची नावे आहेत. हे दोघेही इंडोनेशियातील जकार्ता येथे लपून बसले होते आणि भारतात परतण्याच्या प्रयत्नात होते.

ब्यूरो ऑफ इमिग्रेशनच्या अधिकाऱ्यांनी टर्मिनल दोनवर त्यांना ओळखले आणि 'एनआयए'च्या ताब्यात दिले. या दोघांवर 'एनआयए'च्या विशेष न्यायालयाने अजामीनपात्र वॉरंट जारी केले होते. त्यांच्या अटकेसाठी प्रत्येकी तीन लाख रुपयांचे बक्षीसही जाहीर केले होते.

या दोघांसह एकूण १० आरोपी भारतात दहशत निर्माण करून 'इसिस'च्या कटात सहभागी आहेत. देशातील शांतता आणि सामाजिक सलोखा बिघडविण्याचा प्रयत्न केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. 'एनआयए'ने यापूर्वीच त्यांच्यावर यूएपीए, स्फोटक पदार्थ अधिनियम, शस्त्र अधिनियम आणि भारतीय दंडसंहितेच्या विविध कलमांअंतर्गत आरोपपत्र दाखल केले आहे. यापूर्वी महम्मद इम्रान खान, महम्मद युनूस साकी, अब्दुल कादीर पठाण, सिमाब नसिरुद्दीन काजी, झुल्फिकार अली बारोदवाला, शमिल नाचन, आकिफ नाचन आणि शहानवाज आलम यांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणात आणखी काही धागेदोरे मिळण्याची शक्यता आहे.




## एक जिल्हा-एक नोंदणी उपक्रम सुरू

**पुणे :** एक जिल्हा-एक नोंदणी' धोरणामुळे जिल्ह्यातील कोणत्याही गावांतील दस्त शहरातील ग्रामीण भागातील कोणत्याही दुय्यम निबंध कार्यालयामध्ये नोंदविता येणार आहेत. या सुविधेला सुरुवात झाली आहे. त्यानुसार सुटीच्या दिवशी म्हणजे शनिवारी आणि रविवारीही ठरावीक पाच दुय्यम निबंध कार्यालयांत मिळकतींच्या व्यवहारांची दस्तनोंदणी करता येणार आहे,' असे सहजिल्हा निबंधक संतोष हिंगाणे यांनी सांगितले. एक जिल्हा-एक नोंदणी' या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील मिळकतींच्या व्यवहारांची दस्तनोंदणी शहरात सुटीच्या दिवशी म्हणजे शनिवार आणि रविवारही करता येणार आहे. शहरातील पाच दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये ही सुविधा सुरू झाली आहे. त्यामुळे शहरासह जिल्ह्यातून दस्तनोंदणीसाठी येणाऱ्या नागरिकांना या सुविधाचा लाभ मिळणार आहे.

शहरासह जिल्ह्यातील औद्योगिकीकरण, माहिती आणि तंत्रज्ञान कंपन्यांमुळे वेगाने नागरीकरण होत आहे.

## सकल मातंग समाजाचे आक्रोश महाआंदोलन

**पुणे :** अनुसूचित जातींमधील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या दुर्बल घटकांना न्याय मिळावा यासाठी *सकल मातंग समाज महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने"आक्रोश महाआंदोलन आयोजित करण्यात आले आहे. हे आंदोलन २० मे २०२५ रोजी, मुंबईच्या आझाद मैदानात दुपारी १ ला होणार आहे.

या आंदोलनाचा मुख्य उद्देश म्हणजे अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करून ते येत्या जून २०२५ पासून लागू करवे. उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जातींमधील दुर्लक्षित घटकांना शैक्षणिक संधी, शासकीय नोकरी व योजनांचा थेट लाभ मिळू शकेल.

विधानपरिषदेचे आमदार अमित गोरखे, आमदार सुनील कांबळे, आमदार जितेश अंतापूरकर, माजी आमदार. मधुकरराव घाटे, माजी आमदार नामदेव जयराम ससाणे, माजी मंत्री रमेश बागवे, माजी मंत्री दिलीप कांबळे,आण्णाभाऊ साठेंचे नातू सचिन साठे, माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे, याशिवाय, पंडित सूर्यवंशी , मारुती वाडेकर, अशोक लोखंडे, राम चव्हाण यांसारखे अनेक नेते आंदोलनात सहभागी होणार आहेत.

## अतिक्रमणावर 'हातोडा'...!



**पुणे** गेल्या काही महिन्यांच्या कालावधीत शहरात अतीक्रमणांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे; त्यामुळे महत्त्वाच्या रस्त्यावर वाहतूक कोंडी वाढली असून महापालिका प्रशासन आणि वाहतूक पोलीसांचीही डोकेदुखी वाढली आहे. त्यामुळे या अतीक्रमणावर महापालिका प्रशासनाने कारवाई सुरु केली आहे, गेल्या दोन दिवसात प्रशासनाच्या अतीक्रमण विभागाने शहराच्या विविध भागात धडक कारवाई करत ही अतीक्रमणे हटविली.

## भाडेकरुची माहिती न दिल्यास मालकावर होणार कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) गृहप्रकल्पात असणाऱ्या भाडेकरूंची माहिती मूळ घरमालकांनी द्यावी, असे आवाहन पीएमआरडीएच्या वतीने करण्यात आले आहे. पीएमआरडीएच्या सेक्टर १२ मधील अनेक सदनिका भाडेतत्वावर देण्यात आल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने पीएमआरडीए प्रशासनाने हे आवाहन केले आहे. सोसायटीतील किती सदनिकांमध्ये भाडेकरू राहत आहेत, तशी माहिती कळवावी, असे पत्र गृहप्रकल्पातील प्रत्येक सोसायटीधारकांना काढले आहे.

पीएमआरडीएने उभारलेल्या गृहप्रकल्पात सदनिका या लॉटरीच्या माध्यमातून लाभार्थ्यांना देण्यात आल्या आहेत. प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत या घरांचे वाटप करण्यात आले. दरम्यान, यापैकी अनेक सदनिकांचे वाटप केल्यानंतर सर्रासपणे भाड्याने दिले जात असल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकल्पातील जवळपास ६० टक्क्यांहून अधिक सदनिका या भाडेतत्वावर देण्यात आल्या आहेत.

# वाहतूक पोलिसांचा आता 'तिसरा डोळा'

### बेशिस्त वाहतूकीवर 'एआय' ची नजर: नियमभंग करणे पडणार महागात

■ **गोखले रस्त्यावर AI ची चाचणी**

पुण्यातील गोखले रस्त्यावर हे AI-आधारित उपकरण प्रायोगिक तत्त्वावर बसवण्यात आले आहे. यशस्वी चाचणीनंतर या तंत्रज्ञानाचा वापर संपूर्ण पुणे शहरात केला जाणार आहे. हे उपकरण हैदराबाद येथील एका कंपनीने विकसित केल्याची माहिती आहे. या उपकरणाद्वारे रस्त्यावरील वाहतुकीवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे पोलिसांनी वाहतूक व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी हा पथदर्शी उपक्रम हाती घेतला आहे. शहरातील वाहतूक कोंडी आणि नियमांचे उल्लंघन रोखण्यासाठी एक आय तंत्रज्ञानाचा वापर हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो आहे. या उपक्रमामुळे वाहतूक नियमांचे पालन करणे आणि रस्ते सुरक्षित ठेवणे सोपे होईल, असा विश्वास पोलिसांना आहे. तसेच पुणे पोलिसांनी नागरिकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आणि अनधिकृत पार्किंग टाळण्याचे आवाहन केले आहे.

आता वाहतूक नियम मोडून पोलिसांची नजर चुकवणे चांगलेच महागात पडणार आहे. कारण पुणे पोलिसांनी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी एआय चा ( कृत्रिम बुद्धिमत्ता) वापर सुरू केला आहे. या अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे नियम मोडणाऱ्यांना सहजासहजी सुटका मिळणार नाही.

पुण्यातील गोखले रस्त्यावर हे एआय-आधारित उपकरण प्रायोगिक तत्त्वावर बसवण्यात आले आहे. यशस्वी चाचणीनंतर या तंत्रज्ञानाचा वापर संपूर्ण पुणे शहरात केला जाणार आहे. हे उपकरण हैदराबाद येथील एका कंपनीने विकसित केल्याची माहिती आहे. या उपकरणाद्वारे रस्त्यावरील वाहतुकीवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे.

हे एआय तंत्रज्ञान वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना शोधण्यासाठी अत्यंत प्रभावी ठरणार आहे. विशेषतः पोलिसांची नजर चुकवून नियम मोडणाऱ्यांना याचा मोठा फटका बसणार आहे. या उपकरणाद्वारे रस्त्यावर अनधिकृतपणे वाहने पार्क करणे, वाहन रस्त्यावर लावून हॉटेल किंवा इतर ठिकाणी जाणे, जड वाहतुकीमुळे होणारा अडथळा,वाहतुकीला अडथळा निर्माण करणारी कोणतीही कृती करणाऱ्यावर कारवाई केली जाणार आहे.

प्राथमिक माहितीनुसार, हे एआय उपकरण नियम मोडणाऱ्या वाहनांची नंबर प्लेट स्कॅन करेल आणि संबंधित वाहनचालकाला थेट चालान पाठवले जाईल. सध्या गोखले रस्ता ते फर्ग्युसन कॉलेज रस्त्यापर्यंतच्या भागात अनधिकृत पार्किंग करणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई सुरू झाली आहे.

**अशी बेशिस्त नको रे बाबा...!**

- रस्त्यावर अनधिकृतपणे वाहने पार्क करणे
- वाहन रस्त्यावर लावून हॉटेल किंवा इतर ठिकाणी जाणे
- जड वाहतुकीमुळे होणारा अडथळा
- वाहतुकीला अडथळा निर्माण करणारी कोणतीही कृती करणाऱ्यावर कारवाई
- हे AI उपकरण नियम मोडणाऱ्या वाहनांची नंबर प्लेट स्कॅन करेल आणि संबंधित वाहनचालकाला थेट चालान पाठवणार
- गोखले रस्ता ते फर्ग्युसन कॉलेज रस्त्यापर्यंतच्या भागात अनधिकृत पार्किंग करणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई सुरू

## 'पोर्शे' कार अपघाताचा खटला जलदगतीने

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यातील कल्याणीनगर भागात झालेल्या पोर्शे कार अपघात प्रकरणात आता नवी माहिती समोर आली आहे. 'पोर्शे' कार अपघात प्रकरणाचा खटला जलदगतीने चालवण्यासाठी पुणे पोलिसांनी न्यायालयात पत्र दाखल केलं आहे. या प्रकरणात अल्पवयीन कारचालकासह त्याच्या दोन अल्पवयीन मित्रांच्या रक्ताचे नमुने बदलून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी आरोपी विरोधातील खटला जलदगतीने चालवावा, अशी विनती पुणे पोलिसांनी जिल्हा न्यायालय प्रशासनाकडे केली आहे.

दरम्यान, या प्रकरणातील सर्व दहा आरोपीविरोधात आरोपपत्र दाखल केले आहे. आरोप निश्चितीसाठीचा मसुदाही विशेष सरकारी वकिलांनी दाखल केला आहे. तर बचाव पक्षातर्फे जामीन व निर्दोष मुक्ततेसाठीच्या अर्जावरील सुनावणी प्रलंबित असल्याने, आरोप निश्चिती करून खटल्याच्या सुनावणीला वेळ लागत आहे. या प्रकरणांमध्ये निर्दोष मुक्ततेसाठी आरोपी डॉक्टर अजय तावरे यांनी अर्ज केला आहे. त्यावर वीस तारखेला सुनावणी होणार आहे. तर आरोपी आदित्य सूद याची सुनावणी १९ मे रोजी होणारा आहे. या प्रकरणात शिवानी अग्रवाल हिला या अगोदर जामीन मंजूर करण्यात आला आहे. तर आरोपी विरोधात आरोप निश्चित करून कालबद्ध कार्यक्रम निश्चित करावा, असा अर्ज विशेष सरकारी वकील यांनी न्यायालयाकडे सादर केला आहे.

पुण्यातील बांधकाम व्यावसायिकाच्या १७ वर्षाच्या अल्पवयीन मुलानं दारुच्या नशेत भरधाव वेगानं आलिशान पोर्शे गाडीने दुचाकीला धडक दिली होती. यामध्ये दोन आयटी अभियंत्यांचा जागीच मृत्यू झाला. अनिश अवधिया (२७ वर्षे) आणि अश्विनी कोष्टा अशी अपघातामध्ये जागीच मृत्यू झालेल्यांची नावे होती. पुण्यातील कल्याणीनगरमध्ये झालेल्या अपघातात पोर्शे गाडीचा वेग इतका भरधाव होता की अश्विनी कोस्टा या १५ फूट दूर फेकली गेली.

त्यानंतर पोलिसांनी त्या अल्पवयीन आरोपीला ताब्यात घेतलं. पण आरोपी अल्पवयीन असल्याने त्याला बालन्याय मंडळासमोर उभं करण्यात आलं. बालन्याय मंडळाने त्या अल्पवयीन मुलाला ३०० शब्दांचा निबंध लिहिण्याची आणि इतर काही थातूरमातून शिक्षा दिल्या आणि जामीन मंजूर केला होता.

कल्याणीनगर अपघात प्रकरणात पोर्शे कार चालक अल्पवयीन मुलाला घटनेच्या अवघ्या १५ तासात ३०० शब्दांचा निबंध लेखनासह विविध अटी घालत जामीन मंजूर करण्यात आला होता.

## श्रामणेर प्रशिक्षणार्थींची मोफत आरोग्य तपासणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारतीय बौद्ध महासभा पुणे या संस्थेच्या आरोग्य विभाग मार्फत धम्मक्रांती बुद्ध विहार, गांधी नगर, येरवडा.येथे श्रामणेर प्रशिक्षणार्थी यांची आरोग्य तपासणी करण्यात आणि गरजू लाभार्थ्यांना उपचार व सल्ला देण्यांत आला.

डॉ. ज्योती दवे यांनी आरोग्य तपासणी पूर्वी आजार होऊ नयेत म्हणून घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले.डॉ. सुरेश कठाणे यांनी तपासणी करून रक्तवर्धक, शक्तीवर्धक श्रामणेर प्रशिक्षणार्थी यांना दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव संदीप सोनवणे यांनी केले संस्थेचे विश्वस्त अध्यक्ष के.बी. मोटघरे यांनी शिबिरार्थी यांना मार्गदर्शन केले. संस्थेचे पुणे शहर अध्यक्ष दिलीप धाईजेसर सुत्र संचालन केले

याप्रसंगी ॲड.सुभाष. आल्हाट, मधूकर हरीभक्त, राजेश माने,अनिल कांबळे,समता सैनिक दलाचे जिल्हाध्यक्ष एन.जी.शिंदे , अशोक धोंडीबा औचरे, चंद्रकांत कांबळे इत्यादी उपस्थित होते.



**पुणे** भारतीय बौद्ध महासभा पुणे या संस्थेच्या आरोग्य विभाग मार्फत धम्मक्रांती बुद्ध विहार, गांधी नगर, येरवडा.येथे श्रामणेर प्रशिक्षणार्थी यांची आरोग्य तपासणी करण्यात आणि गरजू लाभार्थ्यांना उपचार व सल्ला देण्यांत आला.

# विद्यार्थ्यांनो, आत्मविश्वास गमावू नका; मोकळेपणाने बोला




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे** दहावी व बारावीचा टप्पा करिअरच्या दृष्टीने महत्वाचा असला, तरी या परीक्षांमधील निकाल सर्वस्वी नसतो. त्यामुळे दहावी-बारावीच्या परीक्षेत अपयश आले किंवा कमी गुण मिळाले म्हणून विद्यार्थ्यांनी निराश होऊ नये. आपला आत्मविश्वास न गमावता मोकळेपणाने बोलून अन्य पर्यायांची माहिती करून घ्यावी, असे आवाहन आत्महत्या प्रतिबंधासाठी कार्यरत कनेक्टिंग ट्रस्ट संस्थेच्या वतीने करण्यात आले. कनेक्टिंग ट्रस्टतर्फे विद्यार्थ्यांशी बोलण्यासाठी निःशुल्क भावनिक आधार सुविधा आठवड्याचे सातही दिवस उपलब्ध आहे. सकाळी १० ते रात्री ८ पर्यंत या वेळेत ९९२२००४३०५ आणि ९९२२००११२२ या हेल्पलाइनवर विद्यार्थ्यांना आपल्या भावना व्यक्त करता येतील. लिखाणाच्या माध्यमातून व्यक्त होऊ इच्छिणाऱ्यांनी distressmailsconnecting@gmail.com यावर त्यांची समस्या लिहून पाठवता येईल, असे प्रकल्प समन्वयक विक्रमसिंह पवार यांनी नमूद केले.

विक्रमसिंह पवार म्हणाले, "नुकतेच इयत्ता १०वी आणि १२वीचे बोर्डाचे निकाल जाहीर झाले. अनेकांना चांगले गुण मिळाले, तर काहींना कमी मिळाले. काहींच्या पदरी निराशा आली. घरच्यांकडून, समवयस्कांकडून आणि बऱ्याचदा स्वतःकडूनही अनावधानाने होणारी इतरांशी तुलना यामुळे बहुतांश विद्यार्थी आणि तरुणांचा आत्मविश्वास कमी होतो. जीवनात आपण कधीच यशस्वी होऊ शकणार नाही का? या प्रश्नासह न्यूनगंडाची भावना बळावते आणि त्याचे रूपांतर निराशेत होऊन जीवन नकोसे वाटू लागते. विद्यार्थी टोकाची भूमिका घेतात. अशावेळी त्यांना भावनिक ताणतणावात संवेदनशीलपणे ऐकून घेणारा आधार मिळाला, तर चुकीच्या घटना थांबवणे शक्य होते.

> गेल्या काही वर्षात भारतात विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या संख्येत विलक्षण वाढ झाल्याचे दिसते. काही विश्वासार्ह अहवालांच्या मते हा आकडा शेतकऱ्यांच्या आत्महत्यांपेक्षाही जास्त आहे. या परिस्थितीला तोंड द्यायला केवळ जनजागृती पुरेशी नाही. विद्यार्थ्यांसाठी संवेदनशील भावनिक आधार प्रणाली असणे गरजेचे आहे. जिथे ते त्यांच्या समस्यांविषयी आणि भावनांविषयी निःसंकोचपणे बोलू शकतील.
>
> **-विक्रमसिंह पवार,** प्रकल्प समन्वयक

# भीमनगरच्या रहिवाशांना आहे त्याच ठिकाणी घरे द्या -मेधा पाटकर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** झोपडपट्टी पुनर्वसनासाठी पौड रस्ता येथील भीमनगरच्या रहिवाशांची सहमती नसताना देखील घरे खाली करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिलेली नोटीस मागे घ्यावी. भीमनगरवासीयांना आहे त्याच ठिकाणी घरे देऊन योग्य न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी जेष्ठ समाजसेविका मेधा पाटकर यांनी केली आहे.

भीमनगर वाचविण्यासाठी रिपब्लिकन युवा मोर्चाचे अध्यक्ष राहुल डंबाळे यांनी केलेल्या आवाहनानुसार मेधा पाटकर यांनी भीमनगरला भेट देऊन भीमनगरवासीयांच्या भावना आणि अडचणी जाणून घेतल्या. न्यायासाठी त्यांनी सुरू केलेल्या आंदोलनाला पाटकर यांनी पाठिंबा व्यक्त केला. यावेळी देविदास ओहाळ यांच्यासह स्थानिक रहिवासी उपस्थित होते.


भीमनगरच्या पुनर्वसनासाठी भक्ती इंटरप्राईजेस या संस्थेने भीमनगर वासियांना मोठमोठी आश्वासने दिली. आहे त्याच जागेवर चांगली घरे देण्याचे मान्य केले. प्रत्यक्षात नियमाप्रमाणे वस्तीतील ७० टक्के कुटुंबांची सहमती मिळण्यापूर्वीच ५० कुटुंबांना वारजे येथे पाठवण्यात आले. त्यापैकी पंधरा कुटुंब भीम नगर मध्ये परत आली. या कुटुंबांना ज्या ठिकाणी पाठविण्यात आले, ती इमारत सदर विकासकाने नव्हे तर महापालिकेने बांधलेली असल्यामुळे उर्वरित ३५ कुटुंबांना जागा खाली करण्याची नोटीस देण्यात आली. एक प्रकारे ही भीमनगरवासियांची फसवणूकच आहे, अशी टीका पाटकर यांनी केली.

झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांमध्ये सर्वात मोठा घोटाळा हा विकास हक्क हस्तांतरणात केला जातो. विकास मोक्याच्या जागा ताब्यात घेऊन गरिबांना दूर कुठेतरी नेऊन टाकतात. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात घर मिळवण्यासाठी पात्र, अपात्र ठरवताना काही अपात्रांना पात्र तर पात्रांना अपात्र ठरविले जाते, याकडे पाटकर यांनी लक्ष वेधले. त्यावर, काही राजकीय नेते आणि महापालिका अधिकारी यांच्याशी संगणमत करून विकासकाने घरे न बांधताच शेकडो कोटीचा टीडीआर घोटाळा केल्याचे भीमनगरच्या रहिवाशांनी पाटकर यांच्या निदर्शनास आणून दिले.

ज्याप्रमाणे जुन्या गृहनिर्माण संस्थांना पुनर्विकासाचा अधिकार आहे त्याचप्रमाणे नागरवस्त्यांना देखील स्वयंव विकासाचा हक्क आहे. मात्र, पुढारी, अधिकारी आणि विकासक यांची अभद्र युती हा हक्क झोपडवासियांना मिळू देत नाहीत, याकडे पाटकर यांनी लक्ष वेधले.

भीमनगरच्या आंदोलक आणि रहिवाशांना आपला पाठिंबा जाहीर करून पाटकर म्हणाल्या की, भीमनगरमधील रहिवाशांपैकी 90 टक्के रहिवासी दलित आणि कष्टकरी आहेत. ते संविधानाला अनुसरून न्याय मिळवण्यासाठी आंदोलन करीत आहेत. त्यांच्यावर अन्याय होता कामा नये. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे महापालिका, तक्रार निवारण प्राधिकरण आणि महाराष्ट्र शासनाचा नगर विकास विभाग यांच्याकडून त्यांना न्याय मिळावा, अशी मागणी देखील मेधा पाटकर यांनी केली.

या प्रसंगी स्थानिक राहिवाश्यांनी आपल्या अडचणी मांडल्या, तसेच जे विस्थापित नवीन ठिकाणी राहायला गेले त्यांना येणाऱ्या समस्या ही यावेळी मांडण्यात आल्या.



> भीमनगर ही राज्यातील एकमेव वस्ती अशी आहे की त्या जागेचा सात - बारा रहिवाशांच्या नावे आहे, तरीही स्थानिक पुढारी, एसआरए मधील भ्रष्ट अधिकारी आणि महापालिका प्रशासन संगणमताने ही जागा बिल्डरच्या घशात घालून स्थानिकांना विस्थापित करत आहेत. या प्रकरणात सर्व संबंधित अधिकारी, बिल्डरवर अॅट्रॉसिटी गुन्हा दखल करावा.
>
> **-राहुल डंबाळे,** अध्यक्ष, रिपब्लिकन युवा मोर्चा



# भूमि अभिलेख कामकाजात सुसूत्रता

## ग्रामीण हद्दीतील गावे शहरी नगर भूमापनला जोडणार

### पिंपरी-चिंचवड नगर भूमापन कार्यालय क्षेत्राचा विस्तार...

पिंपरी-चिंचवड महानगर पालिका हद्दीत हवेली तालुक्यातील एकूण ३० गावे आणि मुळशी तालुक्यातील ३ गावांचा समावेश नगर भूमापन अधिकारी कार्यालयाअंतर्गत करण्यात येणार आहे. त्यापैकी १२ गावांचे पूर्ण क्षेत्र आणि किवळे, रावेत, मोशी, चिखली, देहू, तळवडे या ६गावांतील अंशत: क्षेत्र व मुळशी तालुक्यातील वाकड असे एकूण ७ गावांतील अंशत: क्षेत्राचा समावेश आहे. यापैकी ११ गावांचा पूर्णत: समावेश करण्यात येणार आहे. याबाबत लवकरच राज्य शासनाच्या स्तरावर अधिसूचना निर्गमित करण्यात येणार आहे.



> पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना जमीन मोजणीकरिता तसेच प्रॉपर्टी कार्ड या कामासाठी हवेली भूमीलेख कार्यालयामध्ये जावे लागते. त्यामुळे नागरिकांची पायपीट होऊन आर्थिक वेळेचे नुकसान होते सर्वांना एकाच ठिकाणी सर्व सरकारी सुविधा मिळण्याकरिता सोयीचे होईल. यासंदर्भात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्याचे जमाबंदी आयुक्त यांना तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.
>
> **- महेश लांडगे,** आमदार, भाजपा,भोसरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** भूमी अभिलेख कार्यालय ता. हवेली जि. पुणे अंतर्गत येणारी पुणे ग्रामीण हद्दीतील काही गावे शहरी नगर भूमापन कार्यालय पिंपरी-चिंचवड यांचेशी संलग्न करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. त्यामुळे शहरातील भूमि अभिलेख संदर्भातील कामकाजात गतीमानता आणि सूसुत्रता येणार आहे.

विशेष म्हणजे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका स्थापन झाल्यापासून भूमापन व भूमिअभिलेख कार्यालयाची सूसुत्रता करावी, अशी मागणी प्रलंबित होती. त्याला आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्यामुळे यश मिळाले आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका परिसरातील ग्रामीण हद्दीतील गावे नगर भूमापन कार्यालयाशी संलग्न करावी करावीत, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी मुंबई येथील विधीमंडळ अधिवेशन दरम्यान राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली होती. याबाबत महसूल मंत्री बावनकुळे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली आणि जमाबंदी आयुक्त यांना सात दिवसांत प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहेत. प्रस्ताव प्राप्त करुन शासन निर्णय निर्गमित केले करण्यात येणार आहे.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, भूमि अभिलेख हवेली कार्यालयात क्षेत्रात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील काही गावे यापूर्वी येत होती. मागील काही कालावधीमध्ये काही गावे अभिलेख सहीत पिंपरी-चिंचवड तहसील कार्यालयाअंतर्गत संलग्न केलेली आहेत. त्याचप्रमाणे भूमी अभिलेख हवेली कार्यालयातील उर्वरित गावे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत असून, सदर गावे नगर भूमापन कार्यालय पिंपरी-चिंचवड या कार्यालयाशी संलग्न करण्यात यावे, अशी मागणी आम्ही केली होती. त्याला यश मिळाले आहे.

शहरातील बोपखेल, दिघी, वडमुखवाडी, चऱ्होली, चोवीसावाडी, डूडूळगाव, मोशी, चिखली, देहु, किन्हई, रावेत, मामुर्डी, किवळे आदी गावे नगर भूमापन अभिलेख पिंपरी-चिंचवड कार्यालयाशी संलग्न करण्यात येणार आहेत.

# पुणे; पिंपरी-चिंचवडसाठी 'पीएमपी'चे तीन नवे मार्ग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महानगर परिवहन महामंडळ कडून प्रवाशांच्या वाढत्या मागणीला प्रतिसाद देत तीन नवीन बसमार्गांची सुरुवात करण्यात आली असून, एका विद्यमान बसमार्गाचा विस्तार करण्यात आला आहे.

या निर्णयामुळे शहरातील विविध भागांमध्ये प्रवास करणाऱ्या नागरिकांना अधिक सुलभ, नियमित आणि सहज उपलब्ध सार्वजनिक वाहतूक सेवा मिळणार आहे.

**नवीन बसमार्गांची माहिती पुढीलप्रमाणे :**

बसमार्ग क्रमांक ७९ - हिंजवडी (माण) फेज ३ ते डेक्कन जिमखाना

या मार्गावरील बस हिंजवडी फेज ३ येथून सुरुवात करून इन्फोसिस फेज २, शिवाजी चौक, वाकड ब्रिज, सुतारवाडी, बावधन, चांदणी चौक, कोथरूड डेपो, वनाज कंपनी, एस.एन.डी.टी. कॉलेजमार्गे डेक्कन जिमखान्यापर्यंत धावणार आहे.

**बसेसची संख्या : २**

वारंवारिता : दर १ तास ४० मिनिटांनी

बसमार्ग क्रमांक ३१८ - पुणे स्टेशन ते कृष्णानगर

पुणे स्टेशनहून आरटीओ, सिमला ऑफिस, औंध गाव, काळेवाडी फाटा, केएसबी चौक, घरकुल वसाहत चिखली, साने चौक मार्गे ही बस कृष्णानगरपर्यंत प्रवास करेल.

**बसेसची संख्या : २**

वारंवारिता : दर १ तास २० मिनिटांनी

बसमार्ग क्रमांक वाय-३८ - भोसरी ते तुळापुर (फक्त रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी)

या मार्गावरील बस भोसरी येथून शास्त्री चौक, थोरल्या पादुका मंदिर, देहू फाटा, आळंदी, सोळूगाव, वडगाव शिंदे फाटा, मरकळ गाव मार्गे थेट तुळापुर या ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळापर्यंत धावणार आहे.

**बसेसची संख्या : २**

वारंवारिता : दर १ तास १५ मिनिटांनी

**विस्तारित बससेवा** :

बसमार्ग क्रमांक २९७ - राजस सोसायटी ते शिवाजीनगर रेल्वे स्टेशन (मार्ग विस्तार)

यापूर्वी स्वारगेटपर्यंत चालणारी ही बस सेवा आता शिवाजीनगर रेल्वे स्टेशनपर्यंत विस्तारित करण्यात आली आहे. राजस सोसायटी येथून सुरू होणारी ही बस आता कात्रज, बालाजी नगर, स्वारगेट, अ.ब. चौक, शनिवार वाडा, सिमला ऑफिस मार्गे थेट शिवाजीनगर रेल्वे स्टेशनपर्यंत पोहोचेल.

बसेसची संख्या : १ वारंवारिता : दर २ तासांनी

## युट्यूब, इन्स्टाग्रामसह वाढवा व्यवसाय

**पुणे :** स्वतःचा उद्योग, व्यवसाय, व्यापार पुढील स्तरावर नेण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी चार तासांची ऑनलाइन कार्यशाळा २२ व २३ मे रोजी आयोजिली आहे. कार्यशाळेत स्वतःच्या उद्योग-व्यवसायाचा ब्रँड वाढवण्यासाठी युट्युब आणि इन्स्टाग्राम कसे वापरायचे, प्लॅटफॉर्म अल्गोरिदम, ट्रेंड आणि सामग्री निर्मिती (कन्टेन्ट क्रिएशन) समजून घेऊन शूटिंग, संपादन (एडिटिंग) आणि अपलोडिंग कसे करायचे याबाबत प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात येणार आहे. उत्पादन टॅगिंगद्वारे पैसे कसे कमवायचे आणि ब्रँड व्हॅल्यू कशी वाढवायची, विविध यशोगाथा आणि भविष्यातील ट्रेंडपासून प्रेरणा कशी घ्यायची याबाबतही उपयुक्त माहिती दिली जाणार आहे. स्वतःच्या व्यवसायाची ऑनलाइन माध्यमांचा वापर करून भरभराट करण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी सुवर्णसंधी मिळवून देणारी ही कार्यशाळा असणार आहे.



## सरकारी इस्टिमेशन प्रशिक्षण शिबीराचे आयोजन

**पुणे :** शासकीय कामांचे मूल्यनिर्धारण, इस्टिमेशन हे बांधकाम, स्थापत्य विभागातील, कॉन्ट्रॅक्टर, विद्यार्थ्यांना उपयुक्त असे प्रशिक्षण २४ मे रोजी आयोजिले आहे. प्रशिक्षणात पीडब्ल्यूडी, एसएसआर, रेट, नियमावली, टेस्टिंग, मेजरमेंट शीट, रेट तपासणी, चार्ट, इस्टिमेशन सॉफ्टवेअर व इस्टिमेशन बनविणे, तयार करणे, समाज मंदिर, सभा मंडप, शाळा, अंगणवाडी, सुरक्षाभिंत आशा प्रकारचे कामे व इस्टिमेशन आदींबाबत मार्गदर्शन करण्यात येईल.



## गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रशिक्षण ६ जूनपासून

**पुणे :** सोसायटी मॅनेजर या करिअर संधीविषयीचे तीन दिवसीय प्रमाणपत्र प्रशिक्षण एसआयआयएलसी आणि पुणे हाउसिंग फेडरेशनच्या संयुक्त विद्यमाने ६, ७ व ८ जूनला आयोजिले आहे. यामध्ये सोसायटी मॅनेजरची कर्तव्ये, प्रोफाइल आणि जबाबदाऱ्या, मॅनेजिंग कमिटी अजेंडा व मिनिट्स लेखन, गृहनिर्माण संस्थेतील शेअर्स आणि व्याजाचे हस्तांतर, देखभाल बिले तयार करणे, टीडीएस भरणे, ऑडिटसाठी चेकलिस्ट, लेखापरीक्षण अहवाल तयार करणे, सोसायटीचे वार्षिक विवरणपत्र सादर करणे आदी विषयांचा समावेश आहे. प्रशिक्षणार्थींना प्रात्यक्षिक अनुभवाची संधीही दिली जाणार आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यास गृहनिर्माण संस्थांमध्ये सोसायटी व्यवस्थापक म्हणून अर्धवेळ किंवा पूर्णवेळ करिअर संधी उपलब्ध होऊ शकते अथवा गृहनिर्माण संस्थांना विविध सेवा देऊन स्वतःचा व्यवसाय सुरू करता येऊ शकतो.

# 'घर असावे घरासारखे...' कवीसंमेलनाला दाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** जागतिक कुटुंबदिनाचे औचित्य साधून कर्मयोगिनी महिला संस्था - पिंपरी चिंचवड आणि आर्य समाज मंदिर, पिंपरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'घर असावे घरासारखे...' या विशेष कविसंमेलनाला कवी आणि रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. आर्य समाज मंदिर सभागृह, पिंपरी येथे शनिवार, दिनांक १७ मे रोजी संपन्न झालेल्या या कविसंमेलनाचे अध्यक्षपद कवयित्री सुनीती लिमये यांनी भूषविले; तसेच महाराष्ट्र साहित्य परिषद, भोसरी शाखेचे कार्याध्यक्ष पुरुषोत्तम सदाफुले, ज्येष्ठ साहित्यिक राज अहेरराव, सामाजिक कार्यकर्त्या मीना पोखरणा, कर्मयोगिनी महिला संस्थेच्या अध्यक्षा सीमा गांधी, आर्य समाज मंदिर ग्रंथालय सचिव दिनेश यादव यांची उपस्थिती होती.

गणेश आणि शारदास्तवन तसेच ग्रंथपूजन करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. कर्मयोगिनी संस्थेच्या अध्यक्षा सीमा गांधी यांनी प्रास्ताविकातून , "जागृती - सृजन - प्रगती' हे ब्रीद घेऊन कर्मयोगिनी ही संस्था कार्यरत असून जागतिक कुटुंबदिनानिमित्त व्याख्यान, विशेष कविसंमेलन असे वैविध्यपूर्ण कार्यक्रम आयोजित केले आहेत.



**पुणे** भारतीय बौद्ध महासभा पुणे या संस्थेच्या आरोग्य विभाग मार्फत धम्मक्रांती बुद्ध विहार, गांधी नगर, येरवडा.येथे श्रामणेर प्रशिक्षणार्थी यांची आरोग्य तपासणी करण्यात आणि गरजू लाभार्थ्यांना उपचार व सल्ला देण्यांत आला.

# पोतराजाच्या वेषात दिला शिक्षणाचा 'धडा'...!




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** हलगीचा कडकडाट, पायात चाळ, खांद्यावर आसूड अन् कंबरेला आब्रान अशा पोतराजाच्या वेषात, देवीच्या पारंपरिक ओव्यांच्या चालीवर स्वरचित गीते गात अभिनव पध्दतीने उपस्थितांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत शिक्षणाचा 'धडा' दिला. निमित्त होते आदर्श मुख्याध्यापक स्वर्गीय नटराज जगताप यांच्या जन्मदिनानिमित्त लोकजागर ॲक्टिव्हिटिज या चळवळीच्या माध्यमातून व खिंवसरा पाटील शिक्षण संकुलाचे माजी विद्यार्थी तसेच सामाजिक कार्यकर्ते बालाजी मोरे यांच्या पुढाकारातून स्वर्गीय नटराज जगताप विद्यार्थी विकास केंद्र स्थापन केले असून त्या अंतर्गत वीरपत्नी दुर्गाबाई चापेकर संस्कारवर्ग आणि अभ्यासिकेचे उद्‌घाटन सोहळयाचे, विशेष म्हणजे उपस्थितांनी पोतराजाच्या वेषातच हा उद्‌घाटन सोहळा संपन्न झाला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत सदस्य प्रकाश मीठभाकरे यांच्या हस्ते व क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीचे उपाध्यक्ष डॉ. अशोक नगरकर, समिती शिक्षण विभागप्रमुख प्रा. दिगंबर ढोकले, जेजुरी खंडोबा देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त अनिल सौंदडे, प्रा. डॉ. हेमंत देवकुळे, केंद्र शाखाप्रमुख राजेश आरसूळ, सेवा वस्ती प्रमुख मिलिंद पांडे, दिनेश जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

या प्रसंगी हलगीचा कडकडाट, पायात चाळ, खांद्यावर आसूड अन् कंबरेला आब्रान अशा पोतराजाच्या वेषात, देवीच्या पारंपरिक ओव्यांच्या चालीवर स्वरचित गीते गात शाहीर आसराम कसबे, शिवाजी पोळ, हृषीकेश गायकवाड, ज्ञानेश्वर पोळ, विष्णू तोरड या लोककलावंतांनी परिसरातील चिमुकले विद्यार्थी, पालक, नागरिक यांच्याशी सुसंवाद साधला.

> या चळवळीच्या माध्यमातून वस्ती तेथे संस्कारवर्ग आणि अभ्यासिका सुरू करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. त्या अंतर्गत तीन ते सहा वयोगटातील बालकांसाठी सुसंस्कार वर्ग सुरू करणे, शिववंदना, बुद्धवंदना, लहुवंदना आणि चापेकरस्तवन याद्वारे समाजभक्ती अन् देशभक्ती जागृत करणे हे उद्धिष्ठ ठेवण्यात आले आहे.
>
> **शाहीर आसाराम कसबे**

संपादकीय विशेष

# हवेची गुणवत्ता महत्वाची का?

राष्ट्रीय वातावरणीय हवा गुणवत्ता देखरेख कार्यक्रम शहर आणि गावांमधील हवा किती स्वच्छ किंवा प्रदूषित आहे हे शोधतो. हा कार्यक्रम सल्फर डायऑक्साइड (एसओटू), नायट्रोजन डायऑक्साइड (एनओटू), पीएम 10 आणि पीएम 2.5 सारख्या वायू प्रदूषकांचे प्रमाण मोजतो. पीएम 10 आणि पीएम 2.5 हे लहान कण आहेत, ते हवेत तरंगतात आणि फुफ्फुसात जाऊन आपल्याला आजारी बनवू शकतात. या कार्यक्रमांतर्गत देशाच्या विविध भागात यंत्रे बसवण्यात आली आहेत, ज्यांना सतत वातावरणीय हवा गुणवत्ता देखरेख केंद्रे (सीएएक्यूएमएस) म्हणतात. ही यंत्रे हवा तपासतात आणि प्रदूषणाची पातळी काय आहे, ते सांगतात. यामुळे सरकारला प्रदूषण कुठे जास्त आहे आणि ते कमी करण्यासाठी काय केले पाहिजे हे समजण्यास मदत होते. 'एनएएक्यूएम'अंतर्गत प्रामुख्याने चार प्रदूषकांचे निरीक्षण केले जाते. त्यात सल्फर डायऑक्साइडचा समावेश आहे. हे प्रदूषक कोळसा जाळण्यापासून आणि औद्योगिक उपक्रमांमधून येते. त्यामुळे श्वसनाचे आजार होऊ शकतात. नायट्रोजन डायऑक्साइड हा दुसरा प्रदूषक आहे. तो वाहने आणि वीज प्रकल्पांमधून येतो. यामुळे फुफ्फुसांचे नुकसान होते. पीएम 10 हे हवेत असलेले 10 मायक्रोमीटरपेक्षा लहान कण असतात. धूळ, बांधकाम आणि जळणाऱ्या वस्तूंमुळे ते तयार होतात. पीएम 2.5 हे 2.5 मायक्रोमीटरपेक्षा लहान कण आहेत. हे खूप धोकादायक आहेत कारण ते फुफ्फुसांमध्ये आणि रक्तात सहज पोहोचतात.

या प्रदूषकांचे प्रमाण मोजण्यासाठी दररोज डेटा गोळा केला जातो. त्यांचे प्रमाण राष्ट्रीय वातावरणीय हवा गुणवत्ता मानकांपेक्षा (एनएएक्यूएम) जास्त असणे हा चिंतेचा विषय ठरतो. भारतात हवेची गुणवत्ता तपासण्यात अनेक समस्या आहेत. काही 'सीएएक्यूएमएस' यंत्रे अशा ठिकाणी बसवण्यात आली आहेत, जिथे प्रदूषण कमी आहे. यामुळे प्रदूषणाची खरी स्थिती उघड होत नाही. कधी कधी वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे किंवा मशीन बिघाडामुळे डेटा गोळा करता येत नाही. तसेच, या यंत्रांची काळजी घेण्यासाठी पुरेसे लोक नाहीत. उदाहरणार्थ, दिल्ली प्रदूषण नियंत्रण समिती (डीपीसीसी) कडे कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. बहुतेक लोकांना हवेच्या गुणवत्तेच्या डेटाची माहिती नाही. यामुळे ते प्रदूषण टाळण्यासाठी योग्य पावले उचलू शकत नाहीत. देशातील घटक जसे प्रदूषणाला जबाबदार असतात, तसेच काही परदेशी घटकही हवेची गुणवत्ता बिघडवण्यास कारणीभूत ठरतात. काही प्रदूषण शेजारील देश किंवा राज्यांमधून येते. पंजाब आणि हरियाणामध्ये पेंढा जाळल्यामुळे दिल्लीमध्ये प्रदूषण वाढते. हे थांबवणे कठीण आहे. अचूक आणि खुल्या हवेच्या गुणवत्तेची माहिती अत्यंत महत्त्वाची आहे. हवा प्रदूषित असल्याचे वेळेवर आढळल्यास लोक मास्क घालू शकतात किंवा बाहेर जाण्याचे टाळू शकतात. यामुळे मुले, वृद्ध आणि आजारी लोकांचे प्राण वाचू शकतात. योग्य डेटाच्या आधारे, सरकार राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम (एनसीएपी) सारख्या चांगल्या योजना बनवू शकते. यामुळे प्रदूषण कमी होण्यास मदत होते.

प्रदूषण कुठे जास्त आहे, हे आपल्याला माहीत असल्यास सरकार अधिक लक्ष देऊ शकते. यामुळे पैशांचा आणि संसाधनांचा अपव्यय होत नाही. 'आयक्यूएअर वर्ल्ड एअर क्वालिटी रिपोर्ट, 2024'नुसार भारत हा जगातील पाचवा सर्वाधिक प्रदूषित देश आहे. भारतातील पीएम 2.5 ची पातळी जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकांपेक्षा अनेकपट जास्त आहे. भारतातील अनेक शहरे जगातील सर्वात प्रदूषित शहरांमध्ये समाविष्ट आहेत. वायू प्रदूषणाचे परिणाम खूप गंभीर आहेत. प्रदूषित हवेमुळे श्वसनाचे आजार, हृदयरोग आणि कर्करोग यासारख्या समस्या वाढत आहेत. 'लॅन्सेट आणि स्टेट ऑफ ग्लोबल एअर रिपोर्ट, 2024' नुसार दर वर्षी लाखो लोक वायू प्रदूषणामुळे अकाली मृत्युमुखी पडतात. जागतिक बँकेच्या मते वायू प्रदूषणामुळे भारताचे दर वर्षी 'जीडीपी'च्या तीन टक्के नुकसान होते. याचा व्यवसाय आणि उत्पादकतेवर नकारात्मक परिणाम होतो. प्रदूषणामुळे सौर ऊर्जेची कार्यक्षमता कमी होते. जंगले आणि प्राण्यांवर परिणाम होतो आणि जैवविविधतेला धोका निर्माण होतो. भारत सरकारने वायूप्रदूषण कमी करण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत. राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम (एनसीएपी) या योजनेचा उद्देश पीएम 10 आणि पीएम 2.5 पातळी कमी करणे आहे. हवेची गुणवत्ता आणि हवामान अंदाज आणि संशोधनाची प्रणाली (एसएएफएआर) लोकांना हवेच्या गुणवत्तेबद्दल माहिती देते. ही परिस्थिती लक्षात घेऊन देशभरात या मोजणीत पारदर्शकता आणण्याची गरज आहे.

हवेच्या गुणवत्तेचे अचूक निरीक्षण करण्यासाठी भारत अनेक पावले उचलू शकतो. त्यात योग्य ठिकाणी यंत्रे बसवणे हा एक सोपा उपाय आहे. त्यासाठी 'जीआयएस मॅपिंग'च्या मदतीने प्रदूषण जास्त असलेल्या ठिकाणी 'सीएएक्यूएमएस' बसवण्याची आवश्यकता आहे. याखेरीजही सरकारने देखरेख केंद्रांना अधिक पैसे, कर्मचारी आणि प्रशिक्षण द्यायला हवे. हवेच्या गुणवत्तेचा डेटा सहज उपलब्ध असलेल्या आणि खुल्या वेबसाइटवर उपलब्ध करून दिला पाहिजे. तसे केल्यास जनतेला तो समजेल. स्वस्त सेन्सर्स आणि 'एआय' आधारित अंदाज साधने हवेची गुणवत्ता चांगल्या प्रकारे मोजू शकतात. 'एनएएक्यूएम'च्या आकडेवारीनुसार पूर्व आणि उत्तरेकडील शहरांमध्ये पीएम 10 आणि पीएम 2.5 चे प्रमाण खूप जास्त आहे. पूर्वेकडील भागात 97 टक्के आणि उत्तरेकडील भागात 96 टक्के दिवसांमध्ये पीएम 10 ची पातळी 'एनएएक्यूएम'पेक्षा जास्त असते. पूर्वेकडील भागात पीएम 2.5 च्या मानकापेक्षा 75 टक्के दिवस जास्त आहेत. औद्योगिक शहरे आणि दहा लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्येही प्रदूषणाची समस्या गंभीर आहे. किनारी भागातील शहरांमध्ये पीएम 2.5 ची पातळी पीएम 10 पेक्षा कमी आहे. भारतात वायू प्रदूषण ही एक गंभीर समस्या आहे; परंतु 'एनएएक्यूएम' आणि सरकारी योजनांसारखे कार्यक्रम ते कमी करण्यास मदत करत आहेत. आपण योग्य ठिकाणी देखरेख केंद्रे बसवली, लोकांना अधिक माहिती दिली आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला तर आपली हवा स्वच्छ होऊ शकते. हे केवळ आपल्या आरोग्यासाठीच नाही, तर पर्यावरण आणि अर्थव्यवस्थेसाठीही महत्त्वाचे आहे. भावी पिढ्यांना स्वच्छ हवा मिळावी, म्हणून आपल्याला एकत्र काम करावे लागेल. त्यासाठी हवेची गुणवत्ता कमी करण्याच्या उपाययोजनांमध्ये पारदर्शकता आणावी लागेल.

# विक्रमी एसआयपी, पाकिस्तानची हलाखी

**सरत्या आठवड्यातल्या मुख्य बातम्यांमध्ये आर्थिक अनिश्चिततेच्या काळातही 'एसआयपी'मध्ये झालेल्या विक्रमी गुंतवणुकीची बातमी लक्षवेधी ठरली. याखेरीज 'ऑपरेशन सिंदूर'मुळे पाकिस्तानला ऐंशी हजार कोटींचा फटका बसल्याचे स्पष्ट झाले. टॅरिफ शुल्क लादल्यानंतरही चीनच्या निर्यातीमध्ये झालेली वाढ ही आणखी एक लक्षवेधी वार्ता ठरली. दरम्यान, देशात महागाई दर आणखी घसरणार असल्याचे दिसून आले.**

अर्थनगरीतून

महेश देशपांडे
आर्थिक घडामोडींचे जाणकार

सरत्या आठवड्यातल्या मुख्य बातम्यांमध्ये आर्थिक अनिश्चिततेच्या काळातही 'एसआयपी'मध्ये झालेल्या विक्रमी गुंतवणुकीची बातमी लक्षवेधी ठरली. याखेरीज 'ऑपरेशन सिंदूर'मुळे पाकिस्तानला ऐंशी हजार कोटींचा फटका बसल्याचे स्पष्ट झाले. टॅरिफ शुल्क लादल्यानंतरही चीनच्या निर्यातीमध्ये झालेली वाढ ही आणखी एक लक्षवेधी वार्ता ठरली. दरम्यान, देशात महागाई दर आणखी घसरणार असल्याचे दिसून आले.

'सिस्टीमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन'मध्ये गुंतवणुकीने एक नवा इतिहास रचला. 'असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंडस इन इंडिया' (एएमएफआय) च्या अहवालानुसार, एप्रिलमध्ये यानिमित्ताने 26,632 कोटी रुपयांचा निधी आला. तो आतापर्यंतचा सर्वाधिक आहे. सर्वात मोठी बाब म्हणजे सुमारे 8.38 कोटी गुंतवणूकदारांनी यात भाग घेतला. याचा अर्थ लोक आता 'एसआयपी'द्वारे पैसे गुंतवण्यात रस दाखवू लागले आहेत. 'इक्विटी फंडां'ची परिस्थिती थोडी वेगळी आहे. 'एसआयपी' गुंतवणूक विक्रमी पातळीवर पोहोचत असताना 'इक्विटी फंडां'मध्ये सलग सहाव्या महिन्यात घट झाली आहे. एप्रिलमध्ये इक्विटी योजनांमध्ये येणारा निधी 24,269 कोटी रुपयांवर घसरला. तो गेल्या बारा महिन्यांमधील सर्वात कमी आहे. 'स्मॉल-कॅप' योजनांमध्ये येणारा निधी 2.3 टक्क्यांनी घसरून 3,999 कोटी रुपयांवर आला. याशिवाय, 'मिड-कॅप' योजनांमध्ये 3.6 टक्क्यांनी घट झाली, तर 'लार्ज-कॅप फंडां'मध्ये 2,671 कोटी रुपयांची वाढ झाली. त्याच वेळी क्षेत्रीय आणि विषयगत निधींमधील गुंतवणुकीमध्ये मोठी वाढ झाली आणि ती 2,001 कोटी रुपयांवर पोहोचली. ही वाढ कोणत्याही नवीन 'एनएफओ' (नवीन फंड ऑफर) मुळे नाही, तर गुंतवणूकदारांच्या हितामुळे झाली आहे.

एप्रिलमध्ये 'गोल्ड ईटीएफ'मधून किरकोळ गुंतवणूक 5.82 कोटी रुपये झाली. सोन्याने सर्वकालीन उच्चांक गाठल्यानंतर गुंतवणूकदारांनी नफा बुक केला असे मानले जाते. त्याच वेळी, हायब्रिड फंडांमध्ये, विशेषतः आर्बिट्रेज योजनांमध्ये अकरा हजार कोटी रुपयांचा ओघ आला आहे, म्हणजेच ते आता पार्किंग स्पेस बनत आहेत. तिथे लोक तात्पुरते पैसे गुंतवत आहेत आणि भविष्यासाठी नियोजन करत आहेत. गुंतवणूकदार आता मूलभूत तत्त्वांनी प्रेरित आहेत. 'एएमएफआय'च्या आकडेवारीवरून स्पष्ट होते की, आजचा भारतीय गुंतवणूकदार 'सोशल मीडिया' किंवा अफवांच्या गोंधळात अडकत नाही. तो दीर्घकालीन दृष्टिकोनातून मूलभूत गोष्टींवर लक्ष केंद्रित करत आहे. एप्रिलमध्ये निव्वळ गुंतवणूक 3.2 टक्क्यांनी कमी झाली असली, तरी 'इक्विटी एयूएम' (अॅसेट अंडर मॅनेजमेंट) चार टक्क्यांनी वाढली.

दरम्यान, 'ऑपरेशन सिंदूर' मुळे पाकिस्तानला जबरदस्त तडाखा बसला. युद्धविरामाला दोन्ही देशांनी मान्यता दिली. कंगाल पाकिस्तानला केवळ शेअर बाजारातूनच ऐंशी हजार कोटींहून अधिकचे नुकसान झाले. पाकिस्तानच्या अनेक शहरांमधील धावपट्टया, विमान, ड्रोन, क्षेपणास्त्रे नष्ट झाले आहेत. त्यांचे प्राणप्रिय, लाडके दहशतवादी मारले गेले आहेत. हे नुकसान अपरिमीत आहे. पाकिस्तान आता किती नुकसान झाले याची मोजदाद करत असल्याची माहिती आहे. याविषयीचा अधिकृत आकडा पाकिस्तान सांगेल का, हा पण प्रश्न आहे. पाकिस्तानच्या पायाभूत सुविधांना मोठा फटका बसला आहे. एअरस्पेस आणि विमानतळ बंद राहिल्याने पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेची गती एकदम मंदावली. एका अंदाजानुसार या सर्व कारवाईमध्ये पाकिस्तानचे अनेक अब्ज डॉलरचे नुकसान झाले आहे. पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी नुकसान झाल्याचे कबूल केले आहे. अधिकृत आकडेवारी समोर आली नसली नाही; पण पाकिस्तानची अर्थव्यवस्था कोलमडली इतके नक्की. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर कराची स्टॉक एक्सचेंजला तीन दिवसांमध्ये मोठे नुकसान सहन करावे लागले. जागतिक नाणेनिधीच्या 'बेलआऊट पॅकेज'मुळे या शेअर बाजारात तेजी दिसून आली, मात्र त्यानंतर एकूणच बाजार तीन दिवसात जवळपास सहा हजार चारशे अंकांनी पडला. दोन दिवसांमध्ये कराची स्टॉक एक्सचेंज सुमारे दहा हजार अंकांनी खाली गेले.



अमेरिकेच्या शुल्कवाढीचा परिणाम न होता, चीनची निर्यात एप्रिलमध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत आठ टक्क्यांनी वाढली. अर्थतज्ज्ञांच्या मते ती अपेक्षेपेक्षाही जास्त आहे. तथापि, चीनची अमेरिकेला होणारी निर्यात 20 टक्क्यांनी कमी झाली आहे. अर्थतज्ज्ञांनी एप्रिलमध्ये चीनची जागतिक निर्यात दोन टक्क्यांनी वाढेल असा अंदाज वर्तवला होता; मात्र समोर आलेल्या ताज्या आकडेवारीमुळे सर्वांनाच धक्का बसला आहे. अमेरिकेचे 'ट्रेझरी सेक्रेटरी' स्कॉट बेसंट आणि इतर वरिष्ठ अमेरिकन अधिकारी चीनचे सर्वोच्च व्यापार दूत हे लाइफेंग यांना भेटणार असताना हे आकडे जाहीर करण्यात आले. जगातील दोन सर्वात मोठ्या अर्थव्यवस्था संघर्षाच्या पातळीवर असून त्यांच्यात अनेक मुद्द्यांवर मतभेद आहेत. काही दंडात्मक शुल्क मागे घेण्याबाबत एकमत झाले तरी परिस्थिती पूर्णपणे सामान्य होण्याची फारशी आशा नाही. येत्या काही महिन्यांमध्ये टॅरिफमुळे चीनची अमेरिकेला होणारी निर्यात आणखी कमी होऊ शकते, असे मानले जात आहे.

हे लक्षात घेण्यासारखे आहे की अमेरिकेची चीनसोबतची व्यापारी तूट 20 अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त आहे. गेल्या वर्षी ती सुमारे 27 अब्ज डॉलर होती. आकडेवारीनुसार या वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांमध्ये चीनची अमेरिकेला होणारी निर्यात गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत 2.5 टक्क्यांनी कमी झाली आहे. याशिवाय, अमेरिकेतून होणारी चीनची आयातही 4.7 टक्क्यांनी कमी झाली आहे. तज्ज्ञांचा विश्वास आहे की चीन जागतिक निर्यातीद्वारे अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीची भरपाई करू शकतो. वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांमध्ये आग्नेय आशियाई देशांना चीनची निर्यात 11.5 टक्क्यांनी वाढली. याशिवाय, लॅटिन अमेरिकन देशांना होणाऱ्या साखर निर्यातीतही 11 टक्क्यांनी वाढ झाली. भारतात पाठवल्या जाणाऱ्या वस्तूंमध्येही 16 टक्क्यांनी वाढ झाली. याशिवाय आफ्रिकेतील निर्यातीतही वाढ झाली.

आता एक खास बातमी. व्याजदरांमध्ये स्थिरता आल्यानंतर सर्वसामान्यांनाही महागाईपासून दिलासा मिळण्याची चिन्हे आहेत. बँक ऑफ बडोदाच्या संशोधन अहवालानुसार एप्रिल 2025 चा किरकोळ महागाई दर तीन टक्क्यांपेक्षा कमी राहू शकतो. अहवालात म्हटले आहे की अलिकडच्या आठवड्यात अन्नपदार्थांच्या किमती, विशेषतः भाज्यांच्या किमती 34 टक्क्यांपर्यंत तर डाळींच्या किमती 15 टक्क्यांपर्यंत घसरल्या आहेत. खाद्यतेलाच्या किमती, विशेषतः सूर्यफूल तेलाच्या किमती 30 टक्क्यांनी वाढल्या असल्या तरी निर्देशांकात त्याचा वाटा एक टक्क्यांपेक्षा कमी असल्याने चलनवाढीवर मर्यादित परिणाम होईल. महागाईतील घट रेपो दरावरही थेट परिणाम करू शकते. अहवालानुसार, जूनच्या बैठकीत रिझर्व्ह बँक रेपो रेटमध्ये 0.25 टक्क्यांपेक्षा जास्त कपात करू शकते. यामुळे कर्ज आणि 'ईएमआय' स्वस्त होण्याची आशा वाढली आहे. याशिवाय, टोमॅटो, कांदा आणि बटाटा यांसारख्या आवश्यक अन्नपदार्थांचे उत्पादन करणाऱ्या राज्यांमध्ये तापमानात घट झाल्यामुळे पीक उत्पादन चांगले होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे किंमती आणखी कमी होऊ शकतात. मार्चमध्ये महागाई सहा वर्षांच्या नीचांकी पातळीवर होती. मार्चमध्ये किरकोळ महागाई दर 3.34 टक्क्यांपर्यंत घसरला. ऑगस्ट 2019 मध्ये महागाई दर 3.28 टक्के होता. तो पाच वर्षे सात महिन्यांमधील नीचांकी पातळीवर पोहोचला आहे. फेब्रुवारीमध्ये महागाई दर 3.61 टक्के होता. महागाईच्या दरात अन्नपदार्थांचा वाटा जवळपास 50 टक्के आहे. महिना-दर-महिना आधारावर महागाई दर 3.75 टक्क्यांवरून 2.67 टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे. त्याच वेळी ग्रामीण महागाई 3.79 टक्क्यांवरून 3.25 टक्क्यांपर्यंत कमी झाली आहे तर शहरी महागाई 3.32 टक्क्यांवरून 3.43 टक्क्यांपर्यंत वाढली आहे.

करिअरवाटा

## अंगी सेवाभाव असल्यास...

वैद्यकीय क्षेत्रात औषधोपचाराबरोबरच रुग्णाला मिळणाऱ्या वागणुकीवर लक्ष ठेवण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे ही शाखा युवावर्गासाठी आकर्षणाचा केंद्र ठरते. समाजाचं आकलन करून घेणं आणि रुग्णांना मदत करणं हा या शास्त्राचा हेतू आहे. वैद्यकीय उपचार करणारं क्षेत्र आणि समाज यांच्यामधला दुवा म्हणून ही मंडळी काम करतात. देशातील अनेक स्वयंसेवी संघटना वैद्यकीय क्षेत्रात काम करतात. त्यांना आवश्यक ती माहिती देण्याचं कामही या मेडिकल सोशल वर्करकडून पार पाडलं जातं. हा अभ्यासक्रम पदवी आणि पदव्युत्तर अशा दोन्ही प्रकारात उपलब्ध आहे. काही पदवीधर तरुण–तरुणींना मानवतेच्या भूमिकेतून वैद्यकीय सेवा करायची असते. परंतु अनेक कारणांनी त्यांना डॉक्टर होता येत नाही. अशा ध्येयवादी तरुण–तरूणींना समाजसेवेचा ध्यास मेडिकल सोशल वर्कर होऊन पूर्ण करता येतो. कोणतीही पदवी विशेषत: विज्ञान शाखेची पदवी मिळवल्यानंतर या अभ्यासक्रमाकडे वळता येतं. शास्त्र शाखेतील इतर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाइतकी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी स्पर्धा दिसून येत नाही. त्यामुळे या अभ्यासक्रमासाठी प्रवेश सुकर ठरताना दिसतो.



खेचाखेची

## चांगले संस्कार...

**पोलीस** : काय रे कुठे चाललाय एवढ्या रात्री?

**बंड्या** :– प्रवचन ऐकायला

पोलीस – कोणत्या विषयावर प्रवचन आहे?


**बंड्या** :– दारूपासून होणारे दुष्परिणाम

**पोलीस** :– एवढ्या रात्री कोण देत प्रवचन?

**बंड्या** :– माझी बायको

वेगळं काही

आजच्या टीआरपी आणि पेड न्यूजच्या काळातही काही पत्रकार आपलं काम इमानेइतबारे करत आहेत. उत्तर प्रदेशातल्या मुजफ्फरनगरचे पत्रकार दिनेशकुमार यांनी पत्रकारितेतली मूल्यं जपली आहेत. ५८ वर्षांचे दिनेशकुमार कोणत्याही कार्यालयात जात नाहीत. त्यांच्याकडे लॅपटॉप, कॉम्प्युटरही नाही. त्यांच्याकडे कामाला माणसंही नाहीत. पण ते वृत्तपत्र काढतात. 'विद्या दर्शन' या त्यांच्या वृत्तपत्रातील सगळे लेख ते हातांनी लिहितात. या वृत्तपत्राच्या झेरॉक्स प्रती काढून ते लोकांमध्ये वाटतात. ते आपलं वृत्तपत्र ठिकठिकाणी चिकटवतात. खराब आर्थिक परिस्थितीमुळे उपजिविकेसाठी ते गोळ्या, चॉकलेटं विकतात.




राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाचे निर्णय तातडीने घ्यावेत. आर्थिक बाबतीत तडजोडीचं धोरण ठेवावं. बाकी चिंता नसावी.
- **वृषभ** : उपजत कला–गुणांचा विकास होईल. प्रेम प्रकणात समाधान लाभेल. वाहनाचा वापर जपून करा.
- **मिथुन** : कारकिर्दीला नवी दिशा मिळेल. चैनीवर अधिक खर्च होईल. धार्मिक स्थळाची यात्रा घडेल.
- **कर्क** : मनाविरूध्द घटना संभवतात. आपलंच खरं हा अट्टाहास दूर ठेवा. यांत्रिक क्षेत्रात प्रगती होईल.
- **सिंह** : कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील. मोठ्या खरेदीचा मार्ग सुकर होईल. प्रक्रिया उद्योगात उत्कर्ष होईल.
- **कन्या** : इतरांवर अधिक विश्वास टाकू नका. प्रवासाचे बेत लांबणीवर टाकावे. प्रकृतीस त्रास संभवतो
- **तूळ** : विवाहाचे प्रयत्न सफल होतील. ग्रहमानाची विशेष अनुकूलता राहील. बेरोजगारांना दिलासा मिळेल.
- **वृश्चिक** : ज्येष्ठांचं मार्गदर्शन कामी येईल. अनावश्यक खर्च टाळायला हवा. सरकारी कामं मार्गी लागतील.
- **धनु** : दिलासादायक घटना घडतील. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. गृहसजावटीच्या क्षेत्रात प्रगती होईल.
- **मकर** : कामाचा उत्साह वाढता राहील. जुनी येणी सहजगत्या वसूल होतील. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **कुंभ** : सरकारी कामं रखडतील. महत्त्वाच्या भेटी लांबणीवर पडतील. आर्थिक बाबतीत ओढाताण होईल.
- **मीन** : व्यवहारात फसवणूक संभवते. मतभेद वा वाद–विवादापासून दूर रहावं. पुरेसा संयम बाळगावा.

सल्ला मोलाचा

## पार्टीची 'चमकदार' सज्जता

विशेषत: संध्याकाळच्या पार्टीसाठी ग्लिटरी लूक परफेक्ट ठरतो. तो कसा मिळवायचा, पाहू या.

✻ **त्वचेसाठी–** नेहमीचं ब्युटी रुटीनपाळावं. प्रायमरचा उपयोग करून त्वचेचा मूळ वर्ण उजळवणारं फाऊंडेशन निवडावं. त्यानंतर कन्सीलरचा वापर करावा. ✻ **डोळ्यांसाठी–** डोळ्यांच्या वरच्या बाजूला ग्लिटरी पिंक आयशॅडो लावावी. खालच्या आयलॅश लाईनवरही ब्रशने आयशॅडो लावावी. आता वरच्या आयलॅश लाईनवर मॅट ब्लॅक आयलायनर लावावं. त्यानंतर आयलॅशेस कर्ल करून मस्करा लावावा. ✻ **गालांसाठी–** चीकबोन्सवर पीच ब्लश लावावं. ✻ **ओठांसाठी–** ओठांना स्क्रबिंग करावं. गुलाबी रंगाच्या लीप लायनरने ओठांवर आऊटलाईन काढून घ्यावी. त्याच रंगाची लिपस्टिक लावावी. ✻ ग्लिटरी मेक अप करताना डोळे अधिक आकर्षक भासवायचे असतील तर लिपस्टिकची शेड न्यूड ठेवावी. ब्लश केल्यानंतर चेहऱ्याच्या वरील भागावर हायलायटर लावावं. ✻ या लूकसाठी मस्कारा लावताना काळजी घ्यावी. ऑफिस पार्टीसाठी जात असाल तर मस्काराचे एक किंवा दोन स्ट्रोक पुरेसे ठरतात. पण विशेष प्रसंगासाठी जात असाल तर तीन ते चार स्ट्रोक द्यायला हवेत.

दिनविशेष

## १९ मे

- **२००८** : साहित्यिक विजय तेंडुलकर यांचे निधन.
- **२०१३** : 'आयपीएल स्पॉट फिक्सिंग'प्रकरणाचे धागेदोरे मराठवाडा आणि विदर्भातही पोहोचले.
- **२०१७** : केंद्रीय निवडणूक आयोगाने राजकीय पक्षांना ईव्हीएममध्ये फेरफार करुन दाखवण्याचं खुलं आव्हान दिलं.
- **२०१८** : अपेक्षित संख्याबळ न गाठता आल्यामुळे विश्वासदर्शक ठरावाला सामोरं न जाताच येडियुरप्पांनी राजीनामा दिला.

महत्त्वपूर्ण काही

## पिक्सेल आणि बरंच काही...

आता कॅमेऱ्याची जागा स्मार्टफोनने घेतली आहे. स्मार्टफोनचा फोटो काढण्यासाठी अधिक उपयोग होणार असेल तर कॅमेरा किती मेगापिक्सेलचा आहे हे आधी पाहिलं जातं. त्यातच सेल्फी कॅमेरेही दर्जेदार होत आहेत. पण केवळ पिक्सेलवर कॅमेऱ्याचा दर्जा ठरत नाही. त्यामुळे मेगापिक्सेल म्हणजे नेमकं काय आणि कॅमेऱ्याचा दर्जा कसा ओळखायचा याविषयी...

एका मेगापिक्सेलमध्ये दहा लाख पिक्सेल असतात. एका फोटोमध्ये काही लाख पिक्सेल असतात. पिक्सेल जास्त तेवढा फोटो चांगला येतो. पिक्सेलमुळे फोटोचा दर्जा ठरतो. फोटोच्या प्रिंटचा दर्जाही या पिक्सेलवरच ठरतो. फोटोचा आकार किती मोठा करता येईल आणि मोठ्या आकाराच्या फोटोचा दर्जा कसा असेल हे सुद्धा पिक्सेलवरच ठरतं. कॅमेऱ्याचा शटर स्पीड आणि लेन्सही फोटोचा दर्जा ठरवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. डिजिटल कॅमेऱ्याबाबत बोलायचं तर फोटो काढताना कॅमेऱ्याचा सेंसर खुला राहण्याचा काळ म्हणजे शटर स्पीड. शटर स्पीड कमी तेवढा फोटोचा दर्जा चांगला. त्यामुळेच केवळ जास्त मेगापिक्सेलचा कॅमेरा चांगल्या फोटोची हमी देऊ शकत नाही.

पंचांग

**सोमवार, १९ मे २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
वैशाख कृ. ६/७, नक्षत्र : श्रवण
चंद्रराशी : मकर , योग : ब्रह्मा
सूर्योदय: ६.०५, सूर्यास्त: ७.०५

फॉरवर्डस

**हर चीज की कीमत वक्त आने पर ही पता चलता है,**

**मुफ्त में मिलनेवाला ऑक्सिजन अस्पताल में बहुत महंगा बिकता हैं।**

आरोग्यमंत्र

## जास्त खाणं झाल्यास...

सुट्टीच्या या काहिशा निवांत काळात कळत–नकळत जंक फूड खाल्लं जातं. पण यामुळे पोट बिघडणं, गॅस, अॅसिडिटीसारख्या समस्या निर्माण होतात. कॅलरीही वाढतात. अतिखाण्याचे परिणाम दिसून येतात. पण काही प्रमाणात हा परिणाम कमी करणं शक्य आहे. पोटभर खाल्ल्यानंतर पोटाला आराम देण्यासाठी, शरीरातली विषारी द्रव्यं बाहेर टाकण्यासाठी आहारात काही पदार्थांचा समावेश करता येईल.



✻ जास्त खाणं झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी भरपूर पाणी प्या. शरीरातले विषारी घटक बाहेर टाकण्याचा हा सर्वात सोपा आणि साधा मार्ग आहे. ✻ ग्रीन टीमुळे शरीरातले विषारी घटक बाहेर निघून जातात. अतिखाणं होत असेल तर सकाळी ग्रीन टी प्या. ग्रीन टी अँटी ऑक्सिडंट्सने युक्त आहे. तसंच यामुळे रक्तातली साखरेची पातळी नियंत्रणात राहण्यास मदत होते. भूकही कमी लागते. ✻ भरपूर खाणं होणार असेल तर लो फॅट योगर्ट आणि त्याबरोबर चेरी, स्ट्रॉबेरीसारखी फळं खा. काळी द्राक्ष, जांभळं, आलूबुखार यांच्यासह हंगामी फळं खा. योगर्टमधील चांगले बॅक्टेरिया अन्नपचनाची क्रिया सुधारतात. पोटातली जळजळही कमी होते. ✻ खाण्यासोबत मद्यपान केलं असेल तर दुसऱ्या दिवशी नारळपाणी प्या. नारळपाण्यात अँटिऑक्सिडंट्स असतात. तसंच पोटॅशियमसारखे घटक असतात. यामुळे मद्याचा प्रभाव कमी होण्यास मदत होते.

## काय करावं?

✻ पुरूषप्रधान संस्कृतीमुळे नात्यातही मुलंच सगळे निर्णय घेतात. मैत्रिणीच्या महत्त्वाच्या निर्णयातही आपण सल्ला द्यायला हवा, असं त्यांना वाटतं. तिने काय करायला हवं आणि काय नको याचे सल्ले देत राहतात. हे टाळायला हवं. ✻ अनेकांना आपल्या मैत्रिणीच्या प्रत्येक क्षणाची माहिती हवी असते. असं करू नका. तिला स्पेस द्या. ✻ मित्रमंडळींसमोर आपल्या नात्याचे सतत गोडवे गाऊ नका. मैत्रिणीचं कौतुक करा. पण, सततच्या कौतुकामुळे तिलाही अस्वस्थ वाटेल. ✻ मैत्रिणीला तिची स्पेस द्या. ई मेल, फोनचे पासवर्ड तिने तुमच्यासोबत शेअर करायची गरज नाही. ती तुमच्यापासून काही लपवत आहे असा याचा अर्थ होत नाही.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

At a Glance

## सर्वपक्षीय शिष्टमंडळावर बहिष्कार घालायला हवा

**मुंबई :** ऑपरेशन सिंदूरच्या पार्श् वभूमीवर दहशतवादाचा मुकाबला करण्याचा भारताचा निर्धार प्रत्यक्षात आणण्यासाठी सर्वपक्षीय शिष्टमंडळे विविध देशांमध्ये पाठविण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयावर इंडी गटातील घटक पक्षांनी बहिष्कार टाकायला हवा होता, असे मत शिवसेना खासदार संजय राऊत यांनी रविवारी व्यक्त केले. हे शिष्टमंडळ सरकारने केलेल्या पापांचा आणि गुन्ह्याचा बचाव करेल, असा दावा राऊत यांनी पत्रकारांशी बोलताना केला. सरकारकडून निधी मिळणाऱ्या अशा प्रकारचे शिष्टमंडळ पाठवण्याची गरज नव्हती. ते काय करतील? परदेशात आमचे राजदूत आहेत. ते आपलं काम करत आहेत.

## एनसीसी पथकाने एव्हरेस्ट केले सर

**नवी दिल्ली :** नॅशनल कॅडेट कॉर्प्सच्या एका पथकाने रविवारी जगातील सर्वात उंच शिखर माऊंट एव्हरेस्ट सर केले. 'ऐतिहासिक क्षण... एनसीसीच्या माऊंट एव्हरेस्ट मोहिमेच्या पथकाने आज पहाटे पावणेचार वाजता माऊंट एव्हरेस्ट शिखर सर केले. शिखर परिषदेच्या छायाचित्रांची प्रतीक्षा आहे," एनसीसीने एक्सवर पोस्ट केले. एनसीसीच्या महासंचालकांनी ३ जानेवारी रोजी येथे वार्षिक पत्रकार परिषदेत २०२५ मध्ये माऊंट एव्हरेस्टवर एनसीसी मोहिमेची घोषणा केली आणि सियाचिन बॅटल स्कूलमध्ये एक पथक त्याची तयारी करत असल्याचे सांगितले.

# भारत-पाक युद्धविराम कायम

## १२ मे रोजी झालेला करार कायम राहणार; रविवारी कोणतीही चर्चा नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** लष्करी कारवाया थांबवण्यासाठी भारत आणि पाकिस्तान यांच्यात १२ मे रोजी झालेला करार कायम राहणार आहे. लष्कराच्या एका अधिकाऱ्याने रविवारी ही माहिती दिली. हा करार तात्पुरता असून त्याची मुदत आज संपणार असल्याची अटकळ अधिकाऱ्याने फेटाळून लावली.

डीजीएमओ (डायरेक्टर जनरल ऑफ मिलिटरी ऑपरेशन्स) चर्चेदरम्यान लष्करी कारवाया थांबवण्याबाबत एकमत होण्याबाबत कोणतीही एक्सपायरी डेट नाही, असे ते म्हणाले. भारत आणि पाकिस्तानच्या डीजीएमओमध्ये रविवारी कोणतीही चर्चा होणार नाही, असे या अधिकाऱ्याने सांगितले.



भारत आणि पाकिस्तानमध्ये तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाल्यानंतर १० मे रोजी सायंकाळी ५ वाजल्यापासून शस्त्रसंधी लागू करण्यात आली. त्या दिवशी परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते विक्रम मिस्री यांनी पत्रकार परिषदेत दोन्ही देशांच्या लष्करी ऑपरेशन्स महासंचालकांमध्ये (डीजीएमओ) हॉटलाइनवर झालेल्या चर्चेनंतर हा करार झाल्याची पुष्टी केली. मात्र, शस्त्रसंधी लागू झाल्यानंतर काही तासांतच पाकिस्तानने जम्मू-काश्मीर, राजस्थान आणि गुजरातमध्ये ड्रोन हल्ले आणि गोळीबार करून कराराचे उल्लंघन केले, ज्याला भारतीय लष्कराने चोख प्रत्युत्तर दिले.

पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ नागरिक ांचा मृत्यू झाल्यानंतर वाढलेल्या तणावामुळे शस्त्रसंधी लागू करण्यात आली होती. त्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने 'ऑपरेशन सिंदूर' सुरू केले, त्याअंतर्गत पाकिस्तानातील दहशतवादी तळांना लक्ष्य करण्यात आले. भारताने पाकिस्तानमधील 6 एअरबेस आणि 9 दहशतवादी तळ उद्‌ध्वस्त केल्याने पाकिस्तानी सैन्यात खळबळ उडाली आहे. १० मे रोजी पाकिस्तानी डीजीएमओने भारताशी संपर्क साधून शस्त्रसंधीची विनंती केली, जी भारताने आपल्या अटींवर मान्य केली.

१३ मे रोजी डीजीएमओ स्तरावर चर्चेची आणखी एक फेरी पार पडली, ज्यात पाकिस्तानने शस्त्रसंधीचे उल्लंघन करणार नाही असे आश्वासन दिले. जम्मू-काश्मीर, राजस्थान आणि पंजाबमध्ये परिस्थिती पूर्वपदावर येत आहे, रस्त्यांवरील रहदारी वाढली आहे आणि दुकाने उघडली जात आहेत. मात्र, भारतीय लष्कर आणि सुरक्षा यंत्रणा हाय अलर्टवर आहेत. जम्मू-काश्मीरमधील रघुनाथ मंदिर आणि जामिया मशिदीसारख्या धार्मिक स्थळांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. पाकिस्तानस्थित मालवेअर हल्ल्याविरोधात पंजाब पोलिसांनी सायबर अलर्ट जारी केला आहे.

## अदानी डिफेन्सची मोठी झेप!; स्पार्टन ग्रुपसोबत महत्त्वाचा करार




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अहमदाबाद :** भारताच्या संरक्षण आणि एरोस्पेस इकोसिस्टममधील आघाडीची कंपनी असलेल्या अदाणी डिफेन्स अँड एरोस्पेसने एल्बिट सिस्टम्सची समूह कंपनी आणि प्रगत अँटी-सबमरीन वॉरफेअर सिस्टम्सची आघाडीची प्रदाता असलेल्या स्पार्टन (डीलियन स्प्रिंग्स एलएलसी) सोबत बंधनकारक सहकार्य करारावर स्वाक्षरी केली आहे. ही भागीदारी भारतीय आणि जागतिक बाजारपेठेसाठी जटिल इलेक्ट्रॉनिक प्रणाली आणि प्रगत अँटी-सबमरीन वॉरफेअर (एएसडब्ल्यू) सोल्यूशन्सच्या असेंब्लीचे स्थानिकीकरण करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

या भागीदारीने अदाणी डिफेन्स अँड एरोस्पेस ही भारतातील पहिली खाजगी क्षेत्रातील कंपनी बनली आहे जी देशाच्या स्वावलंबनाला बळकटी देण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेवर भर देते.

ही भागीदारी स्पार्टनच्या अग्रगण्य एएसडब्ल्यू तंत्रज्ञानाला अदानी डिफेन्सच्या भारतीय नौदलाच्या विकास, उत्पादन आणि देखभालीतील स्थापित कौशल्याशी जोडेल.

सोनोबॉय हे अंडरसी डोमेन अवेअरनेस (यूडीए) वाढवण्यासाठी मिशन-क्रिटिकल प्लॅटफॉर्म आहेत, जे पाणबुड्या आणि इतर पाण्याखालील धोके शोधण्यासाठी आणि ट्रॅक करण्यासाठी प्रभावी माध्यम प्रदान करतात. पाणबुडीविरोधी युद्ध आणि इतर नौदल ऑपरेशन्समध्ये महत्त्वाची भूमिका बजावत, ते नौदल सुरक्षा राखण्यास आणि नौदल वाहक स्ट्राइक गटांचे संरक्षण करण्यास समर्थन देतात.


गेल्या अनेक दशकांपासून, भारत जागतिक बाजारपेठेतून ही महत्त्वाची नौदल क्षमता आयात करत आहे, ज्यामुळे परदेशी ओईएम वरील आपले अवलंबित्व वाढत आहे. 'आत्मनिर्भर भारत' आणि 'मेक इन इंडिया' उपक्रमाशी सुसंगत, स्पार्टनचे भारतीय नौदलाशी सुरू असलेले संबंध आता अदाणी डिफेन्सला भारतात बनवलेल्या या उपायांचे वितरण स्वदेशी करण्यास मदत करतील.

# सोलापूर येथे टॉवेल कारखान्याला भीषण आग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर शहरातील अक्कलकोट रोड एमआयडीसीतील सेंट्रल टेक्स्टाईल कंपनी या टॉवेल कारखान्याला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. एमआयडीसीतील सेंट्रल टेक्सटाइल मिल या कारखान्यात पहाटे साडेचार वाजताच्या दरम्यान लागलेल्या या आगीत तीन कामगारांचा होरपळून मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

आणखीही काही लोक आतमध्ये असण्याची शक्यता असून प्रशासनाकडून



आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू असून आणखी चार ते पाच कामगार अडकल्याचे समजते. संबंधित टेक्स्टाईलचा मालक तिथेच राहत असल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पहाटे साडेचार वाजताच्या सुमारास टॉवेल कारखान्यात धुराचे लोट बाहेर पडू लागल्यानंतर एमआयडीसी परिसरात मोठा गोंधळ उडाला.

परिसरातील काही लोकांनी १०८ या क्रमांकावर फोन करत दुर्घटनेची माहिती दिली. त्यानंतर कुंभारी सब सेंटर, मार्डी प्राथमिक आरोग्य केंद्र आणि सोलापूर जिल्हा रुग्णालय या ठिकाणाहून शासकीय रुग्णवाहिका रवाना झाल्या. एमआयडीसीतील कारखान्यात लागलेल्या आगीची माहिती मिळताच पहाटेपासून या भागामध्ये पोलिस प्रशासन, महसूल प्रशासन, अग्निशामक दल यांचे आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.

अग्निशमनची १० वाहने आगेवर नियंत्रण मिळण्यासाठी प्रयत्न करत आहेत, पहाटे तीन ते पावणेचारच्या दरम्यान आग लागल्याचे सांगण्यात येत आहे. सोलापूर महापालिकेचे चीफ फायर ऑफिसर राकेश साळुंखे व एक फायर कर्मचारी आगीवर नियंत्रण मिळवताना अंशत: भाजल्याचे कळत आहे. आग आटोक्यात आणण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणा प्रयत्न करत आहे, आगीचे कारण अजून पर्यंत समजले नाही. ही माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांनी दिली आहे.

## भारताचे सडेतोड प्रत्युत्तर

● (पान वरुन) पूर्वीच्या प्रथेच्या अगदी उलट आहे जेव्हा सैन्याला केवळ मर्यादित स्वातंत्र्य होते आणि मोठा हल्ला करण्यासाठी त्यांना नवी दिल्लीच्या राजकीय मंजुरीची प्रतीक्षा करावी लागत होती. २२ एप्रिल रोजी पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी पायाभूत सुविधा नष्ट करण्यासाठी भारतीय सैन्याने सुरू केलेले ऑपरेशन सिंदूर हे आतापर्यंतच्या प्रचलित पद्धतीत झालेल्या बदलाचा परिणाम आहे.

## सरन्यायाधीश मुंबईत!

पाहण्याची इच्छा व्यक्त केली होती, पण काही मर्यादांमुळे सर्वांना सहभागी करता आलं नाही. शनिवारी बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या सन्मान सोहळ्यात बोलताना गवई म्हणाले की, न्यायाधीश जमीनीवरील वास्तवाकडे दुर्लक्ष करू शकत नाहीत. आजची न्यायपालिका मानवी अनुभवांची गुंतागुंत लक्षात न घेता केवळ कायद्याच्या काळ्या-पांढऱ्या चौकटीत प्रकरणे पाहण्याचा धोका पत्करू शकत नाही, असेही ते म्हणाले.

## इस्रायलच्या हल्ल्यात १०३ जण ठार

हल्ल्यामध्ये ४८ पेक्षा जास्त लोक ठार झाले आहेत. काही घरांवर आणि विस्थापितांच्या तंबूंवरही इस्रायलने विमानातून बॉम्बफेक केली. ठिकाणच्या मृतांमध्ये १८ लहान मुले आणि १३ महिलांचाही समावेश आहे, असे नासेर रुग्णालयाने म्हटले आहे.


# नाणेनिधीच्या पाकवर ११ नवीन अटी

## भारताच्या ऑपरेशन सिंदूरमुळे घेतला निर्णय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इस्लामाबाद :** आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकिस्तानच्या आर्थिक मदत योजनेच्या पुढील हप्त्यासाठी ११ नवीन अटी लावल्या असून भारताशी वाढलेल्या तणावामुळे या कार्यक्रमाच्या आर्थिक, बाह्य व सुधारणा उद्दिष्टांवर परिणाम होऊ शकतो, असा इशारा दिला आहे. नाणेनिधीच्या अहवालात असे म्हटले आहे की, भारत-पाकिस्तान दरम्यान वाढलेला तणाव जर कायम राहिला किंवा अधिक वाढला, तर पाकिस्तानच्या आर्थिक सुधारणांच्या कार्यक्रमावर गंभीर परिणाम होऊ शकतो. ग्राहकांसाठी अनुकूल असलेल्या एका अटीत नाणेनिधीने सांगितले आहे की, पाच वर्षांखालील वापरलेल्या गाड्यांच्या व्यावसायिक आयातीवरील सर्व प्रमाणात्मक निर्बंध हटवण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कायदेशीर प्रस्तावना जुलैअखेर संसदेत मांडावी. सध्या फक्त तीन वर्षांपर्यंतच्या वापरलेल्या कारच आयात करता येतात.

### ऊर्जा क्षेत्रातील नवीन अटी



- वार्षिक वीज दर पुनर्निधारण जाहीर करणे – मुदत १ जुलै २०२५.
- गॅस दरातील अर्धवार्षिक समायोजन जाहीर करणे – मुदत १५ फेब्रुवारी २०२६.
- कॅप्टिव्ह पॉवर लेव्ही अध्यादेश कायदा कायमस्वरूपी बनवणारा कायदा संसदेमधून मंजूर करणे – मुदत मे २०२५ अखेर.
- ३.२१ रुपये प्रति युनिटची वीज अधिभार मर्यादा काढून टाकणारा कायदा संसदेमधून मंजूर करणे – मुदत जून २०२५.
- औद्योगिक पार्कसाठी दिल्या जाणाऱ्या सर्व प्रोत्साहन योजना २०३५ पर्यंत टप्प्याटप्प्याने पूर्णपणे बंद करण्याची योजना तयार करणे – मुदत डिसेंबर २०२५.

भारताने ७ मे रोजी 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या हल्ल्याच्या प्रत्युत्तरात पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर अचूक हल्ले केले. त्यानंतर पाकिस्तानने ८, ९ आणि १० मे रोजी भारतीय लष्करी तळांवर प्रतिहल्ल्याचा प्रयत्न केला.

या दरम्यान नाणेनिधीने पाकिस्तानला आर्थिक मदत जाहीर केल्यानंतर, भारताने त्याविरोधात जोरदार आवाज उठवला. तसेच पाकला निधी देणे म्हणजे दहशतवादाला प्रोत्साहन आहे, असे म्हटले होते. नाणेनिधीने दिलेल्या आर्थिक पॅकेजचा पाकिस्तान कसा उपयोग करतो, याची पडताळणी करण्यात येण्याची गरज भारताने विषद केली होती.

### नव्या ११ अटींचा आढावा :

१७.६ ट्रिलियनचा नवीन अर्थसंकल्प संसदेमधून मंजूर करणे.

- वीज बिलांवरील कर्जफेड अधिभार वाढवणे.
- ३ वर्षांहून जुनी वापरलेली गाड्या आयात करण्यावरची बंदी हटवणे.
- राज्यांकडून (प्रांतिक सरकार) कृषी उत्पन्न कराची अंमलबजावणी – करदात्यांची नोंदणी, रिटर्न प्रक्रिया, जनजागृती मोहीम, अनुपालन सुधार योजना तयार करणे. मुदत – जून २०२५.
- प्रशासन मूल्यांकनावर आधारित एक योजना जाहीर करणे.
- २०२७ नंतरच्या कालावधीसाठी आर्थिक धोरणांची रूपरेषा तयार करणे व प्रकाशित करणे.

पान १ वरून

## बैलजोडीचा मान देण्याची परंपरा खंडित

होतात आणि हा रथ ओढण्यासाठी पुणे जिल्ह्यातून विविध बैलजोड्यांना हा मान दिला जायचा.

परंतु यावर्षी पासून देहू संस्थानने बाहेरून बैलजोडी न मागवता थेट संस्थानच्या मालकीची बैलजोडी खरेदी करून ती रथाला जुंपण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे यावर्षी पासून बैलजोडी साठी अर्ज मागविण्यात येणार नसून थेट पालखी सोहळ्याला संस्थानच्या मालकीच्या बैलजोडी तुकोबांचा पालखी रथ ओढणार आहेत.

दरम्यान, १८ जून रोजी संत तुकाराम महाराजांचे तर १९ जून रोजी संत ज्ञानेश्वर महाराजांचे देहू आणि आळंदी येथून पंढरपूरकडे प्रस्थान आहे. यावर्षी संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्या दरम्यान रस्त्याने ठिकठिकाणी वृक्षारोपण करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. नवीन पालखी मार्ग हा मोठा झाल्याने त्या मार्गावर वारकऱ्यांना सावलीसाठी झाडे नाहीत. त्यामुळे ठिकठिकाणी वृक्षारोपण करून येणाऱ्या पुढील काही वर्षात याची मोठी डेरेदार झाडे तयार होतील आणि वारकऱ्यांना भविष्यात सावली निर्माण होईल असा निर्धार या वारी सोहळ्यात देहू संस्थानकडून करण्यात आला आहे.

## अलमट्टी धरणाच्या उंचीला विरोध

घेतली नाही, तर अलमट्टीपर्यंत जाऊन आंदोलन करण्याचा इशारा आमदार सतेज पाटील आणि विश्वजीत कदम यांनी दिला आहे.

सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील कृष्णा, पंचगंगा, वारणा नदीकाठच्या गावांसह अन्य गावांना अलमट्टी धरणाच्या ५१९ मीटर उंचीमुळं महापुराचा फटका बसला असताना कर्नाटक सरकारनं अलमट्टी धरणाची उंची ५२४ मीटर करण्याचा घाट घातला आहे. या धरणाची उंची वाढवल्यास कोल्हापूर तसंच कराडपर्यंत संपूर्ण गावं पूरग्रस्त बनणार आहेत. यामुळं अलमट्टीची उंची वाढवण्याचा कर्नाटकचा प्रयत्न हाणून पाडण्यासाठी व महाराष्ट्र सरकारला जागे करण्यासाठी अंकली पुलाजवळ आज सर्वपक्षीय नेत्यांकडून चक्काजाम आंदोलन करण्यात आलं. या आंदोलनात भाजपा, काँग्रेस, शिवसेना, स्वाभिमानी शेतकरी संघटना, इरिगेशन फेडरेशन यांच्यासह इतर पक्ष ही सहभागी झाले होते. आमदार सतेज पाटील यांच्या नेतृत्वात चाललेल्या या चक्काजाम आंदोलनात कर्नाटक सरकार, राज्य सरकार आणि केंद्र सरकारवर तीव्र नाराजी दर्शवत जोरदार टीका करण्यात आली. अलमट्टीची उंची वाढीचा निर्णय जोपर्यंत रद्द होत नाही, तोपर्यंत सर्वपक्षीय आंदोलन सुरूच ठेवणार असल्याचा एल्गार यावेळी करण्यात आला.

# २४ पर्यंत कर्नाटक, गोवा, कोकण येथे मुसळधार पावसाचा इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** उत्तर भारतात सध्या प्रचंड उष्णता असून, दिवसा घराबाहेर पडणे धोक्याचे ठरत आहे. मात्र, अनेक भागात मुसळधार पाऊस पडत आहे. २४ मे पर्यंत कर्नाटक, गोवा, कोकण आणि केरळ या पश्चिम किनारपट्टीभागात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडेल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. याशिवाय ईशान्य भारतात पुढील पाच ते सहा दिवसांत मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्याचा इशारा देण्यात आला आहे. तर जम्मू-काश्मीरमध्ये १८ मे दरम्यान आणि पश्चिम राजस्थानमध्ये १८ ते २२ मे दरम्यान उष्णतेची लाट कायम राहणार आहे.

अरुणाचल प्रदेशमध्ये १८-२० मे, आसाम, मेघालयमध्ये १८-२४ मे, त्रिपुरा, नागालँडमध्ये १८ मे रोजी, आसाम, मेघालयमध्ये १८ ते २० मे दरम्यान मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. याशिवाय १८-२० मे रोजी तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल, १८-२४ मे रोजी केरळ, माहे, किनारी कर्नाटक, उत्तर अंतर्गत कर्नाटक, १९ मे रोजी लक्षद्वीप, २०-२२ मे रोजी किनारपट्टीआंध्र प्रदेश, यानम, १८-२० मे रोजी रायलसीमा, १८-२१ मे रोजी दक्षिण अंतर्गत कर्नाटकात



मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. कर्नाटकच्या किनारपट्टीवर २० मे रोजी मुसळधार पाऊस पडणार आहे. याशिवाय १८-२३ मे रोजी मध्य महाराष्ट्र, १८-२४ मे रोजी कोकण, गोवा, २०-२२ मे रोजी कोकण, २२-२२ मे रोजी मध्य महाराष्ट्रात मुसळधार पावसाची शक्यता आहे. २० मे रोजी संपूर्ण हिमालयी पश्चिम बंगाल, सिक्कीममध्ये,२० मे रोजी बिहारमध्ये, १९ मे रोजी झारखंड, विदर्भात, २०-२२ मे दरम्यान छत्तीसगडमध्ये पाऊस, जोरदार वारे वाहण्याचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, वायव्य भारतात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल. याशिवाय वादळी वारे, वीज कोसळण्याचा इशाराही देण्यात आला आहे. ताशी ५० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. तर हिमाचल प्रदेशात १९ मे रोजी, उत्तराखंडमध्ये १९ ते २० मे रोजी गारपीट होणार आहे.

## बांगलादेशाची आर्थिक कोंडी

रेडीमेड गारमेंट्सच्या आयातीसाठी कोणत्याही लँड पोर्टवरून आता परवानगी दिली जाणार नाही. या अधिसूचनेनुसार, अशा आयातीस केवळ नाव्हाशेवा आणि कोलकाता बंदरांद्वारेच परवानगी मिळेल. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, बंदरावरील निर्बंध भारतामार्गे नेपाळ आणि भूतानला जाणाऱ्या बांगलादेशी वस्तूंना लागू होणार नाहीत.

कशाकशावर निर्बंध?

वाणिज्य व उद्योग मंत्रालयानुसार, तत्काळ प्रभावाने फळे/फळांच्या चवीचे कार्बोनेटेड ड्रिंक्स, प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ, कापूस व कापसाचे सुती धाग्याचे कचरा, प्लास्टिक आणि पीव्हीसीचे पूर्ण झालेले उत्पादने, रंग आणि लाकडी फर्निचर यांची आयात आसाम, मेघालय, त्रिपुरा आणि मिझोराम येथील कोणत्याही लँड कस्टम स्टेशन/इंटिग्रेटेड चेक पोस्ट तसेच पश्चिम बंगालमधील चांग्राबंधा आणि फुलबाडी लँड कस्टम स्टेशन यांद्वारे करता येणार नाही. मच्छी, एलपीजी, खाद्यतेल आणि क्रश्ड स्टोन यांसारख्या वस्तूंवर हे बंदर निर्बंध लागू होणार नाहीत.

## ज्योती मल्होत्रा पाकमध्येच..

कोठडी सुनावली आहे. त्याची चौकशी केली जात आहे. आम्ही तिच्या आर्थिक स्टेटमेंटचे विश्लेषण करत आहोत. संघर्षादरम्यान (भारत-पाकिस्तान) ती पीआयओच्या संपर्कात होती. एसपी म्हणाले की, ज्योती मल्होत्राला तयार केले जात होते. ती इतर युट्युब इन्फ्लुएंसर्सच्या संपर्कात होती. पीआयओशीही तिचा संपर्क होता. ज्योती प्रायोजित सहलींवर पाकिस्तानला जात असे. पहलगाम हल्ल्यापूर्वी ती पाकिस्तानात होती. त्याचा काही संबंध आहे का, याचा पोलिस तपास सुरू आहे. त्याच्यासोबत इतर लोकांचाही सहभाग असल्याची माहिती आमच्याकडे असल्याने आम्ही याचाही तपास करत आहोत, असे त्यांनी सांगितले. सोशल मीडियावर असे व्हिडिओ होते ज्यात ती चीनला जाण्यासाठी व्हिसा मागत आहे. युद्धसदृश परिस्थितीत अशी बरीच माहिती असते जी तुम्हाला खूप कमी वाटेल पण ती शेअर करू नये.

## सुप्रिया सुळे पुन्हा संसदरत्न

ज्युरी समितीने केली आहे.

लोकसभेसह संसदेतील सातत्यपूर्ण सर्वोत्तम कामगिरीसाठी खासदार सुळे यांना हा पुरस्कार देण्यात येत आहे. लोकसभेत सुळे यांची आतापर्यंत ९९ टक्के उपस्थिती असून, ती राष्ट्रीय तसेच राज्य पातळीवर ८७ टक्के इतकी आहे. संसदेच्या ४७ चर्चासत्रांत सहभागी होत खासदार सुळे यांनी ११३ प्रश्न पटलावर उपस्थित केले. सुप्रिया सुळे यांच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी 'प्राईम पॉईंट फौंडेशन' तर्फे सलग दोनवेळा 'संसद महारत्न' पुरस्काराने त्यांना सन्मानित केले आहे. तब्बल ८ वेळा संसदरत्न पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला आहे. यावर्षी ४ खासदारांना त्यांच्या दीर्घकालीन आणि सातत्यपूर्ण योगदानासाठी विशेष संसदरत्न सन्मान देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे यंदाच्या यादीत राज्यातील सात खासदारांपैकी चार महिला खासदार आहेत.

## मराठा संघटनांची सोमवारी बंदची हाक

भेट घेणार आहेत. दरम्यान, शिवराजला मारहाण करणा-या सचिन मुंडे, ऋषिकेश गिरी, रोहन वाघुळकर, समाधान मुंडे, आदित्य गित्ते यांच्यासह दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे. व्हीडीओ आहेत फोटो आहेत. आरोपी हे त्यांचे समर्थक आहेत, असे म्हणत वाल्मिक कराड यांचे नाव न घेता सुरेश धस यांनी निशाना साधला. तसेच आरोपींवर कठोर कारवाई करा, अशी मागणी देखील धस यांनी केली आहे. बीडचे पोलिस अधिक्षक नवनीत कावत यांनी आवाहन केले आहे की, या प्रकरणाला जातीय रंग देण्याचा प्रयत्न करू नका. २० जणांवर गुन्हे दाखल झाले आहेत त्यामध्ये विविध जातीचे आरोपी आहेत.एकाच जातीचे नाहीत. तत्कालीन कारणामुळे वाद झाला होता. जातीय रंग देऊ नये आणि सोशल मीडियावर प्रक्षोभक पोस्ट करू नये.

## शरद पवारांचा अजित पवारांना फोन

आहे. मात्र, अजित पवारांनी या चर्चेला कुठलाही आधार नसल्याचे म्हटले. तर, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याचा निर्णय सुप्रिया सुळे घेतील, असं शरद पवारांनी म्हटल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. त्यातच, गेल्या काही दिवसांत शरद पवार आणि अजित पवार हे कार्यक्रमाच्या निमित्ताने एकत्र येताना पाहायला मिळत आहेत. आता, पुणे दौऱ्यावर असताना शरद पवारांनी थेट फोन करुन अजित पवारांना शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा केली आहे.


### जाहीर नोटीस

मे. श्री. जी. एस. बडगुजर साहेब....

४थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर दौंड, जि. पुणे यांच्या न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज नं. २५/२०२५

निशाणी- ६

१. श्रीमती. रूपाली नितीन कदम, वय ४० वर्षे,
२. साकेत नितीन कदम, वय २१ वर्षे.
३. ऋणित नितीन कदम, वय १४ वर्षे,
सर्व रा. जिजाई निवास, सहयाद्री हॉटेलजवळ,
बालाजीनगर, दौड, ता. दौंड, जि. पुणे — अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही — जाबदेणार

या जाहीर नोटीसद्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, ज्याअर्थी, उपरोक्त अर्जदार नामे श्रीमती रूपाली नितीन कदम व इतरर यांनी या न्यायालयात दि बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट सन १९२७ कलम ८ प्रमाणे त्याचे मयत पती नितीन साहेबराव कदम यांच्या मृत्यूपश्चात पत्नी म्हणून अर्जदारतर्फे २ ते ३ यांच्यासोबत वारस दाखला मिळणेकामी अर्ज दाखल केला आहे.

कै. नितीन साहेबराव कदम हे दिनांक १४/०८/२०२४ रोजी मौजे शिरवळ ता. खंडाळा, जि. सातारा येथे मयत झालेले आहेत. अर्जदार यास महाराष्ट्र पशु व मत्सविज्ञान विद्यापीठ नागपूर अंतर्गत कांतीसीह नाना पाटील पशु वैद्यकीय महाविद्यालय शिरवळ ता. खंडाळा, जि.सातारा हे अनुकंपा तत्वावर नोकरी साठी वारसपपत्राची अवश्यकत असल्याने सदर अर्ज कोर्टा दाखल केला आहे.

त्याअर्थी, या जाहीर नोटीसद्वारे तमाम लोकांना फर्माविण्यात येते की, सदर अर्जास कोणास काही हरकत दर्शविण्याचे असल्यास सदर अर्जाचे कारण दाखविण्याकरिता पुढील नेमलेली तारीख ३०/०६/२०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता या न्यायालयात व्यक्तिगत अथवा रितसर निर्दष्ट केलेल्या वकिला मार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उपरोक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल. तारेखस किंवा त्यापूर्वी बजावणीकरिता पत्ता देण्यास कसूर केल्यास तुमचा बचाव विचारात घेतला जाणार नाही.

आज दिनांक १६/०५/२०२५ रोजी माझे स्वाक्षरीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी जाहीर नोटीस दिली असे.

हुकुमावरून

शिक्का

सही

सहा अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर दौड

## बेंगळुरूमध्ये मुसळधार पाऊस



**बेंगळुरू :** बेंगळुरूमध्ये शनिवारी रात्री वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक सखल भागात पाणी साचले. भारतीय हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, जोरदार वारा, गडगडाट, विजा आणि मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचले, रस्ते पाण्याने भरून वाहत होते. शहरात अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी झाली आणि वाहनचालक आणि प्रवाशांना त्रास सहन करावा लागला. गेल्या २४ तासांत शहरात सुमारे ४० मिमी पावसाची नोंद झाली. राजधानीच्या काही भागात झाडांच्या फांद्या कोसळल्या. शहरातील साई लेआऊटला मुसळधार पावसाने झोडपून काढले. शहरात अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी झाली आणि जनजीवन विस्कळीत झाले. काही भागात गारपीट झाल्याचे वृत्त आहे. मेजेस्टिक, गांधी नगर, एमजी रोड, हलासूरू, पॅलेस गुटहळ्ळी, विधानसौध, इंदिरानगर, राजाजीनगर, यशवंतपूर, बन्नेरघट्टा रोड, बासवंगुडी, जेपी नगर, कनकपूर रोड, सारक्की, विजयनगर, चंद्र लेआउट, मगडी रोड, दीपांजली नगर, म्हैसूर रोड, नागवारा, मूडलपाळ्या, गोविंदराज नगर, कामाक्षीपाळ्या, राजराजेश्वरी नगर, येलाहंका, कब्बन पार्क, टाऊन हॉल, होसहळ्ळी, केंगेरी, शांतीनगर, हेब्बाळ, सीबीआय, मेख्री सर्कल, गंगेनहळ्ळी, नागवारा, मान्यता टेक पार्क, कोडिगेहळ्ळी गेट, कमलानगर, मल्लेश्वर, शिवानंद सर्कलसह शहराच्या अनेक भागात पाऊस पडला.

## वाराणसीत दोन गो-तस्करांना अटक




**वाराणसी (उत्तर प्रदेश) :** येथील दाफी टोल नाक्याजवळ रविवारी सकाळी झालेल्या चकमकीनंतर दोन कथित गोतस्करांना अटक करण्यात आली. पळून जाण्याच्या प्रयत्नात आरोपींनी पोलिसांवर गोळीबार केला आणि पोलिसांनी प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात ते जखमी झाले. काशी झोनचे अतिरिक्त पोलिस उपायुक्त टी. सरवनन यांनी सांगितले की, गुप्त माहितीच्या आधारे परिसरातील सर्व पोलिस ठाण्यांना वाहनांची सखोल तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले होते.

## मणिपूरमध्ये ३५० हून अधिक बंडखोरांना अटक



**इंफाळ :** मणिपूरमधील सुरक्षा दलांनी खंडणी रॅकेटविरोधात केलेल्या कारवाईत ३५० हून अधिक बंडखोरांना अटक केली असून, प्रामुख्याने खोऱ्यातील गट आता वैवाहिक वाद सोडविण्यासाठी पैशांची मागणी करत आहेत, तसेच मालमत्ता आणि सरकारी निविदांमध्ये कपात यासारख्या पारंपारिक उद्दिष्टांची मागणी केली जात आहे. राज्यात राष्ट्रपती राजवट लागू झाल्यानंतर फेब्रुवारीच्या मध्यापासून या बंडखोरांची निवड करण्यात आली होती. बंडखोरांना मदत केल्यास खंडणीच्या प्रयत्नांची माहिती पोलिसांना द्यावी अन्यथा कायदेशीर परिणामांना सामोरे जावे, असे स्पष्ट निर्देश राज्यपाल प्रशासनाकडून सर्वसामान्य ना देण्यात आले आहेत.

## घुसखोरांना हद्दपार करण्यासाठी विशेष दल स्थापन करा



**रांची :** बांगलादेशी घुसखोरांची ओळख पटवून त्यांना हद्दपार करण्यासाठी हेमंत सोरेन यांच्या नेतृत्वाखालील सरकारने विशेष टास्क फोर्स स्थापन करावा, अशी मागणी भाजपचे ज्येष्ठ नेते आणि झारखंडचे माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन यांनी केली आहे. बांगलादेशी घुसखोरीमुळे झारखंडची लोकसंख्या झपाट्याने बदलत असून त्यामुळे आदिवासी समाजाच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. देशातील बेकायदा बांगलादेशी स्थलांतरितांविरुद्धच्या लढ्यात निर्णायक पाऊल उचलल्याबद्दल मी केंद्र सरकारचे आभार मानतो. आता मी राज्य सरकारला विनंती करतो की, झारखंडमधून बांगलादेशी घुसखोरांची ओळख पटवून त्यांना हद्दपार करण्यासाठी टास्क फोर्स स्थापन करावा, असे चंपई सोरेन यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# स्माईलिंग बुद्धाची ५१ वर्षे

## अण्वस्त्रधारी राष्ट्र म्हणून भारताचा उदय, कर्तृत्व जगासमोर सिद्ध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** ५१ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी भारताने 'स्माईलिंग बुद्धा' मोहीम राबवून जगाला आपली ताकद दाखवून दिली होती. १८ मे १९७४ रोजी झालेल्या पोखरण-१ बॉम्बस्फोटाने भारत जगातील सहावी अणुशक्ती तर बनलाच, शिवाय विज्ञान आणि सुरक्षेच्या बाबतीत भारत कोणाच्याही मागे राहणार नाही, असा संदेशही दिला. आज भारत केवळ एक जबाबदार अण्वस्त्रधारी राष्ट्र म्हणून उदयास आला नाही, तर लष्करी सामर्थ्य, तांत्रिक कौशल्य आणि सामरिक दूरदृष्टीच्या जोरावर त्याने आपले कर्तृत्व जगासमोर सिद्ध केले आहे.

पोखरण चाचणीसाठी 'स्माईलिंग बुद्धा' हे कोड नेम होते. ही मोहीम भारताच्या इतिहासातील एक टर्निंग पॉईंट होती जेव्हा देशाने जगाला दाखवून दिले की आपण केवळ सभ्यता आणि शांततेचे प्रतीक नाही, तर गरज`नुसार लष्करी आणि तांत्रिक सामर्थ्यदेखील आहोत. अमेरिका, रशिया, ब्रिटन, फ्रान्स आणि चीननंतर अण्वस्त्रे विकसित करण्याची क्षमता असणारा भारत हा सहावा देश ठरला आहे.

पोखरण-१ नंतर अमेरिकेसह अनेक देशांनी भारतावर निर्बंध लादले, पण डीआरडीओ, बीएआरसी आणि इस्रोसारख्या संस्थांनी मिळून देशाला तांत्रिक स्वावलंबनाच्या दिशेने नेले. ११ आणि १३ मे १९९८ रोजी तत्कालीन अटलबिहारी वाजपेयी सरकारने पाच अणुचाचण्या केल्या, ज्यात भारताने स्वतःला 'अण्वस्त्रधारी राष्ट्र' म्हणून घोषित केले. त्याचबरोबर भारताने दोन प्रमुख तत्त्वांचा अवलंब केला. पहिली गोष्ट म्हणजे अणुहल्ला करणारा भारत पहिला देश ठरणार नाही. दुसरं म्हणजे भारत फक्त कमीत कमी पण विश्वासार्ह शक्ती ठेवणार आहे.





### भारत आता कुठे उभा आहे?

स्वीडिश संस्था सिपरीनुसार, २०२४ पर्यंत भारताकडे १६० ते १७० अण्वस्त्रे आहेत. एवढेच नव्हे तर जमीन, पाणी आणि आकाशातून अणुहल्ले करण्याची पूर्ण क्षमता आता भारताकडे आहे. अग्नी-१ ते अग्नी-५ पर्यंत लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे जमिनीत आहेत. पाण्यात आयएनएस अरिहंतसारखी अण्वस्त्रवाहू पाणबुड्या आणि आकाशात मिराज-२००० आणि सुखोई-३० एमकेआय सारखी लढाऊ विमाने आहेत.

### ५१ वर्षांचे पाच टर्निंग पॉइंट्स



१९७४ मध्ये पोखरण-१ ने भारताच्या अणुऊर्जेत पहिला प्रवेश केला. १९९८ मध्ये पोखरण-२ चाचणीने अणुराष्ट्राला अधिकृत मान्यता दिली. २००३ मध्ये अणुसिद्धांताचे धोरण ठरविण्यात आले. २०१६ मध्ये आयएनएस अरिहंत ही अण्वस्त्रवाहू पाणबुडी भारतीय लष्करात दाखल झाली होती. २०२० नंतर एमआयआरव्ही तंत्रज्ञान आणि अग्नी-५ सारखे अत्याधुनिक क्षेपणास्त्र तंत्रज्ञान लष्कराच्या ताफ्यात दाखल झाले.

### आंतरराष्ट्रीय प्रभाव

भारताचे आण्विक धोरण अजूनही 'नो फर्स्ट यूज'वर आधारित असले तरी गेल्या काही वर्षांत पुनर्मूल्यांकनाचा आवाज उठत आहे. भारताच्या सामरिक ताकदीमुळे चीन आणि पाकिस्तानविरोधात समतोल साधणारी शक्ती बनली आहे.

# रशियाचा युक्रेनवर मोठा ड्रोन हल्ला

## तब्बल २७३ ड्रोन डागले, युक्रेनी शहरांचा मोठा विध्वंस

रशियाने युक्रेनवर आतापर्यंतचा सर्वात मोठा ड्रोन बॉम्बहल्ला केला आहे. युक्रेनच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, हा हल्ला युद्ध सुरू झाल्यापासूनचा सर्वात घातक हल्ला होता. या हल्ल्यानंतर युक्रेनच्या शहरांमध्ये विध्वंसाची दृश्ये पाहायला मिळत आहेत. कीव भागात झालेल्या या हल्ल्यात एका महिलेचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. युक्रेनच्या अधिकाऱ्यांनी रविवारी ही माहिती दिली. या हल्ल्यात रशियाने २७३ ड्रोन डागले.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** युक्रेनच्या हवाई दलाने दिलेल्या माहितीनुसार, बहुतांश हल्ले कीव्हच्या मध्य भागआणि देशाचा पूर्व भाग, निप्रोपेत्रोव्स्क आणि डोनेत्स्क भागांना लक्ष्य करून करण्यात आले. यापूर्वी फेब्रुवारी २०२५ मध्ये रशियाने २६७ ड्रोन हल्ले केले होते, जो त्यावेळी एक विक्रम ठरला होते.

इस्तंबूलमध्ये तीन वर्षांनंतर रशिया-युक्रेन शांतता चर्चा नुकतीच अयशस्वी ठरली. दोन्ही पक्षांमध्ये केवळ कैद्यांच्या देवाणघेवाणीबाबत एकमत झाले, पण शस्त्रसंधीबाबत कोणताही करार होऊ शकला नाही. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांच्याशी चर्चा करणार असल्याचे सोमवारी जाहीर केले. कीव्ह भागातील ओबुखिव जिल्ह्यात रविवारी पहाटे झालेल्या साखळी हल्ल्यात एका २८ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला, तर चार वर्षांच्या मुलासह किमान तीन जण जखमी झाले. सर्व जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या हल्ल्यात अनेक निवासी इमारतींचेही नुकसान झाले आहे.

आदल्या दिवशी युक्रेनच्या सुमी भागात रशियाने एका बसवर केलेल्या ड्रोन हल्ल्यात नऊ नागरिक ठार झाले होते. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांनी हा जाणीवपूर्वक केलेला हल्ला असल्याचे सांगत रशियावर कडक निर्बंध घालण्याची मागणी केली आहे. मात्र, त्यांनी लष्करी तळाला लक्ष्य केल्याचा दावा रशियाने केला आहे.

### युक्रेनने ८८ ड्रोन पाडल्याचा दावा

● युक्रेनच्या हवाई संरक्षण दलाने ८८ ड्रोन पाडले, तर १२८ सिम्युलेटेड ड्रोन कोणतेही नुकसान न होता कोसळले. कीव आणि आसपासच्या भागात तब्बल नऊ तास हवाई हल्ल्याचा इशारा देण्यात आला होता. युक्रेनच्या डिसइन्फॉर्मेशन सेंटरचे प्रमुख आंद्रेई कोवालेंको म्हणाले, 'रशियाने वाटाघाटीच्या वेळी धमकावण्यासाठी नेहमीच युद्धाचा आधार घेतला आहे.

# ट्रम्प करणार रशियाशी बोलणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** रशिया आणि युक्रेन यांच्यातील शांतता चर्चेत निष्फळ ठरल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी युद्धविरामासाठी चर्चा करणार असल्याचे म्हटले आहे. हा रक्तपात थांबवण्यासाठी आम्ही राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्याशी चर्चा करू, असे ते म्हणाले. ट्रम्प यांनी शनिवारी सोशल मीडिया पोस्टमध्ये 'रक्तपात थांबवा' अशी थीम असेल, असे म्हटले आहे.

त्यानंतर युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्होलोदिमीर झेलेन्स्की आणि नाटो सदस्यांशीही चर्चा करण्याचा विचार असल्याचे ट्रम्प यांनी सांगितले. ट्रुथ सोशलवर ट्रम्प यांनी लिहिले की, आशा आहे की हा दिवस फलदायी असेल.

युक्रेनसोबत तुर्कस्तानमध्ये झालेल्या चर्चेचे सकारात्मक परिणाम होतील, असे रशियाने म्हटले होते. दोन्ही देशांमध्ये कराराची परिस्थिती निर्माण होऊ शकते, असे रशियाने म्हटले आहे. तुरकिये येथे झालेल्या चर्चेत दोन्ही देशांमध्ये केवळ १००० कैद्यांच्या सुटकेवर एकमत झाले. शांतता चर्चेनंतर लगेचच रशियाने युक्रेनमध्ये एका प्रवासी बसवर ड्रोन हल्ला केला, ज्यात किमान ९ जण ठार झाले. तर पाचहून अधिक जण जखमी झाले आहेत.

यानंतर झेलेन्स्की म्हणाले की, युरोपातील देशांनी रशियावर कडक निर्बंध लादावेत जेणेकरून त्याला शस्त्रसंधीची तयारी करावी लागेल.

अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ यांनी शनिवारी रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव्ह यांना दूरध्वनी करून तुर्कस्तानच्या इस्तंबूल शहरात युक्रेन आणि रशियाच्या शिष्टमंडळांमध्ये झालेल्या थेट चर्चेच्या निकालावर चर्चा केली. रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या वेब पोर्टलवरील निवेदनात म्हटले आहे की, मार्को रुबिओ यांनी युद्धकैद्यांच्या देवाणघेवाणीबाबतचे करार आणि शस्त्रसंधीसाठी आवश्यक अटींची रूपरेषा तयार करून आपापले प्रस्ताव तयार करण्याच्या दोन्ही बाजूंच्या हेतूचे स्वागत केले.

चर्चेतून तोडगा काढण्याच्या प्रयत्नांना पाठिंबा देण्याच्या अमेरिकेच्या तयारीचा त्यांनी पुनरुच्चार केला, असे निवेदनात म्हटले आहे.

इस्तंबूलमध्ये चर्चा पुन्हा सुरू करण्याचा राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांचा प्रस्ताव अखेर स्वीकारण्यासाठी युक्रेनला प्रोत्साहित करण्यासाठी अमेरिकेने बजावलेल्या रचनात्मक भूमिकेची परराष्ट्रमंत्री लावरोव यांनी कबुली दिली.

# इस्रोचे ईओएस -०९ मिशन अपयशी

## तिसऱ्या टप्प्यात तांत्रिक बिघाड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली ;** भारतीय अंतरिक्ष संशोधन संस्था (इस्रो)च्या ईओएस-०९ मिशनला रविवारी सकाळी ५.३९ वाजता श्रीहरिकोटा येथून प्रक्षेपण करण्यात आले. एसएलव्ही-सी६१ रॉकेटने या उपग्रहाला सूर्य-समकालिक ध्रुवीय कक्षेत स्थापित करण्याचा उद्देश होता. प्रक्षेपणाच्या सुरुवातीच्या दोन टप्प्यांमध्ये सर्व काही सुरळीत होते, परंतु तिसऱ्या टप्प्यात तांत्रिक बिघाड झाल्यामुळे उपग्रह नियोजित कक्षेत पोहोचू शकला नाही आणि मिशन अपयशी ठरले.

भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो)ने एक मोठी मोहीम सुरू केली. रविवारी श्रीहरिकोटा येथून हे अभियान सुरू करण्यात आले. हे इस्रोचे १०१ वे अभियान होते. या मोहिमेत, एक उपग्रह प्रक्षेपित करण्यात आला. तो पृथ्वी निरीक्षण उपग्रह असून, सूर्याभोवती कक्षेत त्याला स्थापित करायचे होते. परंतु दुर्दैवाने, ही मोहीम यशस्वी होऊ शकले नाही. इस्रो प्रमुखांनी सांगितले की पीएसएलव्ही रॉकेटचे चार टप्पे आहेत. पहिल्या दोन टप्प्यांपर्यंत सर्व काही ठीक होते. पण प्रक्षेपणानंतर, तिसऱ्या टप्प्यात तांत्रिक बिघाड आढळून आला, ज्यामुळे मोहीम अपूर्ण राहिली.



**सेंट लुईस** अमेरिकेच्या मिसूरीतील सेंट लुईस येथे एका दुमजली घराची मागील भिंत चक्रीवादळात पूर्णपणे उद्ध्वस्त झाली. त्यानंतर येथील रहिवासी झालेल्या नुकसानीची पाहणी करताना दिसून येत आहेत.

# चीन उभा राहतोय पाकिस्तानच्या पाठी




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारताकडून लाजिरवाणा पराभव पत्करलेला पाकिस्तान आता मदतीसाठी चीनवर अवलंबून आहे. पाकमधील दहशतवादी तळांवर भारताने ऑपरेशन सिंदूर यशस्वीपणे राबवल्यानंतर, चीन पाकिस्तानच्या समर्थनार्थ उघडपणे बोलू शकला नसला, तरी आता तो असे पाऊल उचलणार आहे, त्यामुळे भारताच्या अडचणी वाढतील, असे मानले जाते. मात्र, भारताचे संरक्षण तंत्रज्ञान आणि हवाई दल आता इतके प्रगत झाले आहे की, पाकिस्तानसारखे देश भारताला रोखण्यास अपयशी ठरतील. पाकिस्तानी लष्करी अधिकाऱ्यांच्या हवाल्याने प्रसारमाध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, चीन पाकिस्तानला जे-३५ स्टेल्थ लढाऊ विमानांच्या पुरवठ्याला गती देण्याचा प्रयत्न करत आहे.

चीन आणि पाकिस्तानने पाचव्या पिढीच्या ४० जे-३५ स्टेल्थ विमानांचा करार केला आहे. पाकिस्तानला या वर्षाच्या अखेरीपर्यंतच पहिला सेट मिळू शकतो, असे सांगितले जात आहे. पाकिस्तानला ही विमाने मिळाल्यास पाकिस्तानचे हवाई दल भारतापेक्षा किमान १२ वर्षे पुढे असेल, असा दावा पाकिस्तानच्या एका निवृत्त लष्करी अधिकाऱ्याने केला आहे.

पाकिस्तानी हवाई दलाचे निवृत्त अधिकारी एअर कमोडोर झिया-उल-हक शम्सी यांनी सांगितले की, भारत पुढील १२ वर्षे पाचव्या पिढीचे लढाऊ विमान तैनात करू शकणार नाही.

कदाचित पाकिस्तानच्या या प्रतिनिधींना हे माहित नसेल की भारत सरकारने तिन्ही दलांसाठी ४०,००० कोटी रुपयांच्या आपत्कालीन संरक्षण खरेदीला मंजुरी दिली आहे. अशा परिस्थितीत त्याला सामोरे जाण्यासाठी भारत प्रत्येक शस्त्र ाचा वापर करण्यास सक्षम आहे, हे ही पाकिस्तानला ठाऊक नाही.

लष्कराला देण्यात आलेल्या नव्या अधिकारांनुसार लष्करसंरक्षण खरेदी वेगाने करू शकते. कंत्राटाची मर्यादा ३०० कोटी असेल. यामध्ये लांब पल्ल्याची शस्त्रे, क्षेपणास्त्रे, स्पाइस-२००० आणि स्कॅल्प सारखे अचूक मार्गदर्शित बॉम्ब आणि इतर धोकादायक शस्त्रांचा समावेश आहे. याअंतर्गत ४० दिवसांत करार अंतिम केला जाईल आणि डिलिव्हरीदेखील १ वर्षाच्या आत करावी लागेल.

चीनच्या जे-३५ लढाऊ विमानाची निर्मिती शेनयांग एअरक्राफ्ट कॉर्पोरेशनने केली आहे. परदेशात निर्यात करण्याच्या उद्देशानेच चीनने ते तयार केले आहे. लवकरच ती पाकिस्तानी लष्कराचा भाग असेल, असे पाकिस्तानी हवाई दलाने म्हटले आहे.

# जमिनीच्या हस्तांतरास पूर्णपणे बंदी

## हरकती नोंदवण्यासाठी १५ दिवसांचा कालावधी, सातबारावर शिक्के

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**सासवड :** पुरंदरमधील शेतकऱ्यांनी विमानतळ प्रकल्पाला केलेला कडवा विरोध झुगारून अखेर शासनाने सातबारा उतारावर विमानतळाचे शेरे मारण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, शासनाने सातबारा उतारावर इतर हक्कात शेरे मारले असून यापुढे आता जमिनीच्या हस्तांतरास पूर्णपणे बंदी आली आहे.

दरम्यान, सातबारा उतारावर शेरे मारल्यानंतर हरकती नोंदविण्यास १५ दिवसांचा कालावधी देण्यात आला असून शेतकऱ्यांना आपले म्हणणे मांडण्यास मुभा देण्यात आली आहे. तसेच या कालावधीत कोणतीही हरकत न आल्यास तुमचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल असे स्पष्ट केले आहे.

पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवादी, कुंभारवळण, पारगाव, एखतपूर, मुंजवडी, खानवडी अशा सात गावांत विमानतळ प्रकल्पाची आखणी करण्यात आली असून यासाठी २८३२ हेक्टर क्षेत्र संपादित केले जाणार आहे. यासाठी शासकीय विविध पातळ्यांवर प्रयत्न करीत आहे. दरम्यान, आंदोलने, मोर्चे, उपोषणानंतर शेतकरी आणि पोलिसांमध्ये झटापटी अशी अनेक प्रकरण्यांसोबत पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. तरी शेतकऱ्यांच्या कोणत्याही मोर्चा, निवेदने, आंदोलने यांचा विचार न करता शासन गावोगावी नोटीस पाठवून मोकळे होत आहेत.

मागील आठवड्यात सात गावांसाठी नियुक्त केलेल्या भूसंपादन अधिकाऱ्यांनी प्रकल्प अंतर्गत येणाऱ्या जमिनीवर तातडीने प्रस्तावित पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळाचे भूसंपादन करिता क्षेत्र संपादित असा शेरा जमिनीच्या सातबारा उतारावरील इतर हक्कात नोंद करण्यात यावा आणि सातबारा व फेरफार कार्यालयास सादर करावा याबाबत विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा स्पष्ट सूचना केल्या होत्या.

### विमानतळासाठी संपादित शेरा

● विमानतळ प्रकल्पबाधित सातही गावांतील मंडलाधिकारी आणि गाव कामगार तलाठी यांनी संबंधित गावातील प्रकल्प अंतर्गत येणाऱ्या जमिनीवर विमानतळासाठी संपादित असे शेरे मारण्यास सुरुवात केली आहे. उदाचीवाडी, मुंजवडी या गावांचे शिक्के मारण्यात आले असून येत्या दोन दिवसांत उर्वरित वनपुरी, कुंभारवळण, एखतपूर, खानवडी आणि पारगाव या गावांतील प्रकल्पांतर्गत येणाऱ्या जमिनीवर शिक्के मारण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल असे मंडलाधिकारी दुर्गादास शेळकंदे यांनी सांगितले.

### शेतकऱ्यांच्या भूमिकेकडे लक्ष

● सातबारावर आता शिक्के आल्याने जमीन हस्तांतरण प्रक्रिया थांबली आहे. मात्र जमीन देण्यास विरोध करणारे शेतकरी आता कोणती भूमिका घेणार. कारण शेतकऱ्यांना केवळ न्यायालयाचाच एकमेव आधार असल्याने न्यायालयामध्ये जावून प्रकल्पाच्या स्थगितीसाठी आणि शिक्के काढण्यासाठी प्रायत्न करणार की पुन्हा उपोषणाचे अस्त्र उपसणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पाकचा मुखवटा फाटणे आवश्यकच

## खा. सुप्रिया सुळे यांचे प्रतिपादन, संधी दिल्याबद्दल केंद्राचे मानले आभार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** दहशतवादाच्या विरोधातील भारताची कठोर भूमिका आणि संदेश जागतिक पातळीवर मांडण्यासाठी देशातर्फे पाठविल्या जाणाऱ्या एका शिष्टमंडळात खासदार सुप्रिया सुळे यांचा समावेश करण्यात आला आहे. ही संधी प्रदान केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, परराष्ट्र व्यवहार मंत्रालय आणि केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांचे सुळे यांनी आभार मानले आहेत

सीमेपलिकडून पाकिस्तान सातत्याने दहशतवादी कारवाया करीत आहे. त्याचा भांडाफोड होऊन मुखवटा फाटणे आवश्यक आहे. सर्व प्रकारच्या दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी आम्ही कटिबद्ध असून त्यासाठी शक्य ते सर्व काही करण्यास भारत तयार आहे. देशाच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्यासाठी आपण सक्षम असल्याचे भारताने वेळोवेळी जगाला दाखवून दिले ही वस्तुस्थिती आहे. बारामती लोकसभा मतदारसंघातील जनतेची प्रतिनिधी म्हणून देशाचे जागतिक पातळीवर प्रतिनिधित्व करण्याची



संधी आपल्याला मिळाली हा मोठा बहुमान आहे. मतदार संघातील जनतेने आपल्यावर सातत्याने टाकलेला विश्वास, दिलेले अलोट प्रेम आणि सेवेची संधी यामुळेच हे शक्य झाले आहे. याबद्दल आपण सर्वांचे ऋणी आहोत, अशी भावना खासदार सुळे यांनी व्यक्त केली आहे.

आपल्या देशाची एकता, स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व अखंड, अबाधित राखण्यासाठी आम्ही सर्वजण कटिबद्ध आहोत, असे सांगत सुळे यांनी दहशतवादाविरोधात भारताची भूमिका जागतिक पटलावर मांडण्यास समस्त देशवासियांच्या वतीने आपण कटिबद्ध आहोत, असे पुढे नमूद केले आहे. दहशतवादाच्या विरोधातील भारताची कठोर भूमिका आणि संदेश जागतिक पातळीवर मांडण्यासाठी पाठविल्या जाणाऱ्या शिष्टमंडळाचे नेतृत्व करण्याची संधी मला मिळाली आहे.

ही संधी प्रदान केल्याबद्दल प्रधानमंत्री मा. नरेंद्रजी मोदी, परराष्ट्र व्यवहार मंत्रालय आणि केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू जी यांचे मनापासून आभार, असे त्यांनी म्हटले आहे.

### दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी कटिबद्ध

● सीमेपलिकडून सातत्याने दहशतवादी कारवाया केल्या जात आहेत. त्याचा भांडाफोड होणे आवश्यक आहे. सर्व प्रकारच्या दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी आम्ही कटिबद्ध असून त्यासाठी शक्य ते सर्व काही करण्यास भारत तयार आहे. देशाच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्यासाठी आपण सक्षम असल्याचे भारताने वेळोवेळी जगाला दाखवून दिले ही वस्तुस्थिती आहे. आपल्या बारामती लोकसभा मतदारसंघातील जनतेची प्रतिनिधी म्हणून देशाचे जागतिक पातळीवर प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली हा मोठा बहुमान आहे. आपण माझ्यावर सातत्याने टाकलेला विश्वास, दिलेले अलोट प्रेम आणि सेवेची संधी यामुळे हे शक्य झाले आहे. याबद्दल मी आपणा सर्वांची ऋणी आहे, असेही त्यांनी म्हटले आहे.

# गावनिहाय आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** आपत्कालीन परिस्थितीचा विचार करता तलाठी, ग्रामसेवक, सरपंच, पोलीस पाटील आदींनी मिळून गावनिहाय आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करावा, असे निर्देश पंचायत समिती सभागृहात आयोजित तालुका आपत्ती प्राधिकारणाची मान्सूनपूर्व आढावा बैठकीत तहसीलदार तथा तालुका आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष गणेश शिंदे यांनी दिले.

यावेळी गट विकास अधिकारी डॉ. अनिल बागल, पोलीस निरीक्षक वैशाली पाटील, सहायक गट विकास अधिकारी नंदन जरांडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मनोज खोमणे, विस्तार अधिकारी भीमराव भागवत यांच्यासह सर्व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

शिंदे म्हणाले, आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना आवश्यक त्या सर्व सोई-सुविधा मिळतील तसेच जीवितहानी टाळण्यासोबतच गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने नियोजन करावे. पाणी पातळीत वाढ झाल्यानंतर करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत पूर नियंत्रण आराखडा निश्चित करावा. धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याबाबत नागरिकांना पूर्वसूचना वेळेत मिळेल याबाबत नियोजन करावे. कालवा परिसरात नागरिकांची होणारी जीवितहानी टाळण्यासाठी सुरक्षिततेच्यादृष्टीने फलके लावावीत. सार्वजनिक बांधकाम विभागाने धोकादायक तसेच अतिधोकादायक ठिकाणे, गावे, पुल, रस्ते, पूरबाधित गावे आदीबाबतची माहिती सर्व संबंधित विभाग तसेच नागरिकांना माहिती द्यावी. धोकादायक तसेच अतिधोकादायक ठिकाणे, गावे, पुल, रस्ते, पूरबाधित गावांची पाहणी करुन आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात.

आपत्तीच्यावेळी उपयोगात येणारी बुलडोझर्स, वॉटरटँकर्स, डंपर्स, अर्थमुव्हर्स, डिवॉटरींग पंप्स, जनरेटर्स, ट्री कटर्स, फल्ड लाईट, आर.सी. सी.कटर्स, इत्यादी साहित्याची चालू स्थितीमध्ये असल्याबाबत याची खात्री करुन घ्यावी. तालुक्यातील रुग्णालये, खाटा, वैद्यकीय अधिकारी, रुग्णवाहिका, रक्तपेढी, औषधे साठा तयार ठेवावे. साथीचे रोग व उपचारपद्धती आदीबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, याबाबत नागरिकांना माहिती द्यावी, अशा सूचना शिंदे यांनी दिल्या.

श्रीमती पाटील म्हणल्या, आपत्तीच्या काळात घडलेल्या घटनेबाबत प्रशासनास तात्काळ माहिती द्यावी. पोलीस प्रशासनाच्यावतीने आपत्तीच्या काळात सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असेही त्या म्हणाल्या. यावेळी सर्व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी मान्सून पूर्व तयारीच्या अनुषंगाने करीत असलेल्या तयारीबाबत माहिती दिली.

# बारामतीत सीएनजीचा तुटवडा कायमचाच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** बारामती शहर व तालुक्यात सीएनजी इंधन पंपांची संख्या अत्यंत मर्यादित आहे. ज्या पंपांवर सीएनजी दिला जातो तेथेही तो बहुतांश वेळा संपल्याची स्थिती निर्माण होते. परिणामी, वाहनचालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले. सीएनजी उपलब्ध झाला की पंपासमोर लांबच लांब लागणाऱ्या रांगा हे आता नेहमीचे चित्र होऊन बसले आहे. सीएनजी संपला आहे, हे फलक पाहून वाहनचालक आता हैराण झाले आहेत.

बारामती शहरात बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघ, बारामती तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ, बारामती कृषी उत्पन्न बाजार समिती या संस्थांच्या इंधन पंपावर सीएनजी उपलब्ध करून दिला जातो. एमआयडीसीत एका खासगी पंपावर ही व्यवस्था आहे. याशिवाय तालुक्याच्या ग्रामीण भागात निरा रस्त्यावर फक्त निंबुत येथेच समता पतसंस्थेच्या पंपावर सीएनजी विक्री होते, तर जेजुरी रस्त्यावर फक्त मोरगाव येथील पंपावर सीएनजीची व्यवस्था आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी (दि. 16) मुढाळे येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना भविष्यात प्रत्येक पंपावर इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन उभारण्याचा मानस व्यक्त केला. अलिकडील काळात इलेक्ट्रिक वाहनांची संख्या वाढत चालली आहे. परंतु, सध्या सीएनजीसाठीच नागरिकांना धावाधाव करावी लागत असून, आधी यातून मार्ग काढण्याची मागणी सीएनजी वाहनधारक करीत आहेत.

# मायक्रो टर्नर कंपनी कामगारांच्या वेतनामध्ये भरघोस वाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** चाकण एमआयडीसीमधील महाळुंगे , ता.खेड येथील मायक्रो टर्नर कंपनी व्यवस्थापन आणि शिवशाही कामगार संघटना यांच्यामध्ये नुकताच वेतन करारनामा स्वाक्षरी कार्यक्रम पार पडला. वेतनामध्ये भरघोस वाढ होणार असल्याने या करारनाम्यामुळे कंपनी कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. कामगार तसेच शिवशाही संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी या निर्णयाचे एकमेकांना पेढे वाटून स्वागत केले.

करारनाम्याचा कालावधी जानेवारी २०२५ ते डिसेंबर २०२७ या तीन वर्षांकरिता असणार आहे. करारनाम्याप्रमाणे कंपनी कामगारांच्या वेतनामध्ये प्रत्येकवर्षी १०.९७ टक्क्यांची भरघोस वाढ करण्यात आली आहे. पहिल्या वर्षी ४० टक्के, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी ३० टक्के याप्रमाणे वेतनामध्ये वाढ करण्यात आली आहे.

तसेच या करारनाम्यामुळे कामगारांना महागाई भत्ता, जीपीए पॉलिसी, फॅमिली पॉलिसी, पोशाख, दिवाळी व वार्षिक सानुग्रह अनुदान, वेतनाच्या तीनपट बिनव्याजी आगाऊ रक्कम व सहापट आपातकालीन रक्कम अशा विविध योजनांचा लाभ मिळणार आहे. याप्रसंगी कंपनीचे प्लांट प्रमुख रवींद्र शर्मा, ऑपरेशन प्रमुख योगेंद्र द्विवेदी, एच.आर. प्रमुख कुलदीप खत्री, शिवशाही कामगार संघटना अध्यक्ष कैलास सांडभोर, कार्याध्यक्ष वसंत भसे, सेक्रेटरी चैतन्य टाकळकर, सुरेश पिंगळे, विशाल आगळे, दिपक गुंजाळ, भीमराय बिराजदार, गणेश गाडे, दत्ता भसे, सुभाष काळे व कामगार उपस्थित होते.



मायक्रो टर्नर कंपनी कामगारांच्या वेतनामध्ये भरघोस वाढ झाली म्हणून पेढे वाटप करताना कैलास सांडभोर, वसंत भसे व इतर. ( छायाचित्र - निखिल पाचारणे)

# ‘पाटी’ एकांकिकेस अजितपर्व स्पर्धेत विजेतेपद

## प्रथम पारितोषिक व करंडक पटकावत ५१,००० रुपयांचे पारितोषिक




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** विद्या प्रतिष्ठानच्या कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या रंगकर्मींची सादर केलेली ‘पाटी’ ही एकांकिका अजितपर्व राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत झळकली आणि एकूण ५१,००० रुपयांचे प्रथम पारितोषिक व करंडक पटकावत भरघोस यश मिळवले. या एकांकिकेने केवळ सांघिक प्रथम क्रमांक मिळवला नाही, तर दिग्दर्शन व अभिनय अशा प्रमुख श्रेणींमध्येही बाजी मारली.

या स्पर्धेत ‘पाटी’ एकांकिकेचे दिग्दर्शक सुबोधन जोशी व आदेश यादव यांना दिग्दर्शनाचा प्रथम क्रमांक मिळाला. त्यांच्या प्रभावी संकल्पना, भेदक दृश्यरचना आणि कसदार सादरीकरणामुळे प्रेक्षक आणि परीक्षक मंत्रमुग्ध झाले. अभिनयाच्या श्रेणीत देखील श्रध्दा रंगारी हिने स्त्री अभिनयाचा प्रथम क्रमांक पटकावला. तिची भूमिकेतली संवेदनशीलता आणि भावनांची सखोल मांडणी विशेषत्वाने लक्षात राहिली. सुजल बर्गे याने पुरुष अभिनयाचा प्रथम क्रमांक मिळवून पुन्हा एकदा आपली अभिनय क्षमता सिद्ध केली.

‘पाटी’ एकांकिका सामाजिक आशय आणि मानवी भावभावनांचा समतोल साधणारी प्रभावी कलाकृती ठरली. यातून लेखकाचे प्रगल्भ लेखन, सादरीकरण कौशल्य आणि रंगभूमीवरील समर्पण दिसून आले. या यशामागे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भरत शिंदे, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. हणमंतराव पाटील, आणि मार्गदर्शक प्राध्यापक डॉ अमर भोसले प्रा. विजयराव काकडे यांचे मोलाचे योगदान आहे. विद्या प्रतिष्ठान संस्थेचे उपाध्यक्ष अॅड अशोक प्रभुणे, सचिव अॅड नीलिमा गुजर, खजिनदार युगेंद्र पवार, खा. सुप्रिया सुळे, खा. सुनेत्रा पवार, डॉ राजीव शहा, मंदार सिकची, किरण गुजर, कर्नल कंबोज, प्राचार्य डॉ भरत शिंदे यांनी पाटी या एकांकिकेमधील सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले.

## तायक्वांदो स्पर्धेत दहा सुवर्ण पदके मिळवू न जिल्हा प्रथम



**जेजुरी :** नाशिक येथे तायक्वांदो असोसिएशन महाराष्ट्र या राज्यस्तरीय संघटने अंतर्गत तायक्वांदो खेळाच्या राष्ट्रिय स्तर स्पर्धेसाठी निवड चाचणी स्पर्धा पार पडल्या . या स्पर्धेत पुणे जिल्हा ग्रामीण संघाने दहा सुवर्ण पदक मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला. जागतिक तायक्वांदो नियमांनुसार या स्पर्धा पार पडल्या या स्पर्धेत अमॅच्युर तायक्वांदो असोसिएशन पुणे जिल्हा ग्रामीण या संघाने दहा सुवर्ण, नऊ रौप्य ,दहा कांस्य पदक मिळवुन ज्युनियर गटात प्रथम व कॅडेट गटात द्वितीय क्रमांक पटकविला. या खेळाडूंना नितीन गुंडा, हेमंत इंगळे, संतोष वरघडे, प्रणव निवंगुणे, दत्तात्रय कदम, सुमित खंडागळे, सुरेश राठोड, सुरज जाधव, डेविड गौंउडर, विशाल माने यांचे मार्गदर्शन मिळाले. या स्पर्धेत सुमारे २० जिल्हयांतील खेळाडूंनी सहभाग घेतला होता, अशी माहिती पुणे जिल्हा संघटनेचे सचिव दत्तात्रय कदम यांनी दिली .

## जेजुरी जिजामाता इंग्लिश स्कूलचा गौरव



**जेजुरी :** श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ,सासवड संस्थेच्यावतीने आयोजित गुणगौरव कार्यक्रमात जेजुरी येथील जिजामाता इंग्लिश स्कूलचा दहावीच्या उत्कृष्ट निकाला बद्दल गौरव करण्यात आला. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन मध्ये इयत्ता दहावी तसेच बारावीमधील संस्थेतील प्रथम तीन क्रमांकाचे मानकरी व उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखलेल्या विदयालयांचा गुणगौरव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी चंदुकाका जगताप यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात जेजुरी जिजामाता मिडीयम स्कूल विद्यार्थ्यांच्या मुख्याध्यापिका सरिता कपूर सर्व शिक्षकवर्ग व गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरवचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. संस्थेचे प्रमुख डॉ. राजेंद्र जगताप, संस्थेचे सचिव व माजी आमदार संजय चंदुकाका जगताप, संस्थेचे पदाधिकारी डॉ. प्रा. एम. एस. जाधव, अनिल गद्रे ,डॉ. अस्मिता जगताप, राजवर्धिनी जगताप अर्चना मोरे, सोनाली शिंदे आदी यावेळी उपस्थित होते.

## ढगफुटीने टोमॅटोची बागच गेली वाहून

**ओतूर :** जुन्नर तालुक्यातील आंबेगव्हाण आणि परिसरात शुक्रवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास ढगफुटीसदृश पावसामुळे शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान झाले. अनेकांची पिके पाण्याच्या जोरदार प्रवाहाने वाहून गेली. कमलानगर परिसरात आदिवासी ठाकर समाजाचे शेतकरी विलास सबाजी डोके यांची टोमॅटोची बागच वाहून गेली. त्यामुळे त्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. टोमॅटोच्या फळाने लगडलेली व येत्या काही दिवसांत काढणीला बाग डोळ्यांदेखत वाहून जाताना शेतकऱ्यांची मने हेलावून गेली. निसर्गाने दाखविलेल्या अक्राळविक्राळ रूपाने अल्पभूधारक शेतकरी हतबल झाला आहे. या भागात नुकसान झालेल्या पिकांचे, फळबागांचे शासनाने तत्काळ पंचनामे करून आर्थिक मदत त्वरेने द्यावी, अशी मागणी अमृतेश्वर धर्मादाय संस्थेचे संचालक नीलेश महाले, आंबेगव्हाणचे माजी सरपंच निवृत्ती धराडे यांनी केली आहे. गेल्या चार-पाच दिवसांपासून पडत असलेल्या मान्सूनपूर्व पावसाचा फटका आंबेगाव तालुक्यातील पारगाव परिसरातील टोमॅटो बागांना बसला आहे. या बागांमध्ये पावसाचे पाणी साचल्याने करपा रोगांचा प्रादुर्भाव होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

## प्रशासन आता जनतेच्या मोबाईलवर

**अवसरी ;** प्रशासन आता जनतेच्या दारी नव्हे, तर थेट त्यांच्या मोबाईलच्या स्क्रीनवर पोहचत आहे. आंबेगाव तहसील कार्यालयाने डिजिटल युगाशी सुसंगत असा अभिनव उपक्रम हाती घेत अधिकृत व्हॉट्सअॅप चॅनेल सुरू केले आहे. या चॅनेलच्या माध्यमातून नागरिकांना शासकीय योजना, महत्त्वाचे निर्णय, प्रमाणपत्रासंबंधी मार्गदर्शन, हवामानविषयक माहिती, आपत्ती व्यवस्थापन, कृषी, महसूल, निवडणूक आदी विभागांची माहिती नियमितपणे मिळणार आहे. या माध्यमातून नागरिकांचा वेळ, श्रम आणि अनावश्यक फेऱ्यांपासून सुटका होणार आहे. तहसील कार्यालयात नागरिकांना चकरा माराव्या लागू नयेत, यासाठी "व्हॉट्सअॅप चॅनेल" सारखी सहज वापरता येणारी सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या उपक्रमाचे मोठ्या प्रमाणावर स्वागत होत आहे. काही ग्रामपंचायतींनी तर त्यांच्या स्तरावरून नागरिकांना या चॅनेलमध्ये जोडण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू केले. हा उपक्रम इतर तालुक्यांसाठीही मार्गदर्शक ठरेल, अशी अपेक्षा असल्याचे नायब तहसीलदार डॉ. सचिन वाघ यांनी सांगितले. तहसील कार्यालय आंबेगाव नावाने सुरू केलेल्या व्हॉट्सअॅप चॅनेलवरून नागरिकांना विविध प्रमाणपत्रांसाठी आवश्यक कागदपत्रांची यादी, अर्ज कसा करायचा, कुठे सादर करायचा याचे नोंदणीप्रक्रिया, हवामान अंदाज, पीकविमा योजनांची माहिती, शासकीय आदेश, निवडणुकीशी संबंधित सूचना आणि आपत्तीपूर्व खबरदारीबाबतच्या सूचनाही मिळणार असल्याची माहिती प्रांत अधिकारी गोविंद शिंदे यांनी दिली.

## राष्ट्रीय डेंग्यू दिन जनजागृतीने साजरा

**आळंदी :** राष्ट्रीय डेंग्यू दिन - तपासा,स्वच्छ करा आणि भांडी झाकून ठेवा या घोषवाक्याने जनजागृती करीत खेड तालुक्यात साजरा करण्यात आल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ. इंदिरा पारखे यांनी दिली. यानिमित्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन देसाई, पुणे जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.अपर्णा पाटील, खेड तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.विलास माने, वैद्यकीय अधिकारी डॉ. अशोक मैदाड, वैद्यकीय अधिकारी डॉ इंदिरा पारखे, तालुका आरोग्य पर्यवेक्षक रेवननाथ ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली आयुष्मान आरोग्य मंदिर राजगुरूनगर अंतर्गत शहरी व ग्रामीण भागातील लोकांमध्ये जनजागृती करीत राष्ट्रीय डेंग्यू दिन साजरा करण्यात आला. यात डास अळी साठी भांड्याची तपासणी तपासणी करण्यात आली. आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळणे, स्वच्छता राखणे, मच्छर दाणीचा वापर करणे, गप्पी मासे पाळा असा संदेश देण्यात आला. ताप आल्यास रक्ताची तपासणी करणे या साठी आरोग्य शिक्षण व जनजागृती उत्साहात झाली. खेड तालुक्यातील विविध ठिकाणी उपक्रम राबविण्यात आला. यात एस,टी स्टँड, आठवडी बाजार आदी ठिकाणी जनजागृती करण्यात आली. या वेळी आरोग्य निरीक्षक भारती भूषण, दिपक शेलार, महेश दहिवळ यांनी मार्गदर्शन केले. आरोग्य सेवक चंद्रशेखर जाधव, प्रतीक गवारी, दिपक भुसारी यांनी परिश्रम पूर्वक सर्वेक्षण केले.

## अलंकापुरीत प्रा. डॉ. न. का. घारपुरे प्रशालेचे यश

**आळंदी :** येथील प्रा. डॉ. न. का. घारपुरे प्रशालेचा SSC परीक्षा फेब्रुवारी २०२४ – २५ निकाल ९२.४० टक्के लागला असून माध्यमिक शालांत परीक्षा फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आली होती. परीक्षेत प्रशालेतील विद्यार्थ्यांचे उल्लेखनीय यश प्राप्त झाले असून गुणवंत विध्यार्थी यांचे प्रशाले तर्फे अभिनंदन करण्यात आले. गुणवंत मौलांमध्ये गुणानुक्रमे पहिल्या पाच मुलांत वैभव शेवाळे, दिपाली वंजे, शुभम थोरात, जनार्दन खरात, आदिनाथ काचोळे या पाच गुणवंतांचा समावेश आहे. गुणवंत, यशस्वी तथा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रशाले तर्फे हार्दिक अभिनंदन करण्यात आले. मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन करण्यात आले असून अशीच प्रगती यापुढे आणखी वाढत राहील असा विश्वास प्रा. भगवान वाणी यांनी व्यक्त केला आहे.

## ज्ञानगंगा इंग्लिश मीडियम स्कूलचा १०० टक्के निकाल

**आळंदी :** येथील ज्ञानगंगा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज चा एस.एस.सी. बोर्ड परिक्षा २०२४ --२५ चा निकाल १०० टक्के निकाल लागल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष प्रा. विजय गुळवे यांनी दिली. एसएससी बोर्ड परीक्षा निकालामध्ये आळंदी मधील ज्ञानगंगा इंग्लीश मिडीयम स्कूलने १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवत दर्जेदार शिक्षणास प्राधान्य देण्याचे कार्याचे परिसरातून पालक, नागरिक यांनी कौतुक करीत प्रशालेच्या शैक्षणिक कार्यास शुभेच्छा दिल्या. या प्रशालेतील गुणवंत मुलांमध्ये गुणानुक्रमे हर्षदा पवार, कौशिकी कडू, शुभम यादव, पूजा चौधरी, श्रुती म्हस्के यांचा समावेश आहे. या परीक्षेत ५० टक्के विद्यार्थ्यांनी विशेष गुणवत्ता प्राप्त केले. यात १० टक्के विध्यार्थी हे ८५ टक्के पेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष, प्रा. विजय गुळवे, प्राचार्या वैष्णवी गुळवे, सर्व संस्था चालक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले. पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## खेड तालुक्यात जिवंत सातबारा मोहिम यशस्वी

**खेड :** शासनाच्या महत्त्वाकांक्षी १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत खेड तालुक्यात राबवण्यात आलेल्या जीवंत सातबारा मोहिमेला उल्लेखनीय यश मिळाले आहे. तालुक्यातील १९२ गावांमध्ये ११२७ मयत खातेदारांचा शोध घेऊन त्यापैकी १०४१ खातेदारांच्या वारस नोंदी अधिकार अभिलेखात अद्ययावत करण्यात आल्या आहेत. ही मोहीम १ एप्रिल २०२५ ते १० मे २०२५ या कालावधीत ग्रामस्तरावर ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, कोतवाल यांच्या सहकार्याने यशस्वीपणे राबवण्यात आली. या मोहिमेअंतर्गत मयत खातेदारांच्या वारसांकडून मृत्यू दाखला, प्रतिज्ञालेख/स्वयंघोषणापत्र, पोलिस पाटील, सरपंच, ग्रामसेवक यांचे दाखले आदी आवश्यक कागदपत्रे गोळा करून वारस नोंदींची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. उर्वरित ५९ वारस नोंदी लवकरच अद्ययावत करण्यात येतील अशी माहिती तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी दिली.ज्या खातेदारांच्या वारस नोंदी प्रलंबित आहेत, त्यांनी आपल्या गावातील ग्राम महसूल अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा किंवा ई-हक्क प्रणालीद्वारे ऑनलाइन अर्ज दाखल करावा, असे आवाहन प्रांताधिकारी अनिल दौंडे आणि तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी केले आहे. ही मोहीम खेड तालुक्यातील जमिनींच्या अभिलेखांचे अद्ययावतीकरण आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरली आहे.

# धमक आहे त्यांनाच निवडून द्या

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आवाहन





छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुनेत्रा पवार व अजितदादांच्या आई आशाताई पवार यांनी मतदान केले. यावेळी आई सोबत स्वतः अजितदादा पवार हे उपस्थित होते.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भवानीनगर :** ज्यांच्यामध्ये कारखाना व्यवस्थित चालवण्याची धमक आहे त्यांना सर्वांनी मतदान करून निवडून द्यावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भवानीनगर येथे केले.

श्री छत्रपती कारखान्याच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणूकीसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भवानीनगर येथे रविवारी सकाळी ब वर्गातील मतदान केंद्रावर ब वर्गातील मतदारासह इतर उमेदवारांना मतदान करून मतदानाचा हक्क बजावला. या ठिकाणी पहिले मतदान अजित पवार यांनी केले. यावेळी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनीही ब वर्गातील मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. अजित पवार व हर्षवर्धन पाटील यांनी समोरासमोर आल्यानंतर मतदान केंद्रामध्ये चर्चा केली.

यावेळी साखर संघाचे माजी अध्यक्ष पृथ्वीराज जाचक, जिल्हा बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे, छत्रपती कारखान्याचे अध्यक्ष प्रशांत काटे, रणजीत निंबाळकर, भाऊसाहेब सपकळ, अमोल भोईटे, अभय निंबाळकर आदी उपस्थित होते. क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी देखील भवानीनगर येथे ब वर्गातील मतदान केंद्रावर उमेदवारांना मतदान करून मतदानाचा हक्क बजावला

यावेळी बोलताना अजित पवार म्हणाले की, वळवाच्या पावसाबाबत हवामान खात्याने १२ ते १३ जिल्ह्यांमध्ये हाय अलर्टचा अंदाज वर्तवलेला होता त्याप्रमाणे आपल्याकडे वातावरण झालेले आहे मधल्या काळात वळवाचे वातावरण जास्त होते सध्या कमी झालेले आहे ज्या शेतकऱ्यांनी उन्हाळी पिके कांदा केळी घेतलेली आहेत त्यांचे नुकसान होत आहे व उसासारख्या पिकाला फायदा होत आहे वळवाच्या पावसाचा काही पिकांना फायदा होत असून काही पिकांचे मात्र नुकसान होत आहे विभागीय आयुक्तांना ज्या ठिकाणी नुकसान होत आहे

त्या ठिकाणी पंचनामे करून नुकसान भरपाई द्या, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. श्री छत्रपती कारखान्याच्या निवडणुकीसाठी १५ मे ला दोन व १६ मे ला दोन सभा घेतल्या. माझी सुरुवात छत्रपती कारखान्यापासून झाली. माझे वडील छत्रपती कारखान्याला सभासद होते. आजोबा सभासद होते. कुटुंबातील अनेक जण सभासद आहेत, राजकीय दृष्ट्या नाही परंतु आर्थिक दृष्ट्या बारामती व इंदापूर तालुक्यातील ५३ गावातील शेतकरी व कामगारांसाठी हा कारखाना महत्त्वाचा आहे. कोणतीही निवडणूक म्हटले की तुल्यबळ समजूनच निवडणूक लढवतो, असेही ते म्हणाले.

# बैलगाडा शर्यतींसाठी आम्ही लढाई लढलो

## माजी खासदार आढळराव यांची खा. डॉ. कोल्हेंवर टीका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**खेड :** घोडीवर बसेन.. घोड्यावर बसेन असे दावे अनेकांनी केले. मात्र बैलगाडा शर्यती चालु होण्यासाठी आम्ही न्यायमंदिरात लढाई लढली. शिरूरचे खासदार डॉ अमोल कोल्हे यांना माजी खासदार, म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांचा सणसणीत टोला लगावला.


बैलगाडा शर्यत बंदी विरोधात चाकण, तालुका खेड येथील तळेगांव चौकात केलेल्या आंदोलनात सहभागी झालेल्या आढळराव पाटील यांच्या सह ६७ जणांना राजगुरुनगर जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने शनिवारी (दि १७) निर्दोष असल्याचा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. तब्बल २५ वर्षांनी लागलेल्या या निकालावर माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी रविवारी (दि १८) लांडेवाडी तालुका आंबेगाव येथे पत्रकार परिषद आयोजित करून माहिती दिली.

बैलगाडा शर्यत बंदी, त्यानंतर झालेली आंदोलने, राजकीय वर्तुळात झालेला त्रास आणि राजकीय तोटा याबाबत आढळराव पाटील यांनी सडेतोड प्रतिक्रिया दिल्या. ते म्हणाले ' मी केले.. म्हणणारे अनेक झाले. त्यांनी राजकीय पोळी भाजून घेतली. मात्र भोसरीचे आमदार महेश लांडगे वगळता बैलगाडा शर्यती साठी कोणीही रस्त्यावर उतरले नाही. केसेस अंगावर घेतलेल्या नाहीत. चाकण येथील आंदोलनात हजारो बैलगाडा शर्यत समर्थक उपस्थित होते. कोणतेही गैर कृत्य कोणाकडून झाले नाही.मात्र या क्षेत्रातील श्रेय वादातून आम्हाला गोवण्यात आले. राज्याचे तत्कालीन गृहमंत्री आर आर पाटील यांनी अशा केसेस मागे घेण्याचे जाहीर केले होते. त्यानंतर म्हणजे दोन वर्षांनी ३०७ (दंगल) कलम पोलिसांनी लावले. यामागे नेमके कोण होते? कुणाच्या सांगण्यावरून केले याबाबत माहिती नाही. अनेकांच्या मोठ्या व प्रदीर्घ योगदानानंतर बैलगाडा शर्यती चालु झाल्या. मात्र सध्या नियम, अटीचा भंग होत असल्याचे दिसून येते. निकष पाळून शर्यती व्हाव्यात, अन्यथा पूर्वीचे दिवस यायला वेळ लागणार नाही. बैलगाडा शर्यत ही महाराष्ट्रातिल शेतकऱ्यांसाठी छंद व संस्कृती जतन करणारी बाब आहे. त्यात भांडवलदार, नेते मंडळींचा शिरकाव झाला आहे. स्पर्धेचे आयोजन होताना मोठी बक्षिसे, बडेजावची स्पर्धा यामुळे या व्यासपीठाचा विपर्यास वाढला आहे.

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे मिलन होऊ शकते. असे झाल्यास विद्यमान खासदार डॉ अमोल कोल्हे आणि तुमच्यात उमेदवारी वरून रस्सीखेच होऊ शकते.आपण पक्ष बदलणार का? तुमचे आणि शिंदे सेनेचे लागेबांधे पूर्वीप्रमाणेच आहेत का? यावर बोलताना आढळराव पाटील म्हणाले की, कारण असेल तर डॉ अमोल कोल्हे यांच्या वर टीका करायला मागे पुढे पाहणार नाही. माझे सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते यांच्याशी स्नेहाचे संबंध आहेत. राजकीय घडामोडी काहीही होवो मी त्यात बदल करत नाही.मात्र मी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आहे. भविष्यात राजकीय स्थिती निर्माण झाली तर याच पक्षाच्या माध्यमातून लोकसभा निवडणूक लढवणार आहे. राज्यात सध्याची राजकीय समीकरणे विचारात घेता येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका सगळेच पक्ष लढवतील. अनेक ठिकाणी मैत्रिपूर्ण लढती होतील असे आढळराव पाटील म्हणाले.

## आडगाव येथील विद्यार्थिनीचा सर्प दंशाने मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**खेड :** आडगाव, तालुका खेड येथील इयत्ता ११ वीची परीक्षा दिलेल्या प्रांजल गोपाळे हिचा संर्पदंशाने म्रुत्यु झाला. याबाबत मिळालेल्या माहिती नुसार शुक्रवारि (दि. १६ ) प्राजंल जनावरांसाठी वळईमधुन चारा काढत होती. अचानक सर्पदंश झाला. ही घटना सकाळी ९ वाजण्याच्या दरम्यान घडली.

खासगी वाहनाने प्रांजल हिला पाईट येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आणले असता डॉक्टर नसल्याचे सांगण्यात आले. असा आरोप करण्यात आला आहे.

तर तालुका वैद्यकीय डॉ. विलास माने यांच्या कडे विचारणा केली असता पाईट प्राथमिक आरोग्य केंद्रात संबंधित रुग्ण आला नसल्याचा दावा करण्यात आला. चांडोली ग्रामीण रुग्णालयाच्या वैधकिय अधिक्षका डॉ. तेजश्री रानडे यांच्याशी संपर्क साधला असता रुग्णालयात सकाळी १०.३० दरम्यान संर्पदंश झालेल्या प्राजंल हिच्यावर सर्पदंश लस देऊन प्राथमिक उपचार करण्यात आले .विषाची मात्रा पहाता अशा पेशंटला आयसीयु ची गरज असते १०८ अँम्बुलन्समधुन वायसीएम मध्ये रेफर करण्यात आले. मात्र वाटेतच म्रुत्यु झाला. असे सांगण्यात आले.

एकुणच प्रांजल गोपाळे हिला आडगाव पासुन पश्चमेला आंबोली १० किलोमीटर अतंरावर तर पुर्वकडील पाईट प्राथमिक आरोग्य केंद्र १५ किलोमीटर अतंरावर असताना ४० किलोमीटर अतंरावरील राजगुरुनगरला आणण्याची नामुष्की ओढवल्याने प्राजंल गोपाळे हिला वेळेत उपचार न मिळाल्याने आरोग्य यत्रंणेच्या अनास्थेची बळी ठरली गेली.

## खेड तालुका सहकारी : स्वीकृत संचालकपदी चांभारे


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघाचे स्वीकृत संचालक पदी खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सेवा निवृत्त सचिव सतीश चांभारे ( सुपेकर ) यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. संघाचे अध्यक्ष नरेंद्र थिगळे, उपाध्यक्ष दत्तात्रय टेमगिरे, संचालक हिरामण सातकर, दत्तात्रय सातपुते, आनंदराव काळे, साहेबराव दुंडे, कार्यकारी संचालक नानासाहेब टाकळकर, बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे पाटील, संजय घनवट, संतोष गव्हाणे, भाऊसाहेब होरे, भास्कर जगदाळे यांचे उपस्थितीत सतीश चांभारे यांना नियुक्तीचे पत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. शेतकरी कुटुंबातून आलेले चांभारे हे खेड कृषी उत्पन्न बाजार समितीत ३० वर्षे सचिव पदावर सेवाभाव वृत्तीने कार्यरत होते.

खेड तालुक्याचे माजी आमदार स्व. सहकार महर्षि आप्पासाहेब सातकर यांचे पश्चिम भागातील जुन्या पिढीतील बाजार समितीचे माजी संचालक स्व. धोंडीभाऊ चांभारे यांचा त्यांना वारसा लाभलेला आहे. चांभारे हे खेड तालुक्याचे पश्चिम भागातील सुपे सातकरवाडी गावचे असून पश्चिम भागाला संचालक पदाची संधी मिळाल्याने समाधान व्यक्त करीत आहेत. त्यांच्या निवडीचे तालुक्यातून स्वागत करण्यात येत आहे. आळंदी जनहित फाउंडेशनचे वतीने कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, अध्यक्ष राजेंद्र घुंडरे यांचेसह अनेक सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी यांनी निवडीचे स्वागत करून चांभारे यांचे अभिनंदन केले.



# कारली, गवार, मिरची व भेंडीची आवक; उलाढाल ५ कोटी ४० लाख रुपये




**चाकण बाजारात कांद्याची झालेली आवक.** ( छाया : अविनाश दुधवडे, चाकण )

## कांद्याच्या आवकेत घट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार चाकण : खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केट यार्ड मध्ये कारली, गवार, हिरवी मिरची व भेंडीची मोठी आवक झाली. कांदा व लसणाची आवक घटली. पालेभाज्यांची भरपूर आवक झाल्यामुळे भाव गडगडले आहेत. बटाट्याची आवक स्थिर राहिल्याने भावात वाढ झाली. एकूण उलाढाल ५ कोटी ४० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ३,००० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक ९०० क्विंटलने घटली व कांद्याचा कमाल १,३०० रुपयांवर स्थिरावला. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक स्थिर राहून बटाट्याच्या भावात २०० रुपयांची वाढ झाली. बटाट्याचा कमाल भाव २,००० रुपयांवरून २,२०० रुपयांवर पोहोचला. लसणाची एकूण आवक १२ क्विंटल झाली.

गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक १७ क्विंटलने घटल्याने लसणाचा कमाल भाव १० हजार रुपयांवर स्थिरावला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३४५ क्विंटल झाली.

हिरव्या मिरचीला ३ हजार रुपयांपासून ते ४ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला. कांदा - एकूण आवक - ३,००० क्विंटल.भाव क्रमांक - १.१,३०० रुपये,भाव क्रमांक २.१,१०० रुपये,भाव क्रमांक ३.८०० रुपये.

बटाटा - एकूण आवक - १,५०० क्विंटल.भाव क्रमांक १.२,२०० रुपये, भाव क्रमांक २.१,८०० रुपये,भाव क्रमांक ३.१,४०० रुपये.

### शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे

- टोमॅटो - २७८ क्विंटल (१,२०० ते १,८०० रू.),कोबी - २२० क्विंटल ६०० ते १,००० रू.),फ्लॉवर -१९० क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), वांगी - १०४ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.),भेंडी - ८४ क्विंटल (३,५०० ते ४,५०० रु.),दोडका - ४२ क्विंटल (४,००० ते ६,००० रु.),कारली - ७२ क्विंटल ( ३,५०० ते ४,५०० रु.),दुधीभोपळा - ५२ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.),काकडी - ८६ ( क्विंटल (१,००० ते २,००० रु.),फरशी - ३० क्विंटल (९,००० ते १०,००० रु.),वालवड - १४ क्विंटल (९,००० ते ११,००० रुपये), ढोबळी मिरची - १०६ क्विंटल (४,००० ते ५,००० रु.),चवळी - ४४ क्विंटल (३,००० ते ४,००० रु.),शेवगा - ३८ क्विंटल (३,५०० ते ४,५०० रु.),गाजर - १५० क्विंटल (१,००० ते २,००० रु.),गवार - ६४ क्विंटल (४,००० ते ६,००० ),वाटाणा - ४० क्विंटल (९,००० ते ११,०००).
- पालेभाज्या चाकण येथील बाजारात पालेभाज्यांची एकूण आवक जुड्यांमध्ये व भाज्यांना मिळालेले भाव पुढीलप्रमाणे - मेथी - एकूण १० हजार ९७० जुड्या (१,००० ते १,५०० रुपये ),कोथिंबीर - एकूण २५ हजार ४७० जुड्या (१,४०० ते २,००० रुपये,),शेपू - एकूण २ हजार ५५० जुड्या (१,००० ते १,४०० रुपये ), पालक - एकूण २ हजार ५७० जुड्या (८०० ते १,२०० रुपये),.
- जनावरे - चाकण येथील जनावरांच्या बाजारात विक्रीसाठी आलेल्या ६० जर्शी गाईपैकी ४० गाईची विक्री झाली.(१५,००० ते ७०,००० रु.), ११० बैलांपैकी ८५ बैलांची विक्री झाली.(१०,००० ते ४०,००० रु.), १२० म्हशीपैकी ९५ म्हशींची विक्री झाली.(३०,००० ते ८०,००० रु.), १२ हजार शेळ्या - मेंढ्यापैकी ११,००० शेळ्यांची विक्री झाली. (२,००० ते २५,००० रु.),.

# 'स्वाहा' म्हणण्यामागील रहस्य

हिंदू धर्मात पूजा, प्रार्थना, यज्ञ, होमहवन या उपचारांना बरंच महत्त्व देण्यात आलं आहे. शुभ कार्यात होम-हवनाचं आयोजन केलं जातं. या होमात किंवा यज्ञात आहुती देताना ङ्गस्वाहाङ्घ हा शब्द उच्चारला जातो. स्वाहा म्हटल्यानंतर यज्ञात विविध वस्तू अर्पण केल्या जातात. आपण होम, यज्ञ तर करतो पण स्वाहा हा शब्द उच्चारण्यामागचं नेमकं कारण आपल्याला माहीत नसतं आणि माहीत करून घेण्याचा प्रयत्नही केला जात नाही. म्हणूनच स्वाहा या शब्दाचा नेमका अर्थ आणि त्याचं महत्त्व जाणून घेण्याचा हा एक प्रयत्न. यामुळे हवनाचे लाभ अधिक चांगल्या प्रकारे मिळू शकतील.



ङ्गस्वाहाङ्घ म्हणजे ङ्गयोग्य पद्धतीने अर्पण करणंङ्घ. स्वाहा हा शब्द उच्चारून यज्ञात अर्पण केलेली प्रत्येक वस्तू आणि नैवेद्य देवीदेवतांपर्यंत योग्य पद्धतीने पोहोचतो अशी श्रद्धा आहे. अर्पण केलेला नैवेद्य आणि इतर दानवस्तू देवीदेवतांनी ग्रहण केल्या नाहीत तर यज्ञ सफल होत नाही. अग्नीत ङ्गस्वाहाङ्घच्या माध्यमातून अर्पण केलेला नैवेद्य आणि इतर सामुग्री देवता आनंदाने स्वीकारतात.

जाणून घ्या

काही पुराणकथांमध्ये स्वाहा ही अग्नीदेवाची पत्नी असल्याची नोंद आढळते. याबाबतची एक पौराणिक कथा आहे. त्यानुसार स्वाहा ही दक्ष प्रजापतीची कन्या होती. तिचा विवाह अग्निदेवासोबत झाला होता. त्यामुळे पत्नीचं नाव घेतल्यानंतरच अग्निदेव मनुष्याने अर्पण केलेल्या वस्तूंचा स्वीकार करतो आणि देवतांपर्यंत पोहोचवतो अशी भाविकांची श्रद्धा आहे. त्यामुळे यज्ञात आहुती देण्याआधी स्वाहा शब्द उच्चारण्याची प्रथा सुरू झाली.

अग्नीला पवित्र मानलं जातं. वैदिक काळात मानव आणि देवता यांच्यातल्या संपर्काचं माध्यम म्हणून अग्नीची निवड करण्यात आली होती, असं पुराणांमध्ये नमूद करण्यात आलं आहे. अग्नीत अर्पण केलेली कोणतीही वस्तू पवित्र होते आणि ही पवित्र वस्तू भगवंतापर्यंत सहज पोहोचते. पण त्याआधी स्वाहा हा शब्द उच्चारण्याची गरज असते. त्याशिवाय भगवंत कोणत्याही वस्तूचा स्वीकार करत नाही. श्रीमद् भागवत अणि शिवपुराणात याबाबतचे उल्लेख आढळतात.

# प्रार्थनेतील शक्ती

**प्रार्थनेत शक्ती असते असं म्हणतात. समूह प्रार्थनेने अशक्य गोष्टीही साध्य करता येतात. भक्ताची प्रार्थना भगवंतापर्यंत पोहोचते. प्रार्थना म्हणजे भगवंताला केलेलं आवाहन. या आवाहनामुळे परमेश्वराने स्वत:कडच्या सकारात्मक शक्तीने भक्ताच्या कार्यात किंवा इच्छित साध्य करण्यात अडथळे दूर करावे, नकारात्मक ऊर्जेचा नायनाट व्हावा, अशी अपेक्षा असते. प्रार्थनेतलं शास्त्र जाणून घेतलं तर त्यावरचा आपला विश्वास अधिक दृढ होईल.**



प्रत्येक कृतीला सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही प्रतिक्रिया असतात. त्यामुळे आपली प्रार्थना परमेश्वरापर्यंत पोहोचते आणि परमेश्वर ती ऐकतो. आपल्या प्रार्थनेला उत्तरही मिळतं. देवाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळतो. त्यामुळे प्रार्थनेवर विश्वास ठेवा. आपली प्रार्थना देवाच्या दरबारी पोहोचते.

* प्रार्थनेमुळे भक्तांचा उत्साह वाढतो. त्याच्यात सकारात्मक ऊर्जेचा वास राहतो. प्रार्थना आपल्या बँक खात्यात पैसे जोडले जातात त्याचप्रमाणे या प्रार्थनाही आपल्या पाप-पुण्याच्या खात्यात जोडल्या जातात. या प्रार्थनांचे लाभ या किंवा पुढच्या जन्मात मिळतात.

* जास्त प्रमाणातली प्रार्थनाही तुमच्या खात्यात साठून राहते. ही प्रार्थना भविष्यात उपयोगी पडते.

आध्यात्म

केल्यानंतर तुमची काळजी, चिंता दूर होते. प्रार्थनेच्या मूळ उद्देशामुळे कळत-नकळत केलेल्या चुकांचा भार कमी होतो. प्रार्थनेतल्या सकारात्मक ऊर्जेमुळे पापांचा भार उतरतो आणि आपल्याला शांत वाटतं.

* आपल्या एखाद्या प्रार्थनेला लवकर उत्तर मिळत नाही. प्रार्थना फलद्रूप होत नाही. असं असलं तरी प्रार्थनेचा सकारात्मक परिणाम होत असतो.

* प्रार्थना करूनही यश मिळत नसेल किंवा फलप्राप्ती होत नसेल तर प्रार्थनांचा वेग वाढवायला हवा. प्रार्थना फलद्रूप होत नाही याचा अर्थ यातून निर्माण होणाऱ्या सकारात्मक ऊर्जेचा प्रभाव तुमच्या आसपास असणाऱ्या नकारात्मक ऊर्जेपेक्षा आणि तुमच्या कर्मांपेक्षा कमी आहे. त्यामुळे इप्सित साध्य होण्यासाठी प्रार्थनेचा वेग वाढवा आणि जास्त काळ प्रार्थना करा.

* परीक्षा किंवा एखाद्या कार्यातल्या यशासाठी तुम्ही प्रार्थना करता. पण तुम्हाला म्हणावं तसं यश मिळत नाही किंवा तुम्ही पूर्णपणे अपयशी ठरता. तुमची प्रार्थना वाया गेली असा याचा अर्थ होत नाही. अध्यात्मिक प्रक्रियेतली कोणतीही कृती कधीच वाया जात नाही.

# प्रदोष लाभदायी व्रत

कॅलेंडरची पानं चाळताना एखाद्या तारखेच्या खाली प्रदोष असं लिहिलेलं दिसतं. हिंदू धर्मात प्रदोषचं मोठं महत्त्व आहे. प्रदोष हे एक व्रत आहे. प्रत्येक महिन्यातल्या शुक्ल आणि कृष्ण पक्षातल्या त्रयोदशीला प्रदोष व्रत केलं जातं. प्रदोष हे शंकराचं व्रत आहे. प्रदोष व्रताची ही सविस्तर माहिती...

हिंदू शास्त्रांनुसार प्रदोष हे अत्यंत लाभदायी आणि शुभ व्रत मानलं जातं. प्रदोष व्रतात देवाधिदेव महादेवाची विधीवत पूजा केली जाते. महिला किंवा पुरूष कोणीही हे व्रत करू शकतात. प्रदोष व्रतामुळे जीवनातल्या अडीअडचणी, समस्या दूर होतात असं मानलं जातं.

कशी करावी पूजा?

व्रताच्या दिवशी पहाटे उठायला हवं. स्नान आणि ध्यान केल्यानंतर शिवशंकराचं स्मरण करायला हवं. यानंतर गंगाजलाने पूजनाचं स्थान शुद्ध आणि पवित्र करा.



या ठिकाणी चौरंग ठेवा. चौरंगाभोवती रांगोळी काढा. पूजनासाठी उत्तर-पूर्व दिशेला तोंड करून बसा. ओम नम: शिवाय हा जप करत शंकराच्या पूजनाला सुरुवात करा.

काय आहेत लाभ?

प्रदोषाच्या व्रतादरम्यान उपवास ठेवल्याने दोन गायी दान केल्याचं पुण्य लाभतं. या कलीयुगात सगळीकडे प्रचंड अन्याय आणि अत्याचार होत असताना प्रदोषाचं व्रत करणाऱ्यांचं शंकर रक्षण करतो, असं मानलं जातं. अशा लोकांना शंकराचं संरक्षण प्राप्त होतं. प्रदोष व्रताचे वारानुसारही लाभ होतात. रविवारी केलेल्या प्रदोष व्रतामुळे आयुरारोग्याची प्राप्ती होते. सोमवारी प्रदोष व्रत आल्यास उत्तम आरोग्याचा लाभ होतो. मंगळवारच्या व्रतामुळे रोगांपासून मुक्ती आणि बुधवारच्या व्रतामुळे इच्छा पूर्ण होतात. गुरूवारच्या व्रतामुळे शत्रुचा विनाश होतो. शुक्रवारच्या व्रतामुळे सौभाग्यवृद्धी आणि संसारसुख प्राप्त होतं. शनिवारच्या व्रतामुळे अपत्यप्राप्ती होते.

व्रतवैकल्य

# कसं असावं देवघर?

देवघराची रचना करताना वास्तूशास्त्राशी संबंधित काही नियमांचं पालन करावं लागतं. देवघर चुकीच्या ठिकाणी असेल तर वास्तूशी संबंधित काही दोष उद्भवतात आणि पूजनाचे सकारात्मक लाभ मिळत नाहीत. घरात समृद्धी नांदत नसेल, सदस्यांच्या प्रगतीत अडथळे येत असतील तर देवघराची रचना तपासून घ्यायला हवी. घरातल्या अनेक समस्यांमागे देवघराची चुकीची रचना कारणीभूत असू शकते, पण अनेकदा आपण याकडे दुर्लक्ष करतो. देवघर योग्य ठिकाणी असल्यास घरातलं वातावरण प्रसन्न राहतं. घरात सकारात्मक ऊर्जेचा वास राहतो. कुटुंबातल्या सदस्यांवर देवाची कृपा राहते. हे सर्व लाभ मिळवण्यासाठी देवघर नेमकं कसं असावं, याविषयीच्या टिप्स तुम्हाला उपयुक्त ठरू शकतील.



* देवघर घराच्या अथवा दुकानाच्या ईशान्य कोपऱ्यात म्हणजे पूर्व-उत्तर दिशेला असायला हवं. या दिशेला असणाऱ्या देवघराचे सर्वाधिक लाभ मिळतात.

* देवघरातल्या देवाच्या मूर्ती आणि फोटो उत्तर किंवा पूर्व दिशेला ठेवायला हव्या.

वास्तू

* घरातील लक्ष्मी, गणपती, कुबेर आणि नवग्रहांच्या मूर्ती किंवा फोटोंचं तोंड दक्षिणेला असू नये.

* विष्णू, शंकर, श्रीकृष्ण, सूर्य आणि कार्तिकेय या देवतांचं तोंड पश्चिमेकडे असणं अधिक लाभदायी मानलं जातं.

* देवघरातल्या हनुमानाचं तोंड दक्षिण-पश्चिम दिशेला असावं. यामुळे हनुमानाच्या कृपेचा लाभ अधिक चांगल्या प्रकारे मिळू शकतो.

# हेराक्लीज की श्रीकृष्ण?





जगभरातल्या अत्यंत प्राचीन संस्कृतींमध्ये ग्रीक संस्कृतीची गणना होते. ग्रीक संस्कृतीतली ङ्गहेराक्लीजङ्घ ही देवता आणि हिंदू धर्मातला श्रीकृष्ण यांच्यात बरंच साम्य असल्याचं दिसून येतं. ग्रीसमध्ये इसवीसन पूर्व २०० वर्षांपूर्वीची काही नाणी आढळली. या नाण्यांवर श्रीकृष्ण आणि बलरामासारख्या दोन आकृती आहेत. यात बलरामासारख्या दिसणाऱ्या आकृतीच्या हातात नांगर आणि कुदळ आहे तर दुसऱ्या एका नाण्यावरील आकृतीच्या हातात सुदर्शन चक्रासारखं अस्त्र आहे. या दोन्ही आकृती श्रीकृष्ण आणि बलराम यांच्याच असल्याचं बोललं जातं.

धर्म देशोदेशीचे

प्राचीन काळात भारतात आलेल्या ग्रीक राजदूत मेगस्थनीज यांनी श्रीकृष्णाशी संबंधित पौराणिक कथा वाचल्या. या कथा ते ग्रीसमध्ये घेऊन गेले. तिथे गेल्यावर श्रीकृष्णाला हेराक्लीज हे नाव दिलं गेलं आणि ही देवता ग्रीक पुराणाचा भाग बनली, असं मानणारा एक वर्ग आहे.

नाण्यांवर आढळलेल्या बलराम आणि श्रीकृष्णाच्या चित्रांवरून असं लक्षात येतं की, ग्रीक संस्कृतीला हिंदूंच्या या देवतांची भुरळ पडली होती. रोममधला एक इतिहासकार क्विंटसने आपल्या पुस्तकात काही गोष्टी नमूद केल्या आहेत. भारतातल्या पुरू राजाला ग्रीसमध्ये ङ्गपोरसङ्घ या नावाने ओळखलं जात असे. पोरस आणि अलेक्झांडर यांच्या दरम्यान युद्ध झालं तेव्हा पोरसच्या सैनिकांच्या हातात हेरिक्लीजच्या प्रतिमा होत्या असं क्विंटसने म्हटलंय. हा हेरिक्लीज म्हणजे श्रीकृष्ण. हिंदू पुराणांमध्ये श्रीकृष्णाशी संबंधित आढळणाऱ्या कथांशी साधर्म्य साधणाऱ्या कथा ग्रीक पुराणांमध्ये आहेत. श्रीकृष्णाच्या कथांमध्ये कालिया आणि शेषनागाचा उल्लेख आढळतो. त्याचप्रमाणे हेराक्लीजच्या कथांमध्ये ङ्गहायड्राङ्घ नामक नागाचा उल्लेख आहे. ग्रीक पुराणकथांमध्ये हेराक्लीजने त्रासदायक पक्ष्यांचा संहार केला आहे तर श्रीकृष्णाने बकासूर नावाच्या राक्षसाचा वध केला आहे. हेराक्लीजने खांद्यांवर संपूर्ण बह्मांड पेललं असल्याचं ग्रीक पुराण सांगतं तर श्रीकृष्णाने करंगळीवर गोवर्धन पर्वत उचलला असल्याचं आपल्या पुराणकथा सांगतात. हेराक्लीज आणि श्रीकृष्ण यांच्यातलं हे साधर्म्य आश्चर्यचकित करणारं आहे.

# वागा सन्मानाने

जगाचा एक नियम आहे तो म्हणजे इतरांना मान दिला तरच तुम्हाला मान मिळेल. दुसऱ्यांना अपमानित करणाऱ्या माणसाला कधीच सन्मानाने वागवलं जात नाही. याबाबत एक कथा सांगितली जाते ती अशी की, एक माणूस धर्मग्रंथांची मस्करी करत असे. धर्माला, धर्मग्रंथांना थोतांड मानत असे. हा माणूस नास्तिक होता. त्याला देवाचं अस्तित्त्व मान्य नव्हतं. त्यामुळे देवाच्या चरणी नतमस्तक होणाऱ्यांची, धर्माचं आचरण करणाऱ्यांची तो मस्करी करत असे. नास्तिक असण्यात वावगं काही नाही, पण या माणसाने इतरांशी वैचारिक पातळीवर चर्चा करणं गरजेचं होतं. आपलं म्हणणं मांडून इतरांचं म्हणणं ऐकून घेणं गरजेचं होतं. पण हे न करता तो इतरांची मस्करी करण्यात, त्यांचा अनादर करण्यात धन्यता मानत असे.

एकदा हा माणूस धर्मगुरूकडे गेला. त्याला धर्मगुरूचा अपमान करायचा होता. यासाठी त्याने धर्मगुरूला काही प्रश्न विचारायला सुरूवात केली. खजूर खाल्ला तर मला पाप लागेल का, असा प्रश्न त्याने विचारला. त्यावर धर्मगुरूने ङ्गनाहीङ्घ असं उत्तर दिलं. मग खजूरात पाणी मिसळून खाल्ल्याने मला पाप लागेल का, हा प्रश्न विचारला. त्यावरही त्याने ङ्गनाहीङ्घ असंच उत्तर दिलं. आता खजूर आणि पाण्यात थोडं अल्कोहोल मिसळून प्यायलं तर पाप लागेल का, अशा प्रश्न त्याने विचारला. त्यावरही त्याने 'नाही' असं उत्तर दिलं. या तिन्ही पदार्थांपासून मद्य तयार होतं तर मग धर्मानुसार मद्यप्राशन पाप का मानलं जातं, असा त्याचा पुढचा प्रश्न होता. धर्मगुरूला त्याचा हेतू कळला होता. धर्मगुरूने त्याला प्रतिप्रश्न करायला सुरूवात केली. तो म्हणाला की, मी तुझ्यावर धूळ उडवली तर लागेल का? माणूस नाही म्हणाला. या धुळीत पाणी मिसळून टाकलं तर लागेल का? यावरही माणूस नाही म्हणाला. आता धूळ आणि पाण्यासोबत थोडे दगड टाकले तर... असा प्रश्न धर्मगुरूने विचारला. यावर माणूस म्हणाला की दगडांमुळे माझं डोकंच फुटेल. तुला तुझ्या प्रश्नाचं उत्तर मिळालं असेल असं धर्मगुरूने म्हटलं.



बोध

यावर तो माणूस वरमला. आपल्या कृत्याची क्षमा मागून यापुढे असं न वागण्याचं वचनही दिलं. या कथेवरून असं लक्षात येतं की समोरच्याला मान दिला तर आपल्याला मान मिळतो. समोरचा माणूस वयाने लहान असो किंवा मोठा, कोणाचाही अपमान करू नये. दुसऱ्याला सन्मानाने वागवलं पाहिजे.

# सूर्याय नम:



धार्मिक दृष्टीकोनातून बघता सूर्य किंवा चंद्रग्रहण अशुभ मानलं जातं. या काळात काही नियमांचं पालन करण्याबाबत सांगण्यात आलं आहे. ग्रहणाचे वेध लागल्यानंतर मंदिरांची कवाडं बंद केली जातात. या काळात कोणतेही धार्मिक विधी होत नाहीत पण सूर्यदेवाच्या मंदिरांवर ग्रहणाचा कोणताही प्रभाव पडत नाही. म्हणूनच कोणार्कचं सूर्यमंदिर आणि हरयाणातल्या यमुनानगरमध्ये असणारं सूर्यकुंड मंदिर या काळातही खुलं असतं. भारतात दिसणाऱ्या सूर्यग्रहणाच्या काळातही ही मंदिरं उघडी असतात. याठिकाणी सूर्यदेवाची पूजा-अर्चना सुरू असते. कोणार्कच्या सूर्यमंदिराला ङ्गबिरंची नारायणङ्घ असं म्हटलं जातं. हे मंदिर जगभरात प्रसिद्ध असून ऐतिहासिक वारसा म्हणून या स्थानाचं महत्त्व आहे. या मंदिराच्या निर्मितीमागे एक आख्यायिका सांगितली जाते. श्रीकृष्णाचा पुत्र सांब याला एका शापामुळे कुष्ठरोग झाला. या शापातून मुक्त होण्याच्या उद्देशाने सांब याने सूर्यदेवाला प्रसन्न करण्याचा निश्चय केला आणि तब्बल १२ वर्षं तपश्चर्या केली. सूर्यदेवाने सांबला कुष्ठरोगातून मुक्त केलं. यामुळे सांबने कोणार्क येथे सूर्यदेवाचं भव्य मंदिर उभारलं, असं म्हटलं जातं.

तीर्थक्षेत्र

हरयाणातल्या यमुनानगरमधल्या आदलपूर गावात सूर्यकुंड मंदिर आहे. या मंदिराला प्राचीन इतिहास आहे. सूर्यग्रहणाचा कोणताही प्रभाव या मंदिरावर आणि इथे येणाऱ्या भक्तांवर पडत नाही, अशी इथल्या लोकांची श्रद्धा आहे. या मंदिरातल्या कुंडात सूर्याची किरणं सामावली जातात आणि भक्तांवर ग्रहणाचा प्रभाव पडत नाही, अशी भाविकांची श्रद्धा आहे. या मंदिराचा संबंध त्रेतायुगाशी जोडण्यात येतो.


# ज्ञानार्जनासाठी...

विद्यार्थ्यांनी आपल्या उन्नतीकडे, प्रगतीकडे आणि शिक्षणाकडे लक्ष केंद्रित करणं गरजेचं असतं. विद्यार्थीदशेत लक्ष विचलित झाल्यास विद्यार्थी इच्छित फळापासून दूर राहतात. आर्य चाणक्याने विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीबाबत काही सूचना केल्या आहेत. चाणक्यनीतीतल्या या सूचनांचं पालन करून विद्यार्थी अपेक्षित यश मिळवू शकतात.

* विद्यार्थीदशेत साजश्रृंगार, दिसणं याकडे फार लक्ष देऊ नये. विद्यार्थ्यांच्या मनात साजश्रृंगार, कपडे, सौंदर्य खुलवणं याबाबतचे विचार येत असतील तर अभ्यासाकडे दुर्लक्ष होतं. मन विचलित झाल्याने ज्ञानप्राप्तीत अडचणी येतात.

* जीभेचे चोचले पुरवण्यात मग्न असणारे विद्यार्थी अभ्यासाकडे लक्ष देऊ शकत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जीभेवर ताबा ठेवला पाहिजे. चविष्ट, मसालेदार पदार्थ खाण्याच्या नादात आपण शरीरावर बरेच अत्याचार करत असतो. यामुळे आरोग्य धोक्यात येतं आणि अभ्यासावरचं लक्ष उडतं.

* विद्यार्थ्यांनी शरीरापेक्षा ज्ञानार्जनावर अधिक लक्ष द्यायला हवं. अभ्यास करताना थकवा जाणवतो, कंटाळा येतो. पण यामुळे लक्ष विचलित करण्याऐवजी ज्ञानार्जनावर भर द्यायला हवा. शारीरिक समस्यांकडे दुर्लक्ष केलं पाहिजे.




* झोप, आळस हा माणसाचा शत्रू आहे. विद्यार्थ्यांनी झोपेवर विजय मिळवला पाहिजे. झोपल्यामुळे अभ्यासाचा बहुमूल्य वेळ वाया जातो. त्यामुळे आवश्यक तेवढी झोप घेऊन उर्वरित वेळ अभ्यासासाठी द्यायला हवा.

* विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे गांभीर्याने पहायला हवं. मस्करी, मजा मस्तीमध्ये वेळ घालवणारे विद्यार्थी आयुष्यात कधी यशस्वी होत नाहीत.

चाणक्यनीती

* विद्यार्थ्यांनी भावनिक चक्रात अडकू नये. मोह आणि माया यांना दूर सारायला हवं. तरच आयुष्यात प्रगती करता येईल.

* विद्या प्राप्त करण्यासाठी मनावर ताबा ठेवायला हवा. मन चंचल असेल तर ज्ञानप्राप्ती करताना अनेक अडचणी येतात. त्यामुळे क्रोधाला नियंत्रणात ठेवायला हवं. चित्त शांत ठेवायला हवं.



* विद्यार्थ्यांनी लोभापासून दूर रहायला हवं. लोभ आणि लालसेमुळे मनुष्य आपल्या लक्ष्याच्या दिशेने वाटचाल करू शकत नाहीत. लोभी माणसाला यश मिळत नाही. त्याची नजर इतरांच्या वस्तूवर असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनीच नव्हे तर प्रत्येकाने लोभ आणि लालसा या दुर्गुणांचा त्याग करायला हवा.







# पंजाबने राजस्थानला १० धावांनी हरवले

## पॉइंट टेबलमध्ये दुसऱ्या क्रमांकावर, वढेरा-शशांकने अर्धशतके

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जयपुर :** इंडियन प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेत रविवारी पंजाब किंग्सने राजस्थान रॉयल्सवर दणदणीत विजय मिळवला. जयपूरमधील सवाई मानसिंह स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात पंजाबने १० धावांनी विजय मिळवत पॉइंट्स टेबलमध्ये १७ गुणांसह दुसरा क्रमांक मिळला आहे. यासह त्यांनी जवळपास प्लेऑफचं तिकीटही जवळपास पक्के केले आहे. राजस्थान प्लेऑफच्या शर्यतीतून आधीच बाहेर झाले आहेत. पण त्यांना तळातील स्थान टाळण्यासाठी उर्वरित सामने महत्त्वाचे होते. परंतु, त्यांना १० व्या पराभवाचा सामना करावा लागला आहे.




या सामन्यात पंजाब किंग्सने राजस्थान रॉयल्ससमोर विजयासाठी २२० धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थानला २० षटकात ७ बाद २०९ धावाच करता आल्या. राजस्थानकडून यशस्वी जैस्वाल, वैभव सूर्यवंशी आणि ध्रुव जुरेल यांनी आक्रमक खेळताना विजय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. पण पंजाबच्या गोलंदाजांनी मोक्याच्या क्षणी पुनरागमन केले.

राजस्थानकडून सलामीला उतरलेल्या यशस्वी जैस्वाल आणि १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीने आक्रमक सुरूवात केली. पहिल्याच षटकात जैस्वालने चार चौकार आणि एका षटकारासह २२ धावा वसूल केल्या होत्या. त्यानंतर दुसऱ्या षटकात सूर्यवंशीने १६ धावा चोपल्या. पहिल्या ३ षटकातच राजस्थानच्या ५० धावा पार झाल्या होत्या. अखेर पाचव्या षटकात हरप्रीत ब्रारने सूर्यवंशीला जाळ्यात अडकवलं. मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात सूर्यवंशी १५ चेंडूत ४० धावांची खेळी करून बार्लेटकडे झेल देत बाद झाला. त्याने ४ चौकार आणि ४ षटकार मारले. पण तरी जैस्वाल त्याच्या लयीत खेळतच होता. त्याच्या आक्रमणामुळे पॉवरप्लेच्या ६ षटकात राजस्थानने ८९ धावा चोपल्या. पॉवरप्लेमध्ये राजस्थाननेकेलेल्या या सर्वाधिक धावा आहेत. जैस्वालने २४ चेंडूत त्याचे अर्धशतकही पूर्ण केले. पण अखेर त्याला ९ व्या षटकात हरप्रीत ब्रारनेच माघारी धाडले. जैस्वालने २५ चेंडूत ९ चौकार आणि १ षटकारासह ५० धावांची खेळी केली. त्याचा झेल मिचेल ओवेनने घेतला. नंतर कर्णधार संजू सॅमसन आणि रियान पराग राजस्थानचा डाव सावरत होते. पण संजू सॅमसनला २० धावांवर अझमतुल्ला ओमरझाईने बाद केले. रियान परागलाही १३ धावांवर हरप्रीत ब्रारने त्रिफळाचीत करत सामना फिरवला. त्यानंतर मात्र पंजाब किंग्सने सामन्यात पुनरागमन केले होते. तरी ध्रुव जुरेल आक्रमक खेळत संघाला विजय मिळवून देण्याचा प्रयत्न करत होता, त्याला शिमरॉन हेटमायरची साथ मिळत होती. पण हेटमायर १८ व्या षटकात ११ धावांवर बाद झाला. त्यानंतरही शुभम दुबेने त्याची साथ दिली. जुरेलने २८ चेंडूत त्याचे अर्धशतकही पूर्ण केले.

तत्पुर्वी, पंजाब किंग्सचा कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पंजाबकडून नेहल वढेराने ३७ चेंडूत ५ चौकार आणि ५ षटकारांसह ७० धावांची खेळी केली. तसेच शशांक सिंगने ३० चेंडूत नाबाद ५९ धावा केल्या. त्याने ५ चौकार आणि ३ षटकार खेचसेय याशिवाय प्रभसिमरन सिंगने १० चेंडूत २१ धावा, श्रेयस अय्यरने २५ चेंडूत ३० धावा आणि अझमतुल्लला ओमरझाईने ९ चेंडूत नाबाद २१ धावा केल्या. त्यामुळे पंजाबने २० षटकात ५ बाद २१९ धावा केल्या होत्या.

## मुंबई इंडियन्सच्या पुनरागमनाचं रहस्य गावसरांनी उलगडलं



**नवी दिल्ली :** इंडियन प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेत हार्दिक पांड्याच्या नेतृत्वात खेळणाऱ्या मुंबई इंडियन्स संघाचे पुनरागमन यंदा चर्चेचा विषय राहिला. पाचवेळच्या विजेत्या मुंबई इंडियन्सला गेल्यावर्षी पहिल्यांदाच हार्दिकच्या नेतृत्वात खेळताना शेवटच्या क्रमांकावर रहावं लागलं होतं. त्यानंतर यावर्षीही त्यांची कामगिरी सुरुवातीला चांगली झाली नव्हती. पहिल्या ५ सामन्यांमध्ये केवळ एकच सामना मुंबईला जिंकता आला होता. पण त्यानंतर मुंबईने पुनरागमन केलं. मुंबईने नंतर सलग ६ सामने जिंकले. त्यामुळे मुंबई १२ सामन्यांमध्ये ७ विजयासह १४ गुण मिळवून सध्या चौथ्या क्रमांकावर असून प्लेऑफमध्ये प्रवेश करण्यासाठी दावेदार आहेत. मुंबई इंडियन्सने केलेल्या या पुनरागमनाचे कौतुक माजी क्रिकेटपटू सुनील गावसकरांनीही केले आहे. त्यांनी मुंबईचा कर्णधार हार्दिक पांड्याचेही कौतुक केले आहे. त्यांनी स्टार स्पोर्ट्सच्या प्रेस रुममध्ये बोलताना म्हटले की 'गेल्या वर्षीपेक्षा यावर्षी हार्दिक पांड्याला प्रेक्षकांकडून पाठिंबा मिळाल्याचे आपण पाहिले. गेल्यावर्षी तो थोडा बावरलेला होता की मुंबईचे प्रेक्षक आणि मुंबईचे चाहते त्याला खूप पाठिंबा देत नव्हते. पण यावर्षी सर्वजण त्याच्या पाठीशी आहेत. आणि ते सर्व जण त्याला जाऊन जिंकण्यासाठी सांगत आहेत. त्यांना आता २१ ला वानखेडे स्टेडियमवर एक सामना खेळायचा आहे.' याशिवाय गावसकरांनी हार्दिकच्या शांत आणि संयमी स्वभावाचेही कौतुक केले. ते म्हणाले की 'संघाने ज्या पद्धतीने पुनपरागमन केले, ते आपण पाहिले.आपण त्याच्या विचारसरणीबद्दल आणि त्याचा शांत स्वभाव कसा पाडतो, त्याबद्दल बोलतोय.त्याने मैदानात कोणतीही भावना दाखवलेली नाही. जेव्हाही क्षेत्ररक्षणात चूक झाली, एखादा झेल सुटला, तेव्हा तो फक्त मागे जाऊन आपल्या क्षेत्ररक्षणाच्या जागेवर जाऊन उभा राहिला.'

# बांगलादेशचा युएईवर २७ धावांनी विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** शारजाह येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या टी-२० सामन्यात बांगलादेशने यूएईचा २७ धावांनी पराभव केला. यासह बांगलादेश संघाने मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

बांगलादेशच्या विजयात परवेझ हुसेन इमॉनने महत्त्वाची भूमिका बजावली. त्याने ५३ चेंडूत शतक झळकावले आणि बांगलादेशची धावसंख्या १९१ धावांवर नेली. १९२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना युएई संघाला फक्त १६४ धावा करता आल्या. नाणेफेक गमावल्यानंतर बांगलादेशची सुरुवात चांगली झाली नाही. डावाची सुरुवात करण्यासाठी ताजिद हसन तमीम आणि परवेझ हुसेन इमॉन यांना पाठविण्यात आले. दुसऱ्या षटकात तमिम १० धावा काढून बाद झाला.

कर्णधार लिटन दासनेही ११ धावांची जलद खेळी केली. पण तोही पुल शॉटवर झेलबाद झाला आणि पॅव्हेलियनमध्ये गेला. इमॉन आणि लिटन दास यांनी दुसऱ्या विकेटसाठी २१ चेंडूत ३६ धावांची भागीदारी केली. पॉवरप्लेनंतर बांगलादेश ५५/२ वर होता. इमॉन आणि तौहीद हृदयॉय यांच्यात ५८ धावांची भागीदारी झाली पण त्यानंतर यूएईने सतत विकेट्स घेतल्या. मेहेदी हसन (२), नवोदित झाकीर अली अनिक (१३), शामीम हुसेन (६) स्वस्तात बाद झाले. १७ व्या षटकापर्यंत बांगलादेशचा स्कोअर ६ बाद १५६ पर्यंत पोहोचला. नो-बॉलवर ८४ धावा केल्यावर इमॉनला आराम मिळाला पण त्याने त्याचा पुरेपूर फायदा घेत शतक ठोकले. पण पुढच्याच चेंडूवर बाद झाला. इमॉनने ५३ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. बांगलादेशकडून टी२० मध्ये हे दुसरे शतक होते. इमॉनच्या आधी, तमीम इक्बालने २०१६ च्या टी-२० विश्वचषकात ओमानविरुद्ध नाबाद १०३ धावा केल्या होत्या.

# महाराष्ट्राची पदक सप्तमी, आयुषा, सुजयकडून सुवर्ण सांगता; २ सुवर्ण, १ रौप्य, ४ कांस्य पदकांची कमाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मराठमोळ्या कुस्तीगीरांनी २ सुवर्णपदकांसह ७ पदकांची लयलूट करीत ७ व्या खेलो इंडिया युवा स्पर्धेची सुवर्ण सांगता केली. महाराष्ट्राच्या आयुषा गाडेकर व सुजय तनपुरे यांनी सुवर्णपदक जिंकून आखाडा गाजविला. स्पर्धेत १८ पदकांची लयलूट करीत सर्वसाधारण उपविजेतेपदही महाराष्ट्राच्या संघाने पटकावले.

ज्ञानभवन सांस्कृतिक हॉलमध्ये संपलेल्या कुस्ती आखाड्यात महाराष्ट्राचा जयजयकार शेवटच्या दिवशीही घुमला. २ सुवर्ण, १ रौप्य, ४ कांस्य अशी एकूण ७ पदकांची कमाई महाराष्ट्राने केली. कुस्ती स्पर्धेला भेट देत पदकविजेत्या कुस्तीगरांचे पथकप्रमुख महादेव कसगावडेसह अरूण पाटील, शिवाजी कोळी यांनी अभिनंदन केले.



मुलींच्या फ्रीस्टाईल ५७ किलो गटात वाशिमच्या अनुष्का गाडेकरने चीतपट कुस्तीचे प्रदर्शन घडवित सुवर्णपदक पटकावले. हरियाणाच्या अंशुलविरूद्ध सुरूवातीपासून अनुष्काने आक्रमक लढत दिली. ६-० गुणांने आघाडीवर असताना १ मिनिटातच झोळी डावावर तिने अंशुलला चीतपट करीत मैदान गाजवले. मुंबईत साईच्या कुस्ती केंद्रात सराव करणाऱ्या आयुषा पहिल्याच खेलो इंडिया स्पर्धेत पदकाचा करिश्मा घडविला. १५ वर्षांखालील आशियाई स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणाऱ्या आयुषा लौकिकाला साजेसा खेळ करीत सुवर्ण कामगिरी केली.

फ्रीस्टाईलच्या ७१ किलो गटात आहिल्यानगरच्या सुजय तनपुरेने चंदिगडच्या सुशांत वशिष्ठला ६-० गुणांनी मात करीत पदार्पणातच खेलो इंडियाच्या सुवर्णयशाला गवसणी घातली. पहिल्या फेरीत २-० गुणाने आघाडी घेत सुजयने आपले वर्चस्व दाखवले. दुसऱ्या फेरीत आक्रमण करीत एकतर्फी लढत जिंकली. १७ वर्षीय सुजय पुण्यतील मामासाहेब मोहोळ संकुलात सराव करतो.

मुलांच्या ग्रीको रोमन प्रकारातील ६० किलो गटात कोल्हापूरच्या ऋषिकेश नाईक, चुरशीच्या अंतिम फेरीत दिल्लीच्या प्रांजल दाहियाकडून पराभूत व्हावे लागले. पहिल्या फेरीत ०-५ गुणांनी प्रणव मागे होता. दुसऱ्या फेरीत भारव्दांज डावावर ५-५ बरोबरी करीत ऋषिकेशने लक्षवेधी कुस्तीचे प्रदर्शन घडवले. शेवटच्या मिनिटाला प्रांजल दाहियाने तुफानी कुस्ती करीत ऋषिकेशला ५-९ गुणांनी पराभूत केले. १६ वर्षीय ऋषिकेश बेळगावतील सेनादलाच्या कुस्ती केंद्रात मेहनत घेत असतो.

मुलींच्या ६५ किलो फ्रीस्टाईल गटात सृष्टी करे हीने कर्नाटकच्या प्रतिक्षा भोवीला चीतपट करीत कांस्यपकद पटकावले. पहिल्या डावात ६-० ने आघाडी घेतल्यानंतर तिने दुसऱ्या फेरीत १०-२ गुणांची आघाडी घेत चीतपट कुस्ती केली. साताऱ्याच्या सृष्टीचे हे खेलो इंडिया स्पर्धेतील पहिलेच पदक आहे.

## खरे चाहते फक्त धोनीचे, बाकी सगळे तर पेड फॅन्स'



**नवी दिल्ली :** भारताचा माजी कर्णधार आणि चेन्नई सुपर किंग्सचा स्टार क्रिकेटपटू एमएस धोनीची लोकप्रियता कोणापासून लपून राहिलेली नाही. धोनी कुठेही खेळायला गेला, तरी त्याच्यासाठी चाहते स्टेडियममध्ये गर्दी करताना दिसतात. गेल्या काही वर्षात तर आयपीएलमध्ये सर्वांना याचा प्रत्येय आला आहे. मैदान कोणतंही असलं तरी धोनीसाठी चाहते चेन्नईला पाठिंबा देण्यासाठी मोठ्या संख्येने हजर असतात. त्याला चाहत्यांकडून 'थाला' हे टोपननावही देण्यात आलं आहे. त्याचा चाहता वर्ग हा केवळ भारतातच नाही, तर जगभरातही दिसून येतो. त्याच्या लोकप्रियतेचे आता हरभजन सिंगने कौतुक केले आहे. पण त्याने केलेलं विधान हे चर्चेचा विषय देखील ठरत आहे. हरभजन सिंगने धोनीचे चाहते खरे असल्याचे म्हणताना बाकीच्या चाहत्यांना खरेदी केलेले म्हटलं आहे. जिओस्टारशी बोलताना हरभजन सिंग म्हणाला, 'जितकं उरलं आहे आणि जितका दम आहे, खेळ भाई. माझा संघ असता तर कदाचित मी काहीतरी वेगळा निर्णय घेतला असता. आणि सरळ गोषच आहे की चाहत्यांना त्याने खेळावं असंच वाटत असेल, कारण ते त्याचे चाहते आहेत. तो पुढे म्हणाला, 'मला वाटतं की जर सर्वात जास्त खरे चाहते कोणाचे असतील तर त्यांचेच (सीएसके) आहेत. बाकी सर्व तर असेच तयार केलेले आहेत. आजकाल तर सोशल मिडिया अर्धा विकला गेलेला आहे. पण त्याचे चाहते जे आहेत.

# सलोनी साळुंखे, त्विशा दीक्षित यांना तिहेरी मुकुट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्हा हौशी जलतरण संघटनेच्या वतीने "रमेश दामले मेमोरियल" पुणे जिल्हा जलतरण अजिंक्यपद स्पर्धेत सलोनी साळुंखे, त्विशा दीक्षित यांनी तिहेरी मुकुट संपादन केला.

डेक्कन जिमखाना टिळक तलाव येथे सुरु असलेल्या या स्पर्धेत 100मी.फ्री स्टाईल प्रकारात सलोनी साळुंखेने 01.08.28सेकंद वेळ नोंदवत पहिला क्रमांक पटकावला. तर, आद्विका सोनी(01.11.73से) व लावण्या करडे (01.14.04से) यांनी अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक पटकावला. 200मी. बटरफ्लायमध्ये सलोनी साळुंखेने 02.58.00 सेकंद वेळ



नोंदवून विजेतेपद पटकावले. 400मी.फ्री स्टाईलमध्ये सलोनी साळुंखे हिने 05.09.31सेकंद वेळ नोंदवत पहिला क्रमांक पटकावला.

वरिष्ठ मुलींच्या गटात 200मी. बटरफ्लाय प्रकारात त्विशा दीक्षितने 02.39.12सेकंद वेळ नोंदवत प्रथम क्रमांक पटकावला.



50मी.बॅक स्ट्रोक प्रकारात त्विशा दीक्षितने 00:33.90 सेकंद वेळ नोंदवत विजेतेपद मिळवले. 400मी. फ्री स्टाईलमध्ये त्विशा दीक्षितने 05.29.41सेकंद वेळ नोंदवत प्रथम, तर मैथिली चिटणीस(05.42.09से) हिने दुसरा आणि धन्यता ओसवाल (06.54.81से) हिने तिसरा क्रमांकपटकावला.

200मी. बटरफ्लाय प्रकारात 17 वर्षाखालील मुलांच्या गटात शाल्व मुळ्ये(02.15.18से) याने पहिले स्थान पटकावले. याच गटात वेदांत तांदळे(02.15.30से) याने दुसरे आणि ओजस पिंगळे(02.24.81से) तिसरे स्थान पटकावले. 17वर्षाखालील मुलींच्या गटात 50मी.बॅक स्ट्रोक प्रकारात श्रीलेखा पारिक हिने 00:31.97 सेकंद वेळ नोंदवून विजेतेपदाचा मान पटकावला. 14 वर्षाखालील 100मी.फ्री स्टाईलमध्ये मुलांच्या गटात ईशान माझिरे(01:04.47से) याने तर, मुलींच्या गटात दक्षिता दुबे(01:06.88से) वेळ नोंदवून विजेतेपदाला गवसणी घातली.

# विरेश, प्रथमेश, निहिरा कौल, अनुष्का कुतवळ, श्रावणी उंडाळे हे संयुक्तरीत्या आघाडीवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कल यांच्या वतीने आयोजित व एमसीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या पुणे जिल्हा 17 वर्षाखालील खुल्या व मुलींच्या गटात निवड बुद्धीबळ स्पर्धेत खुल्या गटात पाचव्या फेरी अखेर विरेश शरणार्थी, प्रथमेश शेरला यांनी 5गुणांसह, तर मुलींच्या गटात तिसऱ्या फेरी अखेर निहिरा कौल, अनुष्का कुतवळ, श्रावणी उंडाळे यांनी 3 गुणांसह आघाडी प्राप्त केली.

कर्वे रोड येथील श्री गणेश सभागृह या ठिकाणी सुरू असलेल्या या स्पर्धेत खुल्या गटात पाचव्या फेरीत पहिल्या पटावर विरेश शरणार्थी ने शाश्वत गुप्ता चा पराभव



करून 5 गुणांसह आघाडी घेतली. तर, प्रथमेश शेरलाने सुयोग वडकेला पराभुत करून 5 गुणांची कमाई केली.

मुलींच्या गटात तिसऱ्या फेरीअखेर निहिरा कौल हिने सई पाटीलला नमवून 3गुण प्राप्त केले. दुसऱ्या पटावर अनुष्का कुतवळने चतुर्थी परदेशीचा तर, श्रावणी उंडाळेने गेहेना शिंगवीवर विजय मिळवत 3गुण प्राप्त केले.


याआधी स्पर्धेचे उदघाटन इंटरनॅशनल मास्टर अभिषेक केळकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धा संचालक प्रकाश कुंटे, राजेंद्र शिदोरे, चीफ आरबीटर आयए विनिता श्रोत्री आदी मान्यवर उपस्थित होते.

### भारतीय वंशाच्या खेळाडूने गाजवलं अमेरिकेचं मैदान

# एकाच ओव्हरला ३२ धावा अन् मग वेगवान शतक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अमेरिकेत सध्या आयसीसी वर्ल्ड कप लीग टू २०२३-२७ स्पर्धा सुरू असून या स्पर्धेत शनिवारी युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका संघाने कॅनडविरुद्ध १६९ धावांनी दणदणीत विजय मिळवला. युएसएच्या या विजयात दोन भारतीय वंशाच्या खेळाडूंचे योगदान महत्त्वाचे राहिले. हा सामना फ्लोरिडामधील लौडरहिल येथे पार पडला. या सामन्यात युएसएने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पण त्यांनी अँड्रिस गौसची




विकेट ४ धावांवरच गमावली. पण त्यानंतर सलामीवीर स्मित पटेल आणि कर्णधार मोनांक पटेल यांच्यात ७८ धावांची भागीदारी झाली.

पण मोनांक १६ व्या षटकात साद बीन झाफरच्या गोलंदाजीवर ४७ चेंडूत बाद झाला. त्यानंतर स्मितची साथ सतेजा मुक्कामल्लाने साथ दिली. पण सतेजाही ३० धावांवर बाद झाला. पण नंतर स्मित पटेलला मिलिंद कुमारची साथ मिळाली होती. दरम्यान स्मितने ६९ चेंडूत त्याचे अर्धशतक केले. त्यानंतर त्याने ११० चेंडूत त्याचे शतक ३९ व्या षटकात झळकावले. त्यानंतर मात्र दोघांनी गिअर बदलले. मिलिंदने ४४ चेंडूत त्याचे अर्धशतक पूर्ण केले होते. त्यानंतर ४८ वे षटक टाकण्यासाठी कॅनडाकडून दिलॉन हेलिगर आला. त्याच्या या षटकाला मिलिंदने टार्गेट केलं.

त्याने पहिल्याच चेंडूवर चौकार आणि मग सलग ४ षटकार मारले. त्यानंतर त्याने शेवटच्या चेंडूवरही चौकार वसूल केला. त्यामुळे एकाच षटकात ३२ धावा निघाल्या. पुढच्याच षटकात मिलिंदने आणखी एक चौकार ठोकत ६० चेंडूत त्याचे शतक पूर्ण केले.

स्मितनेही दीडशतक झळकावलं. त्यामुळे युएसएने ५० षटकात ३ बाद ३६१ धावा केल्या. स्मित पटेल १३७ चेंडूत १२ चौकार आणि ४ षटकारांसह १५२ धावांवर नाबाद राहिला, तर मिलिंद ६७ चेंडूत ११५ धावांवर नाबाद राहिला.

#रा